# हाकारा





अंक पहिला | वर्ष पहिले | जानेवारी ते मार्च १९८०

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ


| | |
|---|---|
| अध्यक्ष | प्रा. गं. बा. सरदार |
| उपाध्यक्ष | अनंतराव बोधनकर |
| | काळूराम दोधाडे |
| चिटणीस | प्रा. रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस | जगदीश गोडबोले |
| | अनिल गोरे |
| खजीनदार | विजय भानू |
| सभासद | गोविंद गारे |
| | माधव कुलकर्णी |
| | अनंतराव पाटील |
| | जनार्दन वळवी |
| | शरद कुलकर्णी |
| | विल्किनसन |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| डॉ. बाबा आढाव | डॉ. जयंत पाटील |
| श्री बाबा आमटे | विजय परुळकर |
| प्रा. रावसाहेब कसबे | श्रीमती अनुताई वाघ |
| प्रा. सुधा काळदाते | प्रा. विलास संगवे |
| श्री. विजय तेंडुलकर | श्री. वाहरु सोनवणे |
| प्रा. वि. म. दांडेकर | श्रीमती गीता साने |
| डॉ. चित्रा नाईक | श्रीमती छाया सुरतवंती |
| श्री. आ. ना. नारळकर | श्री. दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



**सल्लागार मंडळ**

- डॉ. बाबा आढाव
- श्री. विजय तेंडुलकर
- डॉ. जयंत पाटील
- श्री. वाहरु सोनवणे
- श्री. बाबा आमटे
- प्रा. वि. म. दांडेकर
- श्री. विजय परुळकर
- श्रीमती गीता साने
- प्रा. रावसाहेब कसबे
- डॉ. चित्रा नाईक
- श्रीमती अनुताई वाघ
- श्रीमती छाया सुरतवंती
- प्रा. सुधा काळदाते
- श्री. आ. ना. नारळकर
- प्रा. विलास संगवे
- श्री. दत्ता सावळे


सप्रेम नमस्कार,

महाराष्ट्रातील आदिवासी-दलित क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे एक व्यापक व्यासपीठ तयार व्हावे, सामाजिक जाणीव असलेल्या लोकांत आदिवासी - दलितांच्या समस्यांची माहिती व्हावी या दृष्टिकोनातून ' महाराष्ट्र मानव - विज्ञान परिषदे 'ची (Maharashtra Association of Anthropological Sciences) ची स्थापना झाली आहे. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी परिषदेने वेळोवेळी संबंधित विषयावर कार्यकर्त्यांची शिबिरे, परिसंवाद, अभ्यास दौरे आयोजित केले आहेत.

वरील प्रयत्नांचाच एक भाग म्हणून परिषदेतर्फे ' हाकारा ' हे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे व त्याचा प्रथम अंक ५ जानेवारी रोजी प्रसिद्ध झाला आहे. ' हाकारा 'च्या दर अंकात आदिवासी दलितांची जीवन पद्धती, समस्या, विधी-मंडळ - संसदेत याबाबत होणाऱ्या चर्चेचे वृत्तांत, पुस्तक परीक्षण, संस्था परिचय, व लोकगीत - कथा आदि मजकुर सादर केला जाईल.

आदिवासी - दलितांच्याविषयी आपल्याला आस्था आहेच. आपण आपले अनुभव-विचार लेख / पत्र रूपाने कळवावे. तसेच परिषद / हाकाराचे वर्गणीदार होऊन या कामात प्रत्यक्ष सहभागी व्हावे ही विनंती. कळावे,

आपला

ग. बा. सरदार

अध्यक्ष

कार्यकारी संपादक

**जगदीश गोडबोले**


महाराष्ट्र मानव - विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- आजीव सभासद १०० रुपये
- वार्षिक सभासद १० रुपये
- ' हाकारा 'ची वार्षिक वर्गणी १२ रुपये

**पत्ता :** महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे - ४११ ००७

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )


वर्ष पहिले, अंक पहिला

जानेवारी-मार्च १९८०

वार्षिक वर्गणी : १२ रुपये



पत्रव्यवहाराचा पत्ता :

सचिव

मानव विज्ञान परिषद, पुणे



## संपादक मंडळ

जगदीश गोडबोले

विजय लेले

रा. के. मुटाटकर

शरद कुलकर्णी

भाऊ मांडवकर



प्रकाशक : प्रा. रा. के. मुटाटकर,
सचिव, मानव विज्ञान परिषद, पुणे
यांनी मानव विज्ञान परिषद पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

मुखपृष्ठ : शशि चित्रे
(मुखपृष्ठ व आतील सजावटीत वारली शैलीतील चित्रे
वापरली आहेत.)


## अनुक्रमणिका


अभिनंदन २

संपादकीय ३

भारतातील आदिवासी – डॉ. अनिल गोरे ५

जबरन जोत – खास विभाग १७

- महाराष्ट्र शासनाचा अतिक्रमित जमिनी– संबंधीचा आदेश. ११
- मध्य-प्रदेश शासनाचा अतिक्रमित जमिनीसंबंधीचा आदेश. १५
- अतिक्रमणे कायदेशीर करणाऱ्या आदेशातील त्रुटी – **शरद कुलकर्णी** २१
- अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीचा नवा आदेश. २९
- आदिवासी प्रश्नावर विधानसभेत चर्चा **प्रतिनिधी** ३५
- जंगल – जमिनीचा प्रश्न **डॉ. वसुधा धगमवार** ३६
- जंगलाचे संवर्धन, सरकार व लोक ३९
- आदिवासी आणि दलितमुक्तीची चळवळ : एक टिपण – **रावसाहेब कसबे** ४०
- अमळथे : संघटनांचा नवा आदर्श **गोविंदराव शिंदे** ४१
- परिवर्तन : आदिवासी मुलांचा दृष्टिकोन **अशोक ताकमोगे** ४३
- शोषणाच्या समस्येचे दर्शन (परीक्षण) **सुधीर बेडेकर** ४५
- मानवविज्ञान परिषद चर्चासत्राचा वृत्तांत ४६
- संस्था परिचय ४८


# हार्दिक अभिनंदन

मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष प्रा. गं. बा. सरदार यांची बार्शी येथे होणाऱ्या ५४ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे.

' हाकारा ' च्या सल्लागार मंडळाचे सन्मान्य सदस्य श्री. बाबा आमटे आणि श्री. जयंतराव पाटील यांना उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल जमनालाल बजाज पुरस्कार देण्यात आला आहे. तसेच श्रीमती अनुताई वाघ यांना उल्लेखनीय शैक्षणिक कार्यासाठी १० हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला आहे.

या सर्वांचे हाकारातर्फे हार्दिक अभिनंदन.

# संपादकीय



'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' अशा भारदस्त नावाच्या संस्थेने ग्रामीण जनता, आदिवासी व दलितासाठी 'हाकारा' हे त्रैमासिक कां काढावे असा प्रश्न साहजिकच वाचकांच्या मनात येईल. मानव विज्ञान म्हणजे 'एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस' व मानवशास्त्र म्हणजे 'एन्थ्रॉपॉलॉजी' यांचा आदिवासी, दलितांशी संबंध काय, असाहि प्रश्न उपस्थित होईल.

महाराष्ट्राला मानवशास्त्राचा परिचय कै. डॉ. इरावती कर्वे यांच्या प्रगाढ अध्ययनातून झाला. मानवशास्त्राचा कवटचांशी, रक्तगटांशी संबंध असतो; जातिसंस्थेच्या उगमाचा त्यात उहापोह केला जातो अशी मानवशास्त्राबाबत ख्याती आहे. परंतु मानवशास्त्राची सैद्धांतिक बैठक व अभ्यासपद्धती जगातील विविध अदिवासी गटांच्या अध्ययनांतून निर्माण झाली आहे हे लोकांना फारसे परिचयाचे नाही.

पुणे विद्यापीठात मानवशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम १९६३ साली सुरू करण्यात आला. महाराष्ट्रात आजहि असा अभ्यासक्रम केवळ पुणे विद्यापीठातच आहे. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी भागात जाऊन, लोकांसमवेत राहून त्यांच्या संस्कृतीचे व समस्यांचे अध्ययन करणे अभ्यासक्रमाचे अविभाज्य अंग आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांची ग्रामीण व आदिवासी संस्कृतिबद्दल जाण वाढते असा अनुभव आहे. परंतु केवळ एकाच विद्यापीठाचे विद्यार्थी महाराष्ट्रातील सर्व आदिवासी भागात संशोधन करण्यास तोकडे पडतील या जाणिवेतून महाराष्ट्रातील निवडक प्राध्यापकांना आदिवासींबाबत संशोधन करण्याचे प्रशिक्षण देण्याचे ठरले. त्याप्रमाणे नोव्हेंबर १९७५ मध्ये पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागांत एक शिबीर भरविण्यात आले होते. त्यावेळी जमलेल्या ३०–४० प्राध्यापकांनी या प्रश्नाच्या अभ्यासासाठी व्यापक व्यासपीठ स्थापन करण्याची मनिषा प्रदर्शित केली. त्यातूनच २६ नोव्हेंबर १९७५ रोजी श्री. अनंतराव बोधनकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन 'द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ एन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस' या संस्थेची स्थापना करण्यात आली.

आदिवासी विषयक अध्ययनाची तात्त्विक बैठक जरी मानवशास्त्रात जोपासली गेली असली तरी आदिवासींचा विकास व त्यांच्या समस्यांची जबाबदारी इतर विषयांनाहि नाकारता येत नाही. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, कायदा, समाजशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य, वैद्यकशास्त्र इत्यादि विषयांच्या तज्ज्ञांनाहि आदिवासी विषयक अध्ययनात रस असतो. हे विचारात घेऊन संस्थेचे नाव मानवशास्त्र परिषद न ठेवता 'मानव विज्ञान परिषद' ठेवण्यात आले. मानवाशी व त्यातहि रंजल्या गांजलेल्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्वांनाच पक्षातीत व्यापक व्यासपीठ असावे हा उद्देश परिषदेच्या स्थापनेमागे आहे. परिषदेच्या व्यासपीठावर राजकीय चर्चा वर्ज्य नाही, परंतु ती चर्चा पक्षातीत असावी असा आग्रह आहे. विशेषत: आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन व चर्चा व्हावी, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण घडावे, त्यांच्या समस्यांना तोंड फुटावे असे परिषदेचे उद्देष आहेत. सुशिक्षितांचे व नागरी समाजातील लोकांचे आदिवासींबद्दलचे अज्ञान व पूर्वग्रह दूर व्हावे असाहि एक हेतू परिषदेने उराशी बाळगला आहे. त्यानिमित्ताने सुशिक्षित व आदिवासींमधील दरी कमी झाली तर ते स्वागतार्ह ठरणार आहे.

मे १९७६ मध्ये नियमानुसार संस्थेचे नोंदणीकरण झाल्यावर नोव्हेंबर १९७६ मध्ये ठाणे जिल्ह्यातील मोरवाडा तालुक्यातील साखरशेत-चालतवड भागात महाराष्ट्रातील चाळीस प्राध्यापक, संशोधक व पदव्युतर विद्यार्थ्यांचे एक शिबीर भरविण्यात आले होते. 'आदिवासींच्या शिक्षणविषयक समस्या' या विषयांवर ७-८ खेडयांतून माहिती गोळा करून ती जव्हार येथे चर्चासत्राच्या रूपाने तज्ज्ञांसमोर मांडण्यात आली.

ऑगस्ट १९७७ मध्ये, पुणे विद्यापीठात स्वतंत्र मानवशास्त्र विभाग उघडण्यात आला. मानवशास्त्राची संशोधनाची बाजू विभागाने सांभाळावी व संस्थेने सर्वसामान्य आदिवासी कार्यकर्ते व विचारवंत यांच्यात दुवा निर्माण करावा, आदिवासी व दलितांच्या समस्याबाबत सुसंवाद घडवावा अशी कामाची विभागणी करण्यात आली.

डिसेंबर १९७८ मध्ये दिल्लीस भरलेल्या दहाव्या आंतरराष्ट्रीय मानव विज्ञान परिषदेच्या एका उपसंमेलनाच्या रूपाने पुणे विद्यापीठात मानवशास्त्र विभागाने संस्थेच्या सहकार्याने एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद 'वैद्यक मानवशास्त्र' या विषयावर १९ ते २१ डिसेंबर रोजी भरविण्यात आला होता. त्यात ५१ परदेशी व १०० भारतीय संशोधकांनी भाग घेतला. त्यानंतर, फेब्रुवारी १९७९ मध्ये आदिवासी समस्यांबाबत चर्चा घडविण्यासाठी महाराष्ट्रातील सुमारे ४० आदिवासी कार्यकर्त्यांचे चर्चासत्र पुणे येथे घेण्यात आले, त्याचा गोषवारा या अंकात देण्यात आलेला आहे. या चर्चासत्रांत, परिषदेने एक त्रैमासिक काढण्याबाबत विचार मांडण्यात आले, त्रैमासिकाच्या आखणीबाबतहि कार्यकर्त्यांनी विचार मांडले. त्याप्रमाणे हा पहिला अंक सादर होत आहे.

धुळे जिल्ह्यातील डोंगराळ अक्राणी तालुक्यातील धडगाव येथे ८ व ९ डिसेंबर रोजी तीस आदिवासी कार्यकर्त्यांचे शिबीर भरविले होते. या पुढील काळात आदिवासी जिल्ह्यात प्रादेशिक चर्चा सत्रे आयोजित करणे, महाराष्ट्राचे प्रांतिक संमेलन भरविणे, आजी-माजी आदिवासी आमदार, खासदारांचे चर्चासत्र आयोजित करणे आदि उद्देश परिषदेने डोळयासमोर ठेवले आहेत.

आदिवासी भागात वेगवेगळे गट संघर्षात्मक, व रचनात्मक कार्य करीत आहेत. यात बिगर आदिवासी युवकगटांचाहि मोठा भरणा आहे. या सर्वांना परस्परांच्या कार्याची जाणीव व अनुभूती असावी हा 'हाकारा' प्रसिद्ध करण्यामागचा उद्देश आहे. आदिवासी व दलितांबाबत घटनेच्या चौकटीतच सुरू असलेल्या कार्याबद्दल संवाद व लोकशिक्षणाच्या हेतूने 'हाकारा' सुरू करण्यात येत आहे. हाकाराच्या दर अंकात आदिवासी व दलित यांच्या समस्यांची चर्चा-संघर्षाची व रचनात्मक कार्यक्रमाची माहिती, विधीमंडळ व संसदेतील या विषयाच्या चर्चेचे वृत्तांत, संस्थांचा परिचय, कथा, काव्य, पुस्तक-परिचय इत्यादि सादर करण्याची योजना आहे.

कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, मनोगत, सहकार्य, सहानुभूती व सल्ला अवश्य द्यावा. त्यामुळे 'हाकारा' अधिक प्रभावी करण्यात मदतच होईल.


महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी 'हाकारा'चे सल्लागार म्हणून काम करण्यास अनुमती देऊन आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे.

आदिवासींचे मागासलेपण घालविण्याकरिता आपली संस्कृती व मूल्ये त्यांच्यावर न लादता कशा प्रकारचे संघर्षात्मक व रचनात्मक कार्यक्रम घेता येतील याबाबत 'हाकारा' मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करणार आहे.

दलित व आदिवासी जरी शोषित असले तरी त्यांच्यात फरक आहे. दलित हे एकंदर प्रादेशिक व राष्ट्रीय समाजाचे शोषित अंग म्हणून शतकानुशतके वावरले आहेत. दलितांचे शोषण आर्थिक, सामाजिक व धार्मिक या तिन्ही अंगांनी झाले आहे. त्यामुळे समाजात राहून एकाकी, हीन अशी त्यांची स्थिती राहिली आहे, तर बहुतांश आदिवासी हे नागर समाजापासून अलग पडलेले लोक आहेत. त्यांनी समृद्ध समाज पाहिलेलाच नाही. ब्रिटीश प्रशासन आणि आदिवासी क्षेत्रात आलेले उपरे यांनीच त्यांचे आर्थिक शोषण केले आहे. समाजव्यवस्थेत दलितांसारखी त्याबद्दल हीनत्वाची भावना नाही. तरीहि आदिवासीतील जागृती, नेतृत्व निर्माण व शिक्षण याची समस्या आहे. या सर्व समस्यांच्या सोडवणुकीकडे 'हाकारा' लक्ष वेधीत आहे. सामाजिक संघटन आणि एकी करण्याची वेळ अजूनहि गेलेली नाही असा 'हाकारा'चा विश्वास आहे. असाच विश्वास कार्यकर्त्यांत निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी 'हाकारा'ला कार्यकर्ते आणि वाचक-हितचिंतकांनी घडवावयाचे आहे. त्यासाठी आत्मियतापूर्वक केलेल्या सूचनांचे 'हाकारा' नेहमीच स्वागत करील.

■ ■

# भारतातील आदिवासी



—अनिल गोरे

**१९७१** सालच्या जनगणनेनुसार ५४ कोटी ८० लाख भारतीयांपैकी ३ कोटी ८० लाख म्हणजे ७ टक्के नागरिक आदिवासी आहेत. आदिमजातींच्या सरकारी यादीत सुमारे ४२५ जमातींची नावे आढळतात. महत्त्वाच्या पोटजमातींच्या नावांचाहि त्यात समावेश आहे. इतक्या विविध गटांपैकी संख्येच्या दृष्टीने मोठे गट म्हणजे गोंड, भिल्ल व संथाळ. यापैकी पहिल्या दोन गटात सुमारे ४० लाख लोक आहेत तर तिसऱ्यात ३० लक्ष. मध्यप्रदेश, महा-

**दास, दस्यू, किरात, शबर या सारख्या नावांनी संस्कृत लिखाणात आदिवासींचा उल्लेख झाला आहे. विविधतेने नटलेल्या आणि स्वतःच्या वैशिष्टयांनी समृद्ध असलेल्या आदिवासी जगाची ओळख करून देणारा लेख.**

राष्ट्र व आंध्र प्रदेशात गोंड जमात पसरली असून भिल्ल लोक राजस्थान, गुजराथ, मध्यप्रदेश व महाराष्ट्रांत आहेत. संथाल जमातीचे लोक बंगाल, बिहार व ओरिसा या प्रांतात आहेत. मिना, मुंडा व ओरॉव हे गट दहा लाखावर आहेत तर हो, खोंड व कोल ५ लाखावर आहेत. सर्वात छोटा गट बहुधा 'अंदमानीज' हा असेल, १९६१ च्या जनगणनेनुसार या जमातीची संख्या फक्त १९ होती.

## वांशिक विभागणी

मानव शास्त्रीय दृष्टिकोनातून भारतातील आदिवासींची तीन ढोबळ वांशिक गटात विभागणी करता येते. कर्नाटक, तामिळनाडू व केरळ या भागात नेग्रिटो जमाती आहेत. काळसर वर्ण, मोठे बसके नाक व कुरळे केस ही त्याची लक्षणे मानता येतील. मध्य आणि पश्चिम भारतात 'प्रोटो ऑस्ट्रॅलॉइड' जमाती आहेत. काळे, बुटके, रुंद कपाळाचे व रुंद मोठ्या नाकाचे असे त्यांचे वर्णन करता येईल. ईशान्य भारतातील जमातींना मंगोलॉइड असे संबोधता येईल. तपकिरी वर्ण, काळे केस व डोळे, वर आलेली गालाची हाडे, बसके नाक, अशी त्यांची वैशिष्टये आहेत. भारतातील रहिवाशांपैकी सर्वात प्राचीन असे दक्षिण भारतातील 'नेग्रिटो' आदिवासीबद्दल म्हटले जाते.

दक्षिण भारतातील जमातींपैकी काही प्रमुख जमाती म्हणजे आंध्रमधील चंचू, कूर्गमधील युरुवा, वायनाडमधील कुरुंबा व पाणियन्, त्रावणकोर, कोचीनजवळचे कणिक्कर, मलपंतरम् इत्यादि. जंगलामधून अन्न गोळा करणे किंवा शिकार यावर यांचा बहुतेक उदर निर्वाह चालतो. सहाजिकच त्यांना एका जागी कायम वस्ती ठेवता येत नाही. भटके जीवन जगावे लागते. कंदमुळे, फळे, मध, प्राणी, पक्षी हाच त्याचा आहार. एखादी कुदळ व आकडी यापलीकडे हत्यारे त्यांना फारशी परिचित नाहीत. अग्नी प्रज्वलित करण्याचा मार्ग म्हणजे लाकडावर लाकूड घासून. वल्कले किंवा गवतापासून बनविलेल्या वस्त्रांनी ते शरीर झाकायचे प्रयत्न करतात. एकंदर तंत्रदृष्टया या जमाती बऱ्याच मागासलेल्या आहेत. निव्वळ शिकार

व अन्न गोळा करणे यावर विसंबल्यास दर चौरस-किलोमीटर ३०० क्षेत्रावर केवळ १ किंवा २ माणसांचेच भागू शकते. त्यामुळे या जमातींची संख्या कमी व वस्ती विरळ असणारच. अंदमानमधील ओंगे, जरावा इत्यादी गटहि याच पद्धतीने राहतात. निलगिरी पर्वतातील तोडा (एकूण संख्या ७६५) ही जमात मात्र म्हशी पाळण्याचा धंदा करते.

मध्य आणि पश्चिम भारतातील आदिवासी या मानाने प्रगत समजले पाहिजेत. या भागात तात्पुरत्या स्वरूपाची का होईना, पण शेती केली जाते. त्यामुळे जमिनीची उत्पादकता वाढून दर चौरस किलोमीटर-मागे ८–१० लोकांचा निर्वाह होऊ शकतो. त्याचप्रमाणे कायम स्वरूपाच्या बस्त्यांमधे राहणे शक्य होते. ही खेडी बरेचदा सुसंघटित असतात. गावचा प्रमुख व इतर प्रतिष्ठित रहिवासी मिळून दैनंदिन जीवनाचे नियंत्रण आणि नियमन करतात. यातील कित्येक जमातींमध्ये कुमार-कुमारींसाठी वेगळा निवास असतो. त्याला घोटुल, धुमकरिया इत्यादि नावे दिली जातात. बांबूच्या टोपल्या, कणग्या विणणे, लाकडावर कोरीव काम करणे अशा कला या आदिवासींमध्ये आढळतात. कापड विणण्याचे तंत्र मात्र येथे विकसित झाल्याचे दिसत नाही. पूर्वी या भागात वल्कलांचाच वापर असणार. आता मात्र नागरी संपर्कामुळे सरसकट पैसे देऊन कापड विकत घेतात.

विणकामाची कला फक्त ईशान्य भागातील आदिवासीमध्ये दिसते. नागा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमातीत गारो, खासी, मिझो, लेपचा वगैरेंचा समावेश आहे. या जमाती संख्येने लहान असून तुलनेने भारतात, अलीकडेच आलेल्या आहेत. येथे तात्पुरती व नियमित स्वरूपाची शेती केली जाते. शेतीसाठी डोंगर उतारावर ताली बांधून सपाट तुकडे बनविण्याचे तंत्र त्यांना अवगत आहे. या जमातीत स्त्रीला फार मानाचे स्थान आहे. कापूस उत्पादन, सूतकताई, विणकाम ही बव्हंशी महिलांचीच कामे मानली जातात. विणकामासाठी एक अरुंद माग वापरला जातो. तो बहुधा तिबेटमधून आला असावा.

भारतातील आदिवासींची राज्यवार विभागणी सोबतच्या तक्त्यात दिली आहे.

भारतातील आदिवासी जीवनांत कुटुंबसंस्थेचा विचार केल्यास खूपच विविधता असल्याचे दिसते.

# विविध राज्यातील आदिवासी संख्या व त्यांचे लोकसंख्येशी प्रमाण

| | | |
|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १६·५८ | ( ३·८१) |
| आसाम | १६·०७ | (१०·९८) |
| बिहार | ४९·३३ | ( ८·७५) |
| गुजरात | ३७·३४ | (१३·९८) |
| हिमाचल प्रदेश | १·४२ | ( ४·०९) |
| कर्नाटक | २·३१ | ( ०·७९) |
| केरळ | २·६९ | ( १·२६) |
| मध्यप्रदेश | ८३·८७ | (२०·१३) |
| महाराष्ट्र | २९·३४ | ( ५·८६) |
| मणीपूर | ३·३४ | (३१·१८) |
| मेघालय | ८·१४ | (८०·४८) |
| नागालँड | ४·५८ | (८८·६१) |
| ओरिसा | ५०·७२ | (२३·११) |
| राजस्तान | ३१·२६ | (१२·१३) |
| तामिळनाडू | ३·१२ | ( ०·७६) |
| त्रिपुरा | ४·५१ | (२८·९४) |
| उत्तर प्रदेश | १·९९ | ( ०·२२) |
| पश्चिम बंगाल | २५·३३ | ( ५·७१) |
| अंदमान–निकोबार | ०·१८ | (१५·७२) |
| अरुणाचल | ३·६९ | (७९·०१) |
| दादरा नगर हवेली | ०·६४ | (८६·३८) |
| गोवा, दमण, दीव | ०·०८ | ( ०·८९) |
| लक्षद्विप | ०·३३ | (९२·३५) |
| मिझोराम | ३·१३ | (९४·२६) |
| भारत | ३८०·१५ | ( ६·९४) |

[ संदर्भ : ट्रायबल डेव्हलपमेंट रिट्रॉस्पेक्ट अँन्ड प्रॉस्पेक्ट, भारत सरकार, गृहमंत्रालय नवी दिल्ली ]

(आकडे लक्षांत, कंसातील आकडे आदिवासी लोकसंख्येचे राज्यांतील एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण)

हिमाचल प्रदेशातील पंगवाल जमातीत पितृसत्ताक एकत्र कुटुंब असते. तथापि तेथेहि वेगळे राहाण्याचे प्रमाण अलीकडे वाढत आहे. खासी जमातीत बहुपतिकत्वाची चाल आहे. मुले ही बापाच्या वंशाची

मानली जातात. ईशान्य भारतातील गारो, खासी या जमाती मातृवंश मानणाऱ्या आहेत. मिकिर जमातीमध्ये पित्याची संपत्ती नंतर मुलांची होते. तर मिझोंमध्ये पित्याच्या संपत्तीवर सर्वात धाकटचा मुलाचा हक्क असतो. काचार जमातीमध्ये मुलगा बापाचे नाव लावतो तर मुलगी आईचे. मध्य भारतामध्ये पितृसत्ताक पद्धत बहुतेक सर्व जमातीत आहे. संथाळ, गोंड, ओरॉंव, हो वगैरे सर्वांमधे पित्याचे नाव लावणे, पित्याच्या घरी राहणे ही सरसकट पितृसत्ताक पद्धत आहे. तेथे एक पत्नी व विभक्त कुटुंब हीच सर्वसाधारण दिसतात. भिल्लांनी तर कुटुंबपद्धती, वारसाहक्क वगैरेबाबत हिंदूंचे नियम सहीसही उचललेले दिसतात. महादेव कोळी, वारली, दुबळे यांच्यातहि पितृसत्ताक पद्धतच आहे. भारतातील ३/४ आदिवासी मध्य व पश्चिम प्रांतात रहात असल्याने ही कुटुंबपद्धती एका अर्थाने सार्वत्रिक मानावयास हरकत नाही.

खासींप्रमाणे निलगिरीतील तोंडामध्ये बहुपतिकत्वाची चाल आहे. पूर्वी या जमातीत तान्ह्या मुलींना मारण्याची प्रथा होती. त्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी होऊन बहुपतिकत्व सुरू झाले असावे. आता मुलींना मारत नाहीत. अनेक पुरुषांत एकच समाईक पत्नी असण्याऐवजी अनेक स्त्रिया समाईक असणे सुरू झाले आहे.

ईशान्येतील खासी आणि गारोंप्रमाणे केरळमधील कुरिच्चिअन, कुंडू, बारिअन हे गट मातृसत्ताक आहेत. पुष्कळ आदिवासींमध्ये वारसाहक्काबद्दलचे संकेत स्पष्ट नसतात. कारण अफाट गरिबीमुळे हक्क सांगण्याजोगी संपत्तीच अस्तित्वात असत नाही.

१९६१ च्या जनगणनेनुसार ९० टक्के आदिवासींची 'हिंदू' म्हणून नोंद झालेली आहे. ५ टक्के आदिवासी ख्रिश्चन तर ५ टक्के इतर धर्मांचे आहेत. ख्रिश्चन आदिवासी मुख्यतः ईशान्य प्रांतात व थोडे केरळमधे आहेत. हिंदू आदिवासींच्या रुढी, समज, चाली वगैरेंचे इतर हिंदूंच्या पद्धतींशी तपशील वगळता पुष्कळच साम्य आहे.

रोगराई, शेती, पाऊस, गुरेढोरे वगैरेंच्या संदर्भात अनेक जमातींमध्ये भुताखेतांना बरेच महत्व देण्यात येते. त्यांची भलावण करून संकट टाळण्याचे प्रयत्न केले जातात. सूर्य, चंद्र, पृथ्वी, काही विशिष्ट प्राणी वा वनस्पती यांना पूजनीय मानले जाते. बरेचदा कुळांची ठरलेली दैवते असतात. विविध प्रकारच्या भोळ्या समजुतीहि असतात. खारिया स्त्रीला नांगराला स्पर्श करण्याला वा घरावर छप्पर घालण्याला बंदी असते. गोंडांमधे मासिकपाळीच्या काळात स्त्रीला वेगळे ठेवण्यात येते. सेमा नागा लोक वाघाने मारलेल्या माणसाच्या सर्व वस्तूंना शापित मानतात. खोंड जमातीत नरबळीची चाल होती. कुट्टिया जमातीत मूल आजारी पडल्यावरच त्याचे नाव ठेवतात. बहुसंख्य जमातीत पितरांची पूजा केली जाते. बहुतेक गावांमध्ये ग्रामदेवता असते. वेगवेगळ्या धार्मिक विधीकरिता अर्थातच पुरोहित मंडळीहि असणारच. असा माणूस बहुधा वैद्य, पुजारी, अशा विविध भूमिका वठवितो आणि समाजात प्रतिष्ठेचे स्थान भूषवितो.

धार्मिक बाबींमध्ये आदिवासी आणि इतरेजन यांच्यात कल्पनांची मोठी देवाणघेवाण दीर्घ काळ चालत आहे हे सर्व मान्य आहे. बिगर आदिवासींच्या आदिवासी रूढींबद्दलच्या मतांचाहि आदिवासींवर वेळोवेळी परिणाम झालेला आहे. ओरॉंव जमातीत काही गटांनी 'ताना भगत' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चळवळीत मांस, दारू यांचा त्याग केला. अशीच चळवळ गोंडांमध्येहि झाली. तरुण-तरुणींनी मुक्त सहवास उपभोगणे ( हिंदू रूढीप्रमाणे ) अयोग्य आहे. असे वाटल्याने मूरियांमधील काही सुशिक्षित तरुणांनी घोटूल पद्धत बंद करण्याचा प्रयत्न चालविला आहे.

आदिवासी हे भारतातील सर्वांत प्राचीन रहिवासी आहेत असे मानल्यानंतर त्यांच्या बिगर आदिवासींबरोबरच्या संबंधाचे उल्लेख इतिहासांत सर्वत्र सापडणे ओघानेच येते. वैदिक वाङ्मयात इतर वेगवेगळ्या संस्कृतींच्या जनसमुहांचे उल्लेख आढळतात. रामायण महाभारत यांमध्येही आदिवासी व इतर यांचे संबंध असल्याचे दिसते. दास, दस्यू, किरात, शबर अशा नावांनी संस्कृत लिखाणांत आदिवासींचा उल्लेख झाला आहे. सम्राट अशोकाच्या शिलालेखांमध्येसुद्धा वन्य जमाती या साम्राज्याचा एक भाग आहेत व त्यांच्या कल्याणाची सम्राटाला काळजी आहे असे शब्द आढळतात.

मध्ययुगापर्यंत आदिवासी राजकीय घडामोडींपासून कदाचित दूर असतीलहि. मोगल व मराठा काळांत मात्र हे चित्र बदलले. अनेक आदिवासी प्रमुखांना बलवान केंद्रसत्तांचे मांडलिकत्व पत्करावे लागले. मोगलांनी मध्य भारतातील ओरॉंव, मुंडा इत्यादी जमातींकडून सक्तीने कर वसुली केल्याचे दिसते. भिल्ल मुलखामध्ये मोगल व मराठा सत्तांविरुद्ध अनेक छोटेमोठे उठाव झाले. गोंडाच्या स्थिरावलेल्या सत्तेला प्रथम

मोंगलांपुढे नमावे लागले. नागपूरच्या भोसल्यांनी तर चांद्याचे राज्यच नंतर गिळंकृत केले. याहून अगदी वेगळ्या प्रकारच्या संबंधाचे उदाहरण म्हणजे वंजारी ही जमात. मोगल सैन्याच्या सामान वाहतुकीचे काम करताकरता ती उत्तरेकडून आंध्रमध्ये आली व नंतर तेथेच स्थिरावली.

ब्रिटिश अमलामध्ये सत्ताधाऱ्यांच्या धोरणांचा आदिवासींवर फार विपरीत परिणाम झाला. जमीन मालकीसंबंधीच्या बदलत्या कायद्यांमुळे व लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे जंगलभागामध्ये अनेक नवीन हितसंबंधी गट स्थायिक झाले. त्यांत सावकार, जंगल कंत्राटदार यांचीही भर पडली. त्यांनी आदिवासींना अधिकच सफाईने नागविले. जंगल संपत्ती व जमीन यांवरचे आदिवासींचे परंपरागत हक्क नाकारले जाऊन जमिनींचे आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे मोठ्या प्रमाणावर हस्तांतरण झाले. यातून ठिकठिकाणी आदिवासींचा उठाव व बंडे झाली. १९ व्या शतकातच अशी सुमारे शंभर बंडे झाली अ ची. हे प्रश्न हाताळण्याच्या नावाखाली ब्रिटिशांनी आदिवासी मुलूख इतर भागापासून वेगळा काढण्यास सुरुवात केली पण यातहि ब्रिटिशांचे हेतू पूर्ण शुद्ध नसावेत. ब्रिटिश मळेवाल्यांचे हितसंबंध जेथे गुंतले होते तेथे मात्र आदिवासींना संरक्षण मिळाले नाही. आसाम व निलगिरीतील चहा व कॉफीच्या मळ्यांसाठी योग्य भागांना इतर आदिवासी भागांप्रमाणे बंदी लावण्यात आली नाही. ब्रिटिश मळेवाल्यांनी आदिवासी मजुरांना करारबंद करून घेतले व नंतर गुलामासारखी वागणूक दिली तरी त्यात हस्तक्षेप झाला नाही.

स्वातंत्र्योत्तर कालामध्ये आदिवासींच्या समस्यांबद्दल वेगळ्या दिशेने विचार केला जात आहे. घटनाकारांनी भारतीय समाजातील मागास घटकांचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकास घडवून आणण्याची जबाबदारी स्पष्टपणे शासनावर ठेवली. त्याचप्रमाणे संविधानांमध्ये मागासवर्गांचे हितसंबंध सुरक्षित राहण्याकरिता खास व्यवस्था केली. दुर्बल घटकांचे विविध प्रकारच्या शोषणापासून संरक्षण केले पाहिजे हे तत्त्व मांडले गेले. सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखीव ठेवण्यात आल्या. लोकसभा, विधानसभा इत्यादींमध्येहि राखीव जागा ठेवण्यात आल्या. या व्यवस्थेची योग्य अंमलबजावणी होत आहे काय अशी वेळोवेळी चौकशी करणाऱ्या खास अधिकाऱ्यांचे पदसुद्धा निर्माण करण्यात आले. ही व्यवस्था अर्थातच आदिवासींबरोबर मागासवर्गीयांकरताहि आहे.

## निवडक छोटे आदिम गट

| | नांव | संख्या |
|---|---|---|
| १. | अबूज माडिया | १३,००० |
| २. | बोंडो | ३,००० |
| ३. | ओंगे | ११२ |
| ४. | ग्रेट अंदमानी | २४ |
| ५. | जरावा | ३०० |
| ६. | सेंटीनेलिज | १०० |
| ७. | पहाडी खारिया | ९,४२३ |
| ८. | पहाडिया | १४,६५१ |
| ९. | बिरहोर | ३,४६४ |
| १०. | असूर | ७,०२६ |
| ११. | चेंचू | १०,४४८ |
| १२. | खारिया | ३,००० |
| १३. | पहाडी कोरबा | ४,००० |
| १४. | बैगा | ३,००० |
| १५. | गडावा | ५,००० |
| १६. | जुआंग | ६,००० |

[* संदर्भ : ट्रायबल डेव्हलपमेंट रिट्रोस्पेक्ट अॅन्ड प्रॉसपेक्ट, भारत सरकार, गृहमंत्रालय, नवी दिल्ली ]

आदिवासींच्या विकासाचा विचार करताना अलगता, एकात्मता आणि सामाजिक न्याय. अशा तीन पद्धतीने मांडणी केली जाते. आदिवासींची वेगळी संस्कृती, त्यांचे दारिद्रय, इतरांनी त्यांचे केलेले शोषण हे लक्षात घेता इतरांना मुक्तपणे आदिवासींशी व्यवहार करू देणे थांबविले पाहिजे. ब्रिटिश काळाप्रमाणे आदिवासी इलाखे अलग केले पाहिजेत अशी एक भूमिका आहे. ही कल्पना राबवायला अवघड, अनावश्यक व अपायकारकहि आहे. आदिवासी जमातींचे बहुतेक ठिकाणी इतरांशी परस्परावलंबी संबंध आहेत. ते तोडणे म्हणजे समाजाची फेरमांडणीच करावी लागेल. आदिवासींचा इतरांमुळे तोटाच झाला आहे हे खरे नाही. आज त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी ज्ञानविज्ञानाची कास धरणे व त्याकरिता बाह्य जगाशी त्यांचे संबंध

प्रस्थापित करणे आवश्यकच आहे. एकात्म व समृद्ध भारताच्या निर्माणात अशी वेगळी बेटे चालणार नाहीत.

आदिवासी हे भारतीय व मुख्यत: हिंदू संस्कृतीचे अविभाज्य भाग आहेत. ब्रिटिशांनी स्वत:च्या सोयीकरिता त्यांना अलग केले. आता त्यांना एकंदर समाजात मिसळवून टाकले पाहिजे. अशी दुसरी एक भूमिका आहे पण अशी टोकाची भूमिकाहि योग्य नव्हे. मुळांत भारतीय समाजच पूर्णत: एकरूप नाही. गरज आहे ती ही की प्रत्येक घटकाला सबंध समाजाच्या उत्थानामध्येच आपलेहि हित आहे अशी खात्री पटण्याची.

तिसरा महत्त्वाचा दृष्टिकोण असा की एकंदर दलित वर्गाला ( आदिवासीसह ) विकासाची पुरेशी संधी दिली पाहिजे. त्याचप्रमाणे आपापल्या गटाच्या संस्कृतीची वैशिष्टचे टिकवण्यासहि मदत केली गेली पाहिजे. मुख्य म्हणजे सामाजिक बदलाचा वेग शासकीय फर्मानांनी नव्हे तर बदलत्या जाणिवांनी ठरविला पाहिजे. अर्थात या सामाजिक न्यायाच्या भूमिकेचे प्रत्यक्ष कार्यक्रमात रूपांतर करण्यामध्ये अनेक अडचणी येणे स्वाभाविक आहे.

गेल्या तीस वर्षाच्या प्रयत्नानंतरहि आदिवासी विकासाच्याबाबतीत इतरांबरोबर आलेले नाहीत. भारतात साक्षरतेचे सर्वसाधारण प्रमाण २४ टक्के आहे. तर आदिवासीमध्ये फक्त ८ टक्के आहे. लुशाईसारखे ४० टक्के साक्षरता असलेले आदिवासी गट अपवादात्मकच आहेत. शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण भारतात ७३ टक्के असले तरी आदिवासीत ते ९१ टक्के आहे. उद्योगधंद्यांत ११ टक्के भारतीय आहेत तर आदिवासी फक्त ३ टक्के आहेत. सरकारी नोकऱ्यांपैकी अधिकाराच्या आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागा भरल्या जाणे दुरापास्त होते, हे सर्वश्रुतच आहे. आदिवासींच्या शेतीत वापरले जाणारे तंत्र जुने असल्याने उत्पादकता कमी आहे. जंगलावरची आदिवासींची पकडहि दिवसेंदिवस ढिली होत आहे.

आदिवासी विकासाचे प्रश्न मोठ्या गुंतागुंतीचे आहेत ते सोडविण्यासाठी प्रथम त्यांची सखोल जाण असणे आगत्याचे आहे. ■ ■

*With Best Compliments From :*

**KULKARNI ENGINEERING ASSOCIATES**

**SANGLI**

With Best Compliments from:—

## Shah Ratanshi Khimji & Co.

Turmeric, Seeds, Grain, Sugar, Oilcake
General Merchants & Commission Agents
Post Box No. 17, 35, Mahavirnagar.
Sangli : 416 416 ( Maharashtra )

**PHONE :**
Offiice : 3051 & 3057
Resi. : M. R. Shah 4133
: Kherajbhai 2395
: Umedbhai 3541
: Uttambhai 2057

**TELEGRAM :**
HAPPY

**TELEX :**
0193 224 HAPPY

**Associated Concerns**

## M/s. R. K. Corporation

**General Merchants & Commission Agent**
**21 A, " Utkarsh ", Mahavirnagar,**
**SANGLI : 416 416 ( Maharashtra )**

**PHONE : Call on–3057** **TELE : Arkeycorp**

## M/s. R. K. Trading Co.

**Dealers in–**
**Oilcake, Fertilizers, Talpatri, Coir,**
**High School Road, Sangli – 416 416**

**PHONE : 3394** **TELEGRAM : HAPPY**

## Shah Madhukar Kalyanji & Co.

**Ceneral Merchants & Commission Agents,**
**Post Box No. : 17, 35 A, MAHAVIRNAGAR**
**SANGLI : 416 416 ( Maharashtra )**

**Phone : OFFICE : 4257** **Tele. : RATNAJYOT**
**Call On : 3051**

# 'जबरन–जोत' जमिनीची समस्या : खास विभाग



आदिवासींचे जीवन मुख्यत: जमिनीवर अवलंबून आहे. परंतु अज्ञान व अन्यायामुळे अनेक आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींकडे हस्तांतरित झाल्या आहेत. अथवा वर्षानुवर्षे कसलेली जमीन अजून त्यांच्या नावावरच झालेली नाही. परिणामत: आज हा 'भूमिहीन भूमिपुत्र' एकतर आपल्याच जमिनीवर गुलाम म्हणून राबतो आहे किंवा स्वत:च्याच जमिनीवर 'अतिक्रमक' ठरला आहे.

'जबरन जोत (अतिक्रमित) जमिनीच्या प्रश्नासंबंधी माहिती देणारे लेख, सरकारी आदेश या खास विभागांत समाविष्ट केले आहेत. 'जबरन जोत' च्या प्रश्नांत आदिवासींच्या न्याय्य हक्कांबरोबरच वन–संवर्धन व पर्यावरणाचे प्रश्नहि गुंतले आहेत. मर्यादित जमीन, वाढती लोकसंख्या, नष्ट होणारी जंगले या पार्श्वभूमीवर ही मागणी कुठवर व कशा प्रकारे पुढे रेटायची याचाहि विचार होणे आवश्यक आहे. म्हणूनच प्रा. शरद कुलकर्णी यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रही भूमिकेतून मांडलेल्या विचारांबरोबरच सर्वांनाच अंतर्मुख करायला लावणाऱ्या प्रा. वसुधा धागमवार यांच्या परखड लेखाचा समावेश या विभागांत करण्यात आला आहे. वनखात्याची या प्रश्नासंबंधीची बाजू समजावून घेण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रमुख वन–संरक्षकांना लेख देण्याची विनंतीहि करण्यात आली होती पण दुर्दैवाने तिला योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही.

आदिवासी जीवनाशी संबंधित असणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांवर सर्वांगाने माहितीपूर्ण चर्चा घडवून आणण्याचा 'हाकारा'चा दर वेळी प्रयत्न राहील. वाचक व कार्यकर्त्यांच्या यासंबंधीच्या सूचना व सहकार्य यांचे आनंदाने स्वागत केले जाईल.

■ ■

# शेतीसाठी केलेली अतिक्रमणे नियमित करण्याचा आदेश

सरकारी पडीक जमिनी–गायराने आणि जंगल जमिनी यावरील शेतीसाठी केलेली अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीच्या सरकारी आदेशाचे मराठी रूपांतर–

महाराष्ट्र सरकार–महसूल आणि जंगल खाते
ठराव नं. एल ई एन–1078/3483–मंत्रालय
मुंबई ४०० ०३२ ता. २७ डिसेंबर. १९७८
संदर्भ : जी. आर नं. एल ई एन-1069/23477 ii
जी आर शेतकी आणि जंगल खाते नं.
एफ एल डी–4860/25760–ई
जी आर शेतकी आणि जंगल खाते नं.
एफ एल डी–486/20878–ई

यापूर्वी सरकारी पडीक जमिनी महसूल खात्याकडील जंगलजमिनी (नाशिक व ठाणे जिल्ह्यातील) जंगल खात्याच्या ताब्यातील जंगलजमिनी आणि गायराने यावरील शेतीसाठी झालेली अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशात काही अटी व नियमही घालून देण्यात आले आहेत. त्याप्रमाणे जंगलखात्याच्या आणि महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी अशी अतिक्रमणे रीतसर करण्यासाठी उपाय योजले आहेत. तरीहि या आदेशानुसार अतिक्रमणे रीतसर करण्यासंबंधी अनेक प्रकरणे अद्यापहि निकाली निघालेली नाहीत, त्याशिवाय नवीन अतिक्रमणेहि झालेली आहेत. अतिक्रमणाच्या बहुसंख्य प्रकरणांत अतिक्रामक मागासवर्गाचे किंवा आर्थिक दृष्टचा दुर्बल घटकांचे लोक आहेत, त्यामुळे सरकारने ३१ मार्च १९७९ रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे रीतसर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलमान्वये पुढील आदेश देण्यात येत आहे.


*With Best Compliments From :*

**Marathe Engineering Industries**

**INDUSTRIAL ESTATE**
**MIRAJ - 416 410**
*( INDIA )*

## २. अतिक्रमणे रीतसर होण्यासाठी पात्रता

**सरकारी पडीक जमिनी**—गायरान जमिनी महसूल जंगलजमिनी आणि जंगलखात्याच्या ताब्यातील जंगल-जमिनी यावरील ३१ मार्च १९७८ रोजी केलेली आणि ३१ मार्च १९७९ रोजी अस्तित्वात असलेली सर्व अतिक्रमणे पुढील नियमानुसार रीतसर होतील

(१) (अ) अतिक्रामक मागासलेल्या वर्गाचा म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती किंवा नवबुद्ध यापैकी असला पाहिजे.

(ब) किंवा त्याचे, त्याच्या कुटुंबातील सर्व सभासदांचे एकूण वार्षिक उत्पन्न ३६०० रुपयांपेक्षा जास्त असता कामा नये.

नोट : बहुतेक प्रकरणात अतिक्रामक मागासलेल्या वर्गांचे आहेत. हे वर्ग आर्थिकदृष्टचा दुर्बल आहेत. त्यामुळे अतिशय थोड्या प्रकरणात अशा अतिक्रामकाचे एकूण वार्षिक एकूण ३६०० रुपयांपेक्षा अधिक असण्याचा संभव आहे. त्यामुळे आणि अतिक्रमणाची प्रकरणे लवकर निकाली लागावीत म्हणून वर निर्देश केलेल्या मागासलेल्या वर्गातील अतिक्रामकाच्याबाबतीत उत्पन्नाच्या मर्यादेची अट लावलेली नाही. मात्र एखाद्या प्रकरणात अतिक्रामक सधन असल्यामुळे त्याचे अतिक्रमण रीतसर करणे इष्ट नाही असे जिल्हाधिकाऱ्याला वाटल्यास त्याने ते प्रकरण पुढील आदेशासाठी सरकारकडे सादर करावे.

(२) अतिक्रामकाचे नेहमीच्या वास्तव्याचे ठिकाण अतिक्रमित जमिनीपासून ८ किलोमीटरपर्यंतच्या मर्यादेतच असले पाहिजे.

(३) अतिक्रामक भूमिहीन असला पाहिजे किंवा त्याच्याकडील कायदेशीर मालकीची जमीन २ हेक्टर जिराईत जमिनीपेक्षा कमी असली पाहिजे.

आणि

(४) दोन हेक्टर जिराईत जमीन एवढेच अतिक्रमण रीतसर केले जाईल. अतिक्रामकाकडे मालक म्हणून वा इतर कोणत्याहि कारणाने जिराईत जमीन असेल तर त्याच्याजवळील एकूण जमीन २ हेक्टर जिराईत जमीन होईल एवढयाच जमिनीवरील अतिक्रमण रीतसर होईल.

## ३. रीतसर होण्यास अपात्र अतिक्रमणे

पुढील प्रकारची अतिक्रमणे कोणत्याहि परिस्थितीत रीतसर केली जाणार नाहीत.

(अ) ३१ मार्च १९७९ नंतर केलेली अतिक्रमणे.

(ब) राज्याच्या सीमेवरील भागांत दुसऱ्या राज्याचे नागरिकत्व असलेल्या व्यक्तिनी केलेली अतिक्रमणे.

टीप : सरहद्दीवरील विभागात गेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदार यादीत नाव नसलेली व्यक्ति तिने सिद्ध केले नाही तर दुसऱ्या राज्याची रहिवासी आहे असे मानले जाईल.

## ४. जंगलजमिनीवरील अतिक्रमणे

जंगलाच्या मध्यभागी असलेली अतिक्रमणे किंवा १० टक्क्यापेक्षा जास्त उताराच्या जंगलजमिनीवरील अतिक्रमणे रितसर करण्यास पात्र असली तरीहि रीतसर केली जाणार नाहीत. मात्र नियमांप्रमाणे त्यांचे जितक्या जमिनीवरील अतिक्रमण रीतसर होण्यासारखे असेल तितकी जमीन त्यांना दुसरी पर्यायी जमीन दिली जाईपर्यंत ठेवता येईल. त्यासाठी रीतसर होण्यास पात्र नसलेली अतिक्रमित जमीन किंवा जंगलाबाहेरील नजिकची जमीन पर्यायी जमीन म्हणून दिली जाईल. ही जमीन लागवडीस योग्य आहे किंवा नाही हे पाहून त्यानंतर त्यांना ते जेवढ्या जमिनीवरील अतिक्रमण रीतसर होण्यास पात्र असतील तेवढी जमीन मिळेल.

## ५. शहरी विभागातील जमीन

महाराष्ट्र रिजनल अँड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट १९६६ या कायद्यान्वये जे शहरी विभाग जाहीर करण्यात आले आहेत, त्यामधील जमिनीवरील अतिक्रमणे रीतसर करताना सरकारची संमती घ्यावी लागेल.

## ६. जंगलतोड

महसूल खात्याच्या ताब्यातील जंगलजमीन व इतर जंगलजमीन यावरील अतिक्रमणे रीतसर करताना त्या जमिनीवरील जंगल तोडले जाईल.

## ७. गायरान जमीन

ज्या गायरान जमिनीवरील अतिक्रमणे रीतसर होण्यास पात्र आहेत त्या जमिनी मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ च्या ५१ व्या कलमाखाली जिल्हाधिकाऱ्याने सरकारच्या ताब्यात घ्याव्यात.

## ८. तुकडे

बॉम्बे प्रिव्हेन्शन ऑफ फ्रॅगमेंटेशन अँड कन्सॉलिडेशन ऑफ होल्डींग ॲक्ट १९४८ अन्वये ठरविलेल्या प्रमाण मर्यादेपेक्षा कमी जमिनीवर अतिक्रमण असेल तर तो तुकडा आहे असे मानले जाईल. अशी अतिक्रमणे रितसर होण्यास पात्र असतील तर ती रीतसर करताना अतिरिक्त सरकारी जमीन देऊन कसण्याचे क्षेत्र प्रमाणित आकारमानाएवढे होईल असे पाहिले जाईल. त्यासाठी पुढील नियम ठरविण्यात आले आहेत.

( अ ) अतिक्रमित तुकड्याजवळ अतिक्रामकाची स्वतःची दुसरी जमिन असेल तर ती अतिक्रमित जमिनीबरोबर एकत्र केली जाईल.

( ब ) अतिक्रमित तुकडा आणि अतिक्रामकाची स्वतःची जमीन यामधे कसण्यास अयोग्य असा सरकारी जमिनीचा पट्टा असेल तर तो पट्टा अतिक्रामकाला दिला जाईल.

( क ) अतिक्रामकाची त्याच्या मालकीची अशी कोणतीही जमीन नसेल आणि अतिक्रमित जमिनीलगत पुरेशी सरकारी जमीन उपलब्ध असेल तर त्यामधून अतिक्रामकाला प्रमाणित आकारमान होईल एवढी जमीन दिली जाईल.

( ड ) अतिक्रमित तुकड्यापासून अतिक्रामकाची स्वतःची जमीन दूर असेल आणि अतिक्रमित जमिनीजवळ सरकारी जमिन उपलब्ध असेल तर अतिक्रामकाला अतिरिक्त सरकारी जमीन देऊन प्रमाणित आकारमान पुरे केले जाईल. मात्र अतिक्रमित तुकडा प्रमाणित आकारमानाच्या ४० टक्क्यांपेक्षा कमी नसेल तरच **फक्त** अतिक्रामकाला अशी जमीन मिळू शकेल.

अतिक्रमित तुकड्यांच्या वरील नियमात न बसणाऱ्या इतर सर्व प्रकरणात अतिक्रमण हटवले जाईल.

## ९. विशिष्ठ प्रकरणे

स्वतःची जमीन असलेल्या अतिक्रामकांची अतिक्रमणे विशिष्ट मर्यादेत रितसर होण्यासारखे असतील, परंतु रीतसर होण्याची मर्याद प्रमाणित मर्यादेपेक्षा कमी असेल अशा प्रकरणात अतिक्रमणे रीतसर केली जाणार नाहीत. ही गोष्ट पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल.

१. अतिक्रमित जमीन– १ हेक्टर

२. अतिक्रामकाची स्वतःची दुसरी जमीन– १·३ हेक्टर

३. अतिक्रमण रीतसर होऊ शकेल एवढी जमीन– ०·७ हेक्टर

४. प्रमाणित जमीन–मर्यादा– ०·८ हेक्टर

वरील प्रकरणात १० आरे अतिरिक्त जमीन देऊन तुकडा निर्माण करणे टाळता येईल. अशा प्रकरणात १० आऱ्यापर्यंत जमीन देऊन अतिक्रमण रीतसर करता येईल. मात्र ज्या प्रकरणात १० आऱ्यांपेक्षा जास्त जमीन द्यावी लागेल अशी अतिक्रमणे रीतसर केली जाणार नाहीत.

## १०. अपात्र अतिक्रमणे हटविणे

वरील नियमानुसार रीतसर होण्यास पात्र नसलेली अतिक्रमणे ताबडतोब हटविली जातील. महसूल खात्याच्या व जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांनी दक्ष राहून कोणतीही नवी अतिक्रमणे होऊ देऊ नयेत. याबाबतीत ढिलाई झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

## ११. आदेश लागू

सध्या अस्तित्वात असलेल्या सर्व अतिक्रमणांना आदेश लागू आहे. अतिक्रमणे रीतसर करण्याची योजना परिशिष्ट 'ए'मध्ये दिलेल्या कालबद्ध कार्यक्रमाप्रमाणे पार पाडली जावी आणि त्यासाठी परिशिष्ट 'बी'मध्ये दिलेल्या सूचना पाळण्यात याव्या. या सूचनांपासून थोडेसे दूर ढळल्यामुळे योजनेची अंमलबजावणी अधिक चांगली, अधिक लवकर आणि कोणतीही गुंतागुंत न होता होणार असेल तर तसे करण्याची अधिकाऱ्यांना परवानगी आहे. मात्र सूचनेत दिलेल्या अतिक्रमणांच्या याद्या करण्याचे काम कोणत्याहि परिस्थितीत टाळता येणार नाही.

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या नावे आणि हुकुमान्वये

सही

**अंडर सेक्रेटरी टू गव्हर्नमेंट**

टीप : वरील अनुवाद शब्दाबरहुकूम व अधिकृत नाही. त्यासाठी इंग्रजी आदेश पहावा.



# मध्यप्रदेश शासन आदेश



## वन विभाग

क्रमांक ५।१८।७८।१०।२, भोपाल दि. २४ अक्टूबर १९७८.

**मध्यप्रदेश में वन भूमि पर हुए अतिक्रमणों के व्यवस्थापन बाबत हिदायतें**

मध्यप्रदेश में वन भूमि पर हुए अतिक्रमणों के व्यवस्थापन हेतु निम्न हिदायतें जारी की जाती है :–

(१) यह हिदायतें मध्यप्रदेश के निम्न क्षेत्रों को लागू नहीं होगी:–

(एक) नगरीय क्षेत्र तथा उसकी सीमा से दो किलोमीटर की परिधि में स्थित क्षेत्र ।

(दो) मध्यप्रदेश राज्य शासन अधिसूचना द्वारा नगर तथा ग्राम निवेश अधिनियम १९७३ के प्रयोजनों के लिये :–

(१) अधिनियम की धारा १३ (१) के अन्तर्गत गठित निवेश-क्षेत्र

अथवा

(२) अधिनियम की धारा ३८ के अन्तर्गत स्थापित नगर तथा ग्राम निवेश प्राधिकारी का क्षेत्र ।

अथवा

(३) अधिनियम की धारा ६४ के अन्तर्गत स्थापित 'निवेश क्षेत्र'।

(तीन) वन्य प्राणी (संरक्षण) अधिनियम १९७२ के अन्तर्गत गठित राष्ट्रीय उद्यान एव अभ्यारण्यों के सम्पूर्ण क्षेत्र ।

परिभाषायें (२) इन हिदायतों में :–

क– अतिक्रामक :– साधारणतः 'अतिक्रामक' से तात्पर्य ऐसे व्यक्ति से हैं की जो ३१-१२-७६ के पूर्व से अनाधिकृत रूप से वन क्षेत्र की कृषि भूमि पर कब्जा कर खेती कर रहा हो,

स्पष्टीकरण – अतिक्रमण की अवधि वन विभाग द्वारा जारी किये गये पी. ओ. आर. अथवा स्थानीय जांच के आधार पर निश्चित की जायेगी ।

ख – आदिवासी जाति:–से तात्पर्य किसी ऐंसी जाति से हे जिसे मध्यप्रदेश भू–राजस्व संहिता, १९५९, की धारा १६५ की उपधारा (६) के अधीन अधिसूचना द्वारा किसी क्षेत्र के संबंध में अनुसूचित जनजाति घोषित किया गया हो ।

ग – अनुसूचित जाति:– 'अनुसूचित जाति' से तात्पर्य ऐसी जाति से हैं जो संविधान (अनुसूचित जातियों) आदेश, १९५०, की अनुसूची के भाग छ : में निर्दिष्ट अनुसूचित जातियों में से हो ।

घ – खेती करना :– 'खेती करने' से तात्पर्य भूमि जोतने और किसानी तौर से उस पर फसल उगाने से है, और 'खेती करना' तथा 'खेती' अभिव्यक्तियों का तदनुसार अर्थ लगाया जायगा ।

च – भूमिहीन व्यक्ति :– 'भूमिहीन व्यक्ति' से तात्पर्य जैसे वास्तविक कृषक व कृषक मजदूर से है जो कीं इस राज्य का वास्तविक निवासी हो तथा जिसके पास । जनवरी १९७८ को :—

(एक) कोई भूमि न हो, अथवा

(दो) पहाडी अथवा पथरीली भूमि में एक हेक्टर या उससे कम असिंचित भूमि हो, अथवा

(तीन) अन्य प्रकार की भूमि में १-२ हेक्टर या उससे कम असिंचित भूमि हो, अथवा

(चार) अपने परिवार के सदस्यों के साथ संयुक्त रूप से उपयुक्त (दो) अथवा (तीन) जैसी स्थिति हो, के अन्तर्गत निर्धारित रकबे से कम भूमि हो, अथवा

(पाच) अपने परिवार के सदस्यों को छोडकर अन्त्र व्यक्ति के साथ संयुक्त रूप से जैसी भूमि, जिसमें उसका व्यक्तिगत हिस्सा उपयुक्त (दो) अथवा (तीन) जैसी स्थिति हो, के अन्तर्गत निर्धारित रकबे से कम हो।

टीप :— (एक) इस खंड के प्रयोजनों के लिये व्यक्ति के परिवार में उसकी पत्नी अथवा पति अवयस्क बच्चे और ऐसे माता पिता, जो उसके साथ रहते हों और उस पर आश्रित हों, शामिल हैं।

(दो) यदि किसी व्यक्ति के पास उसके परिवार के सदस्योंके साथ और ऐसे अन्य व्यक्तिके साथ जो उनके परिवारका सदस्य न हो, भले उस अन्य व्यक्ति का परिवार हो या न हो, संयुक्त रूप से भूमि हो, तो ऐसे अन्य व्यक्ति का हिस्सा इस रूप में माना जायेगा मानों की वह एक अलग व्यक्ति हो।

(तीन) किसी परिवार में एक से अधिक भूमिहीन होने पर ऐसे एक से अधिक भूमिहीनों को भूमि तभी दी जा सकेगी जबकि गांव के समस्त अन्य पात्र भूमिहीन व्यक्तियों भूमि देने पश्चात कोई भूमि वहां शेष रहे।

(चार) एक हेक्टर सिंचित भूमि दो हेक्टर असिंचित भूमि के बराबर मानी जावेगी।

छ — वास्तविक कृषक :— 'वास्तविक कृषक' से तात्पर्य उस व्यक्ति से है जो स्वयं खेती करता हो या जिसके संबंध में युक्ति युक्त रूप से यह प्रत्याशा की जा सकती हो की वह स्वयं खेती करता हो।

ज — अभिव्यक्ति :— 'स्वयं खेती करने' से तात्पर्य स्वयं निजी के लिए खेती करने से है :—

(एक) अपने निजी के श्रम द्वारा, या

(दो) अपने कुटुम्ब के किसी सदस्य के श्रम द्वारा, या।

(तीन) सेवकों द्वारा मजदूरी पर जो की नगद या वस्तू के रूप में देय होगी, किन्तु फसल के अंश के रूप में नही, या

(चार) अपने निजी पर्यवेक्षण या अपने कुटुंबके किसी सदस्यके निजीपर्यवेक्षण के अधीन भाड़े पर रखे गये श्रमिक द्वारा।

झ — व्यवस्थापन अधिकारी : — 'व्यवस्थापन अधिकारी' से तात्पर्य शासन द्वारा इस योजना के अन्तर्गत अतिक्रमणों के व्यवस्थापन हेतु नियुक्त अधिकारी से है।

ट — विशेष कर्तव्यस्थ अधिकारी :— 'विशेष कर्तव्यस्थ अधिकारी' से तात्पर्य उस अधिकारी से है जिसे शासन द्वारा इस योजना को संपन्न करने हेतु इस पदनाम से पदस्थ किया हो।

ठ — मध्यप्रदेश का वास्तविक निवासी :— 'मध्यप्रदेश का वास्तविक निवासी' उसी व्यक्ति को माना जायेगा जो —

(एक) मध्यप्रदेश में पैदा हुआ हो, अथवा

(दो) (क) वह, अथवा

(ख) उसके पालकों में से कोई, अथवा

(ग) उसके पालकों में से कोई जीवित न हो तो उसका वैध अभिभावक (गार्डियन) मध्यप्रदेश में निरन्तर, कम से कम १५ वर्ष से, रह रहा हो।

टीप :—इस प्रयोजन के लिये संबंधित ग्राम पंचायत का प्रमाण-पत्र प्रस्तुत करना आवश्यक होगा।

ड — वन भूमि :— 'वन भूमि' से तात्पर्य ऐसी भूमि से है जो मध्यप्रदेश शासन के वन विभाग के प्रबन्ध में हो।

ढ — नगरीय क्षेत्र :— 'नगरीय क्षेत्र' से तात्पर्य किसी नगर निगम की या नगरपालिका से संबंधित तत्समय प्रवृत्त किसी विधि के अधीन गठित, किसी नगरपालिका या अधिसूचित क्षेत्र की या किसी गांव या गांवो के समूह की सीमाओ के भीतर तत्समय सम्मिलित क्षेत्र से है जो राज्य शासन द्वारा नगरीय क्षेत्र के रूप में निर्दिष्ट किया जावे और अभिव्यक्ति "नगरेतर क्षेत्र" का तदनुसार अर्थ लगाया जावेगा।

## व्यवस्थापन की पात्रता तथा सीमा

(३) इन हिदायतों के अन्तर्गत केवल ऐसे अतिक्रामक को ही व्यवस्थापित किया जावेगा जो भूमिहीन हो व मध्यप्रदेश का वास्तविक निवासी भी हो लेकिन यह की पात्रता रखनेवाले अतिक्रामक के साथ व्यवस्थापन इस प्रकार किया जावेगा की :—

(एक) (अ) अतिक्रमित भूमि का क्षेत्रफल और

(ब) उसकी खुस की भूमि, यदि कोई हो, का क्षेत्रफल कुल मिलाकर असिंचित ५ एकर (दो हेक्टर) से अधिक न हो। लेकिन उसके द्वारा अतिक्रमित भूमि से अधिक भूमि व्यवस्थापित नहीं की जावेगी।

(दो) वन भूमियों के ऐसे छोटे टुकडे जो पहाडी अथवा पथरीली असिंचित भूमि के मामले में एक हेक्टर

से अधिक न हो अथवा अन्य प्रकार की असिंचित भूमि के मामले मे १–२ हेक्टर या उससे कम हो और किसी व्यक्ति को स्वतंत्र रूप से व्यवस्थापित नही किये जा सकते हों, भूमि के बेहतर उपयोग की दृष्टि उससे लगी भूमि के भूधारी को व्यवस्थापित किये जा सकेंगे।

(तीन) यदि भूमि का ऐसा छोटा टुकडा किसी एक भूधारी के खातों से घिरा हो तो वह उसे व्यवस्थापित किया जावेगा। यदि वह एक से अधिक भूधारियों के खातों सें लगा हुवा हो, तो वह उस भूधारी को व्यवस्थापित किया जावेगा जो उसे अधिक सरलता पूर्वक जोत सके और यदि एक से अधिक व्यक्ति ऐसी लाभप्रत स्थिति में हो तो वह ऐसे भूधारी को व्यवस्थापित किया जायेगा जिसका भ–क्षेत्र सबसे कम हो।

**व्यवस्थापन की तैयारी**

(४) व्यवस्थापन की कार्यवाही के लिये प्रत्येक विशेष कर्तव्यस्थ अधिकारी अपने क्षेत्राधिकार में निम्न कार्य करेगा :–

क – अतिक्रमणों का सीमांकन कराना।

ख – अतिक्रमणों से संबंधित नक्शे ट्रेस कराना।

ग – अतिक्रमणों का सर्वेक्षण तथा उनके नक्शे तैयार करना।

घ – अतिक्रमित क्षेत्र के खडे वृक्षे की प्रजाति एवं गोलाजी की जानकारी तैयार करना।

च – वों के मध्य ऐसे अतिक्रमणों की सूचिया प्रपत्र "क" में बताना जिन्हें वहा से हटाकर अन्यत्र बसाया जाना है।

छ – ऐसे अतिक्रमित खंडों का निर्धारण करना जिनको व्यवस्थापन पश्चात वन क्षेत्र से निष्कासित किया जाना है और उनका सीमांकन कराना।

ज – अतिक्रमकों की सूची प्रपंच "ग" मे तैयार कराना।

झ – अतिक्रमकों की प्राथमिक सूची उपलब्ध अभिलेख तथा सर्वेक्षण के आधार पर बनाई जावेगी। तदुपरांत इस सूची को अंतिम रूप देने के लिये निम्नलिखित प्रक्रिया अपनाई जावेगी :–

**(एक) विशेष कर्तव्यस्थ अधिकारी एवं व्यवस्थापन अधिकारी अपना दौरा कार्यक्रम संयुक्त रूप से निश्चित करेंगे और उसकी सूचना कम से कम १५ दिन पूर्व संबंधित ग्रामों, ग्राम पंचायतों व संबंधित परिक्षेत्राधिकारियों को भेजेगे तथा सर्व साधारण के सूचनार्थ डोंडी पिटवाकर मुनादी भी करावेंगे।**

**(दो) दौरे के निश्चित दिनांक को विशेष कर्तव्यस्थ अधिकारी एवं व्यवस्थापन अधिकारी मौके तथा निर्धारित स्थान पर पहुंचकर संबंधित ग्रामवासियों की सभा बुलायेंगे तथा उसमें तैयार की गई अतिक्रामकों की सूची पढकर सुनायेंगे। यदि किसी व्यक्ति द्वारा यह दावा किया जाये की उनका नाम छट गया है तो दोनों अधिकारी संयुक्त रूप से जांच करेंगे। यदि यह पाया जाता है कि वह अतिक्रामक की परिभाषा में आता है तो उसका नाम अतिक्रामकों की सूची में सम्मिलित किया जायेगा। समस्त अतिक्रामकों को प्रारूप 'ख' में आवेदन पत्र प्रस्तुत करना अनिवार्य होगा।**

(तीन) यदि अतिक्रामक द्वारा ३१–१२–७६ के पूर्व वन भूमि पर आधिपत्य कर खेती कर दो फसलें ली हों व उसके अतिक्रमणबाबत पी. ओ. आर. जारी किया गया हो, तो उसके संबंध में जाच कर अतिक्रामकों की सूची में सम्मिलित किया जावेगा।

उपर्युक्त समस्त कार्यवाही पूर्ण होने के पश्चात अतिक्रामकों की अंतिम सूचियां प्रपत्र 'ग' में निम्नानुसार बनाई जायेगी :–

१. ऐसे अतिक्रामकों की सूची जिनका ३१–१२–७६ को अतिकमित वत भूमि पर कब्ज था।

२. ऐसे अतिक्रामकों की सूची जिनका अतिक्रमित भूमि पर ३१–१२–७२ को कब्जा नहीं था किन्तु उन्होंने उस वन भूमि पर दो फसलें ली थीं तथा उनके विरुद्ध पी. ओ. आर. जारी हुआ था।

(चार) यदि विशेष कर्तव्यस्थ अधिकारी व व्यवस्थापन अधिकारी के बीच किसी प्रकरण में मतभेद हो तो वह ऐसा प्रकरण जिले के कलेक्टर को निराकरण हेतु प्रस्तुत करेंगे। ऐसे प्रकरण में कलेक्टर द्वारा दिया गया निर्णय अंतिम होगा।

ट – प्रत्येक अतिक्रमित खंड के संबंध मे विशेष कर्तव्यस्थ अधिकारी निम्नांकित अभिलेख तयार करवा कर संबंधित व्यवस्थापन अधिकारी को उपलब्ध करावेगा :–

(एक) अतिक्रामकों की सूची – दो प्रतियों में

(दो) अतिक्रमित क्षेत्र के नक्शे – दो प्रतियों में

(तीन) बनों के मध्य ऐसे अतिक्रामकों कीं सूची प्रपत्र 'क' में जिन्हें वहां से हटाकर अन्यत्र बसाया जाना है।

## व्यवस्थापन की प्रक्रिया

(५) क – उपर बताये अभिलेख प्राप्त होते ही व्यवस्थापन कीं कार्यवाही प्रारंभ करेगा।

ख – व्यवस्थापन के समस्त प्रकरण मौके तथा निर्धारित स्थान पर ही निपटाये जायेंगे।

**ग – व्यवस्थापन की कार्यवाही प्रारंभ करने से १५ दिन पूर्व व्यवस्थापन अधिकारी अपना दौरा कार्यक्रम निर्धारित कर उसकी अग्रिम सूचना संबंधित ग्रामों, ग्राम पंचायतों एवं संबंधित राजस्व निरीक्षक तथा पटवारी को भेजेगा तथा सर्वसाधारण के सूचनार्थ डोंडी पिटवाकर उसकी मुनादी करावेगा।**

**घ – दौरे के निश्चित दिनांक को व्यवस्थापन अधिकारी निर्धारित स्थान पर पहुंचकर संबंधित ग्रामवासियो की सभा बुलायेगा और उसमें अतिक्रामकों की सूची पढकर सुनायेगा व पूछेगा की किसी व्यक्ति को किसी अतिक्रामक के बारे में कोई आपत्ति तो नही है। आपत्ति केवल नीचे लिखे आधार पर की जा सकेगी :–**

(एक) कीं जिस अतिक्रामक के साथ वन भूमि व्यवस्थापित की जाना है वह मध्यप्रदेश का वास्तविक निवासी अथवा भूमिहीन व्यक्ति नही है।

(दो) की उसके पास निर्धारित सीमा से अधिक भूमि है।

**(तीन) प्रश्नाधीन भूमि किसी सार्वजनिक उपयोग में आती है उसका व्यवस्थापन सार्वजनिक हित में नही है।**

**च – यदि कोई आपत्तियां प्रस्तुत होती हैं तो व्यवस्थापन अधिकारी मौके पर जांच कर उनका निराकरण करेगा।**

छ – व्यवस्थापन अधिकारी आपत्तियों का निराकरण करने के पश्चात :–

(एक) पात्रता रखनेवाले सभी अतिक्रामकों को व्यवस्थापित करेगा।

(दो) व्यवस्थापित भूखंडों का यदि आवश्यक हुआ तो सर्वेक्षण एवं सीमांकन करावेगा ओर उसका नक्शा तैयार करावेगा।

(तीन) प्रत्येक व्यवस्थापित भू-खंड को खसरा नंबर देगा। यदि ऐसे भू-खंड किसी पडोसी ग्राम में जोडना प्रस्तावित हो तो उसे गाव के आखरी नंबर से आगे खसरा नंबर देगा। यदि इस भू-खंड को प्रथक गांव घोषित किया जाना प्रस्तावित हो तो मध्यप्र भू-राजस्व संहिता १९५९ के तत्संबंधी प्रावधानो के अनुसार नये सिरे से खसरा नंबर देगा। यह उस भूमि का 'फील्ड मेप' होगा। लेकिन जहां पूर्व से ही अतिक्रमित भूमि को खसरा नंबर दिये हो वहां नये सिरे से यह नंबर देना आवश्यक नही होगा।

(चार) जिस 'फील्ड मेप' के आधार पर वे तमाम अभिलेख इस वन भूमि के संबंध में तैयार करेगा जो मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता १९५९ के अन्तर्गत तैयार किया जाना आवश्यक हो। ऐसे अभिलेख तैयार करते समय उन समस्त सिद्धान्तों को ध्यान में रखा जावेगा जो उक्त संहिता के अन्तर्गत 'गैर नगरीय क्षेत्र' के बन्दोबस्त के लिये निर्धारित किये गये हैं। (फील्ड मेप) तथा अन्य समस्त अभिलेखा की दो प्रतियां तैयार की जायेंगी। एक प्रति जिले के राजस्व अभिलेखागार में रखी जायेंगीं एवं दूसरी प्रति संबंधित पटवारी को सोंप दी जावेगीं।

(पाच) इस प्रकार तैयार किये गये अभिलेख यदि निष्कासित वन भूमि किसी पडोस के ग्राम में जोडी जा रही है, तो ग्राम के अभिलेख के तब तक पूरक समझे जावेंगे जब तक उस ग्राम का अगला बन्दोबस्त नहीं हो जाता व वितस व्यवस्थापन के उपरान्त उनको उसी प्रकार रखा जायेगा जैसा की ग्राम का दीगर रिकार्ड।

(छः) जहां निष्कासित वन क्षेत्र एक प्रथक ग्राम घोषित किया जाना है वहां उसे एक व्यवस्थापन नंबर आबंटित किया जायेगा जो अगले बन्दोबस्त तक उसका नंबर होगा और राजस्व विभाग द्वारा एतद सम्बन्धी आदेश दिये जायेंगे की वह किस पटवारी हल्के एवं राजस्व निरीक्षक तथा तहसील में शामिल रहेगा। उसका भी अभिलेख हल्के के दीगर ग्रामों के अभिलेखों के अनुरूप अगले बन्दोबस्त तक रखा जावेगा।

(सात) इस अभिलेख के आधार पर प्रत्येक अतिक्रामक को उस भूमि का एक अस्थायी पट्टा प्रपत्र 'आ' में तथा नक्शा दिया जावेगा। पट्टे की दो प्रतियां तयार की जावेंगी। एक प्रति संबंधित अतिक्रामक को दी जावेगी एवं दूसरी प्रति पर सम्बधित राजस्व निरीक्षक यह प्रमाण पत्र दर्ज करेगा की मौके पर संबंधित व्यक्ति को कब्जा दिया गया और उसके

प्रतीक स्वरूप पट्टेदार के हस्ताक्षर प्राप्त करेगा। यह प्रति संबंधित रिकार्ड के साथ सुरक्षित रखी जावेगी साथ ही प्रत्येक व्यवस्थापित व्यक्ति को एक अधिकार एवं ऋण पुस्तिका भी प्रदाय की जावेगी। व्यवस्थापन की कार्यवाही तब तक पूर्ण नहीं समझी जावेगी जब तक इस प्रकार का आधिपत्य दिया जाकर अधिकार एवं ऋण पुस्तिका प्रदाय नहीं कर दी जाती हैं।

## अपील तथा निगरानी

(६) (एक) व्यवस्थापन अधिकारी द्वारा पारित आदेश से यदि कोई व्यक्ति असंतुष्ट हो तो वह ऐसे आदेश की तारीख से ४५ दिन के भीतर जिले के कलेक्टर को अपील प्रस्तुत कर सकेगा। अपील में पारित आदेश अंतिम होगा तथा उसके विरुद्ध किसी उच्च राजस्व न्यायालय में अपील, निगरानी अथवा पूर्नावलोकन प्रस्तुत नहीं किया जा सकेगा।

(दो) निगरानीः—राज्य शासन को यह अधिकार होगा की वह स्वयं किसी भी समय किसी व्यवस्थापन अधिकारी के समक्ष विचाराधीन या उसके द्वारा पारित किये गये किसी भी आदेश के औचित्य के संबंध में अपना समाधान करने के प्रयोजन के लिये किसी भी मामले का अभिलेख मंगा सकेगा, उसकी जांच कर सकेगा तथा उसके संबंध में ऐसा आदेश जारी कर सकेगा जिसे वह उचित समझे। ऐसा करने में वह यदि आवश्यक समझे तो संबंधित पक्षों को सुनवाई का अवसर भी प्रदान करेगा।

## भू-राजस्व

(७) (एक) व्यवस्थापित की नवी भूमि पर भू-राजस्व राजस्व वर्ष १९७५-७६ से देय होगा तथा आगामी बन्दोबस्त तक भू राजस्व की दर पडोस के ग्राम में प्रचलित दरों कें अनुसार रहेगी; परंतु यह रुपये १।—प्रति एकर से कम नही होगी तथा अनुसूचित जाति या आदिवासी जाति के किसी व्यक्ति के लिये यह दर रुपये २।— प्रति एकड से अधिक नहीं होगी।

(दो) व्यवस्थापित भूमि के लिये प्रीमियम भी देय होगा जो भू-राजस्व का २० गुना होगा और तीन बराबर वार्षिक किश्तों में वसूल किया जायेगा।

## अन्य प्रावधान

(८) (एक) प्रत्येक व्यवस्थापित व्यक्ति की भूमि के १।५ भाग पर वृक्ष होना जरूरी होगा। यदि किसी प्रकरण में ऐसा न हो तो ऐसी कमी को संबंधित व्यक्ति नये वृक्ष लगाकर, व्यवस्थापन से एक वर्ष के अन्दर पूरा करेगा।

स्पष्टीकरण :— जिस प्रयोजन के लिये प्रति एकर २० के मान से वृक्ष होना पर्याप्त होगा।


(दो) कोई भी व्यवस्थापित व्यक्ति उसकी भूमि में खडे वृक्ष कलेक्टर की स्वीकृति के बिना नहीं काट सकेगा। कलेक्टर ऐसी स्वीकृत देने के पूर्व वन मण्डलाधिकारी की सहमति प्राप्त करेगा। लेकिन ऐसे वृक्षों से प्राप्त फलोपभोग का वह अधिकारी होगा।

(तीन) यदि व्यवस्थापित व्यक्ति द्वारा कंडिका ८ (१) में दर्शाई गई पूरी कर दी जाती है तथा वह लगातार पांच वर्ष तक खेती कर निर्धारित अवधि में पूरा प्रीमियम भी पटा देता है तो उसे भूमि स्वामी के अधिकार दिये जा सकेगें।

(चार) इन हिदायतों के अन्तर्गत की जानेवाली व्यवस्थापन की कार्यवाही में अविभावक द्वारा प्रतिनिधित्व वर्जित होगा।


## भूमि का समर्पण

(९) व्यवस्थापित व्यक्ति पट्टे की अवधि में किसी भी कृषि वर्ष प्रारंभ होने के ३० दिन पूर्व कलेक्टर को लिखित आवेदन कर अपना अधिकार समर्पित कर सकेगा और ऐसा करने पर उस तारीख के बाद के कृषि वर्ष से वह पट्टेदार नहीं रह जायेगा।




With Best Compliments :

# Well - Wisher



# अतिक्रमणे कायदेशीर करणाऱ्या आदेशांतील त्रुटी

—शरद कुलकर्णी



महाराष्ट्रात आदिवासींची संख्या सुमारे चाळीस लाख असून एकूण लोक संख्येशी त्यांचे प्रमाण सहा टक्के आहे. बहुसंख्य आदिवासी ग्रामीण व डोंगराळ भागात राहतात. महाराष्ट्रातील सव्वीस जिल्ह्यांपैकी एकवीस जिल्ह्यांत आदिवासींची वस्ती आहे. मात्र त्यातील साठ टक्के आदिवासी ठाणे, नाशिक व धुळे या तीन जिल्ह्यातच आहेत. महाराष्ट्रांतील आदिवासींपैकी ग्रामीण भागातील आदिवासींचे प्रमाण सुमारे ९६ टक्के आहे. तर राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ६९ टक्के लोक ग्रामीण भागात राहातात.

बहुसंख्य आदिवासी निर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहेत. १९७१ च्या शिरगणतीनुसार काम करणाऱ्या पुरुषांपैकी सुमारे ९२ टक्के पुरुष आणि स्त्रियांपैकी सुमारे ९५ टक्के स्त्रिया शेतकरी, शेतमजूर आणि खाणी, जंगल व पशूपालन यात काम करणारे होते. बहुसंख्य आदिवासी शेती करीत असले तरी ते कसत असलेल्या शेतीपैकी फक्त ७० टक्के शेतजमीन त्यांच्या मालकीची आहे. बाकीची खंडाने घेतलेली आहे.

### अतिक्रमणाची सुरुवात

लोकसंख्येच्या वाढीबरोबर अधिकाधिक जमीन लागवडीखाली येऊ लागली. स्वातंत्र्योत्तर काळात वाहतुकीच्या साधनांत सुधारणा झाली. त्याचप्रमाणे शेतीविकासावर सरकारने खूप खर्च केला. शेतमालाच्या किमती वाढल्याबरोबर बिगर आदिवासींनी आदिवासींच्या पठारावरील चांगल्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्याबरोबर आदिवासी डोंगरात व जंगलात सरकले आणि तेथील जमिनी त्यांनी लागवडीखाली आणल्या. लागवड योग्य सरकारी मालकीच्या पडिक जमिनीहि मोठ्या प्रमाणावर लागवडीखाली आल्या परंतु या सर्व लागवडी बेकायदेशीर अतिक्रमण अशा स्वरूपाच्या ठरल्या.

महसूल खात्याच्या ताब्यातील जमिनीवर अतिक्रमण करून ती कसणाऱ्यांना त्या खात्याचे अधिकारी दंड करीत आणि त्या हंगामापुरती त्यांची वहिवाट मान्य करीत. जंगल खात्याच्या ताब्यातील जमिनीवर आक्रमण करणाऱ्यांना काही वेळा दंड केला जाई तर काही वेळा हुसकावून दिले जाई. अतिक्रमण करणाऱ्यांना धडा मिळावा म्हणून जमिनीवरील उभी पिके नष्ट केली जात. अनेकदा लांच देऊन अतिक्रमण करणारे शेतकरी या जाचातून आपली सुटका करून घेत. अशा प्रकारची लांच हे जंगलखात्याच्या कर्मचाऱ्याचे उत्पन्नाचे एक महत्त्वाचे साधन झाले होते.

### सरकारी धोरण

मधून मधून सरकारच्या या धोरणाविरुद्ध आंदोलने होत असत आणि त्याचा परिणाम म्हणून अतिक्रामकांना हुसकावून लावण्याचें धोरण तात्पुरते बाजूला ठेवले जाई. काही वेळा खास हुकूम काढून अतिक्रमणाखालील जमिनी अतिक्रामकांना रितसर मालकीच्याहि करून देण्यात आल्या.

शासनाने १९६० मध्ये नेमलेल्या उच्चाधिकार मंडळाने ( १२ ऑगस्ट १९६० ) १९५५–५६ ते १९५९ ६० पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचे ठरविले. ( जी. आर. महसूल व वनविभाग नं. एफ्. एल्. डी.

४८६० । २५७६० ई-दिनांक ३ सप्टेंबर १९६० ) पण त्याविषयीचा जी. आर. फक्त नाशिक जिल्ह्यासाठीच होता. पुढे तो ठाणे जिल्ह्यातहि लागू करण्यात आला. ( जी. आर. महसूल व वनविभाग एफ. एल्. डी.–४८६१।२०८७८–ई दिनांक १ सप्टेंबर १९६१)

त्यानंतर वेळोवेळी शासनाने वनजमिनीवरील अतिक्रमणांची गंभीर दखल घेऊन अतिक्रमणे हटविण्याच्या सूचना दिल्या. १३ ऑगस्ट १९६८ रोजीचा जी. आर. एल्. एन्. डी.–१०६८।१९७५४९।ए. अनुसार अतिक्रामकाने जमिनीवरील उभी पिके कापून घेण्याची वाट न पाहता ताबडतोबीने जमिनी ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या. तेव्हापासून अतिक्रमणे हटविण्याची मोहीम चालूच आहे. तेव्हा ही फक्त आणीबाणीच्या काळातीलच कारवाई आहे हे म्हणणे बरोबर नाही. १९७२ साली केलेल्या पाहणीत असे आढळून आले की, बहुसंख्य अतिक्रामिक हे मागासवर्गीय, भूमीहीन, ज्यांना उपजिविकेचे अन्य साधन उपलब्ध नाही असे आहेत. त्यामुळे १५ ऑगस्ट १९७२ पर्यंत केलेली अतिक्रमणे नियमित करण्याचे ठरले. (जी. आर. महसूल व वनविभाग नं. एल्. ई. एन्. १०६९।२३४७७।ए।२) हा जी. आर. फक्त सरकारी पडिक, गायरान, महसूल खात्याच्या ताब्यातील जंगलजमिनीसाठीच होता. त्यामुळे १४ ऑगस्ट १९७२ चा हा शासनाचा निर्णय वनखात्याकडील, अतिक्रमित जमिनींना लागू नव्हता. वरील आदेशांच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी राहिल्या आणि त्यांचा फायदा बऱ्याच अतिक्रामकांना मिळाला नाही. या प्रश्नावरून एका बाजूला जंगल व महसूल खात्याचे अधिकारी आणि पोलिस व दुसऱ्या बाजूला आदिवासी आणि बिगर आदिवासी अतिक्रामक यामधील तेढ चालूच राहिली.

शेतकऱ्यांना अशा जमिनीवरून हुसकावून लावण्याचे प्रकार आणीबाणीत मोठ्या प्रमाणावर झाले व त्या वेळच्या दहशतीच्या वातावरणात त्याविरुद्ध दाद मागता आली नाही. तसेच प्रसिद्धीही मिळू शकली नाही. परंतु एकदा एक निश्चित कालमर्यादा ठरवून त्याआधी वहितीखाली असलेल्या जमिनींची मालकी शेतकऱ्यांना द्यावी अशी मागणी आणीबाणीनंतर जोरात पुढे आली. १७ डिसेंबर १९७८ रोजी सरकारने एक आदेशाने वहितीखाली असलेल्या पडिक जमिनींची गायरानांची किंवा जंगलजमिनींची मालकी त्या कसणाऱ्या शेतकऱ्यांना द्यावी असे जाहीर केले आहे. (रेव्हिन्यू अॅण्ड फॉरेस्ट डिपार्टमेंट जी. आर. १०७८। ३४८३–जी. एल. –तारीख २७ डिसें. १९७८ ).

**या आदेशाचा उद्देश चांगला आहे. त्यामुळे आदिवासींचा आणि दलितांचा फायदा होणार आहे. परंतु या आदेशातील काही महत्त्वाच्या त्रुटी मूळ उद्देशाच्या आड येणाऱ्या आहेत. तसेच आजवरचा अनुभव लक्षात घेता या आदेशाची अंमलबजावणी कशी होईल या विषयीही शंका आहे. या दृष्टीने या आदेशाचे परीक्षण करणे आणि वेळीच काही दुरुस्त्या सुचविणे आवश्यक आहे.**

## अतिक्रमण कायदेशीर करण्याच्या अटी

१) ३१ मार्च १९७८ रोजी वहितीखाली असलेल्या पडिक जमिनी, गायराने व जंगल जमिनी यावरील अतिक्रमण मान्य करून त्यांची मालकी त्या कसणाऱ्याकडे दिली जाईल. मात्र यासाठी अतिक्रमण करणारा मागासवर्गीय म्हणजे आदिवासी, वर्गीकृत जातीचा, विमुक्त जातीचा किंवा नवबौद्ध असला पाहिजें. किंवा त्याचे (त्याच्या कुटुंबातील सर्व माणसांचे धरून) वार्षिक उत्पन्न ३६०० रुपयांपेक्षा जास्त असता कामा नये. (सर्वसाधारणपणे दलित जातीजमातीच्या लोकांचे वार्षिक उत्पन्न ३६०० रुपयांपेक्षा जास्त नसते असे मानून त्यांच्या बाबतीत उत्पन्नाची मर्यादा घालण्यात आलेली नाही. परंतु जिल्हाधिकाऱ्याला अतिक्रमण करणारा सधन आहे व त्यामुळे त्याला जमीन देणे इष्ट नाही असे वाटले तर त्याने ते प्रकरण सरकारकडे पाठवावे असे सुचविले आहे.

२ ) ज्या जमिनीवर अतिक्रमण झाले आहे ती जमीन अतिक्रमण करणाऱ्याच्या नेहमीच्या वास्तव्याच्या ठिकाणापासून आठ किलोमीटर अंतरापर्यंत असेल तरच त्याचे अतिक्रमण कायदेशीर केले जाईल.

३) अतिक्रमण करणारा भूमिहीन असला पाहिजे किंवा त्याच्याकडे कायदेशीररीत्या आलेली जमीन दोन हेक्टर जिराईत जमिनीपेक्षा कमी असली पाहिजे अशी तिसरी अट आहे.

४) दोन हेक्टर जिराईत एवढ्याच जमिनींवरील अतिक्रमण कायदेशीर केले जाईल; जर अतिक्रमण करणाऱ्याच्या मालकीची जमीन असेल तर त्याच्याजवळील एकूण जमीन दोन हेक्टर जिराईत जमीन होईल तेवढीच त्याला मिळेल.

## कायदेशीर केली न जाणारी अतिक्रमणे

काही जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर केली जाणार नाहीत असे आदेशात स्पष्ट नमूद करण्यात झाले आहे. या अतिक्रमणात ३१ मार्च १९७८ नंतर झालेली अतिक्रमणे व महाराष्ट्रातील सरहद्दीवरील विभागात महाराष्ट्रांचे नागरिकत्व नसलेल्या लोकांची अतिक्रमणे यांचा समावेश आहे. गेल्या विधानसभा मतदारसंघ यादीत नाव नसलेले लोक बाहेरच्या राज्यातील आहेत असे समजले जाईल व अशा लोकांनी महाराष्ट्रातील रहिवासी आहोत हे सिद्ध केल्याखेरीज त्यांना जमीन मिळणार नाही.

**जंगलजमीन** : जंगलाच्या मध्यभागातील जमीन किंवा १० टक्क्यापेक्षा जास्त उतार असलेल्या जंगल जमिनीवरील अतिक्रमणे वर दिलेल्या इतर अटी पुऱ्या होत असल्या तरी कायदेशीर केली जाणार नाहीत. मात्र अशी अतिक्रमणे करणाऱ्यांना या आदेशाप्रमाणे मिळू शकेल एवढी दुसरी जमीन देण्यात येईल व तोपर्यंत त्यांना त्यांच्या जमिनींवरून हुसकावून लावले जाणार नाही.

**शहरी विभागातील जमीन** : नागरी विभागात मोडणाऱ्या जमिनीतील अतिक्रमणे सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय कायदेशीर केली जाणार नाहीत.

**गायरान जमीन** : वहितीखाली असलेल्या गायरान जमिनी अतिक्रमण करणाऱ्यांना देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याला पंचायतीकडून आपल्या ताब्यात घ्याव्या लागतील.

**तुकडेजोड** : काही ठिकाणी सरकारने किमान म्हणून ठरविलेल्या आकारमानापेक्षा कमी आकारमानाचे तुकडे लागवडीखाली आहेत. अशा वेळी जवळची दुसरी जमीन अतिक्रमण करणाऱ्यांना द्यावी व तुकडा किमान आकारमानाचा होईल असे बघावे. अशासाठी काही तरतुदी या आदेशात आहेत. तुकडा किमान आकारमानाचा होण्यासाठी अतिक्रमण न केलेली काही जमीन त्या जमिनीत सामील करावी अशीही एक तरतूद आहे.

**बेकायदेशीर अतिक्रमणे हटविणे** : या आदेशानुसार जी अतिक्रमणे रीतसर ठरणार नाहीत ती ताबडतोब हटवावीत असा स्पष्ट आदेश आहे. याबाबतीत महसूल व जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांनी दक्ष रहावे व कोणतेही नवीन अतिक्रमण होऊ देऊ नये. या गोष्टीत ढिलाई झाल्यास सरकार त्याची गंभीर दखल घेईल.

**कालबद्ध कार्यक्रम** : या आदेशातील तरतुदी अतिक्रमणाखालील असलेल्या सर्व जमिनींना लागू आहेत. त्या अंमलात आणण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम आदेशाला जोडलेल्या सूचनांत देण्यात आला आहे. त्याप्रमाणे महसूल खात्याने सरकारी पडिक जमीन, महसूल जंगल जमीन आणि गायरान जमीन यावरील अतिक्रमणांची यादी २० जानेवारी १९७९ पर्यंत तयार करावयाची होती. तर जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांनी अशी यादी जंगल जमिनीच्या बाबतीत करावयाची होती. सर्व जमिनीच्या बाबतीत अतिक्रमण करणाऱ्याच्या वास्तव्याचे ठिकाण, त्याच्या मालकीची इतर जमीन आणि आवश्यक असेल तेथे त्याचे उत्पन्न या गोष्टीची माहिती जमवून अतिक्रमण रीतसर होऊ शकेल का हे ठरवावयाचे होते.

त्याप्रमाणे जमिनीचे मोजमाप, सीमा आणि अंदाजे त्याला भरावा लागणारा शेतसारा या गोष्टी १५ मार्च १९७९ पर्यंत ठरवावयाच्या होत्या. ३१ मार्चपर्यंत अतिक्रमण रीतसर केल्याचे हुकूम आणि जमिनींची माहिती व शेतसारा नमूद करून पट्टे द्यावयाचे होते. तर ३१ मे पर्यंत मोजणी व जमिनी महसुलाचा आकार पक्का ठरवून त्याप्रमाणे पट्ट्यांमध्ये फेरफार पूर्ण करावयाचे होते.

**अतिक्रमणांच्या याद्या** : महसूल खात्याने सरकारी पडिक जमीन, गायरान जमिनी आणि महसूल खात्याच्या ताब्यातील जंगल जमिनी यावरील अतिक्रमणांच्या गावानुसार स्वतंत्र याद्या कराव्यात. जंगल खात्याने जंगलातील जमिनीवरील अतिक्रमणांच्या याद्या कराव्यात. त्याचबरोबर, जंगलाच्या मध्यभागी असलेल्या अतिक्रमणांच्या व १० टक्क्यापेक्षा जास्त उतार असलेल्या जमिनीवरील अतिक्रमणाच्या याद्या कराव्यात अशा सूचना होत्या.

कित्येक भागात अतिक्रमण करणारे फक्त खरीपातील पिकेच घेतात. अशावेळी ३१ मार्च १९७८ रोजी अतिक्रमण केलेली जमीन ती कसणाऱ्याच्या प्रत्यक्ष ताब्यात नसते. ही अडचण लक्षात घेऊन अतिक्रमण करणाऱ्याच्या ताब्यात १९७७–७८ खरीप मोसमात आणि १९७८–७९ खरीप मोसमात जमीन होती असा सबळ पुरावा असेल तर ती त्याच्या ताब्यात ३१ मार्च १९७८ रोजी होती असे गृहीत धरून या आदेशाप्रमाणे

अतिक्रमण रीतसर करावे अशी सूचना आहे.

**अतिक्रमणाचा पुरावा :** अतिक्रमणाचा पुरावा म्हणून सर्व रेकॉर्ड लक्षात घ्यावे. त्याचबरोबर अतिक्रमण करणारा जो पुरावा सादर करू शकेल तोहि लक्षात घ्यावा. सर्वसारणपणे पिक–पाणी पत्रकातील नोंदी हा अतिक्रमणाचा मुख्य पुरावा असतो. परंतु इतर पुरेसा पुरावा असेल तर पिक–पाणी पत्रकात नोंद नाही एवढ्याच सबबीवर अतिक्रमण करणाऱ्याला रीतसर पट्टा देण्याचे नाकारू नये.

त्याशिवाय याद्या कशा तयार कराव्यात. जमिनीची मोजणी कशी करावी याविषयी आदेशांत सूचना होत्या.

**आदेशातील त्रुटी :** या आदेशात अनेक गंभीर त्रुटी आहेत. या त्रुटीमुळे आदेशाचा मूळ उद्देशच विफल होणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या आदेशाच्या मानाने मध्यप्रदेश सरकारने वनजमिनीवरील अतिक्रमणे रीतसर करण्याबाबत काढलेला आदेश कितीतरी चांगला आहे.

(मध्यप्रदेश शासन वनविभाग क्र. ५।१८।७८।१०१२ भोपाल, दि. २४ ऑक्टोबर. १९७८)

१) **अतिक्रमण अस्तित्वात आलेली तारीख :** या आदेशाप्रमाणे अतिक्रमण कायदेशीर होण्यासाठी ते सध्या अस्तित्वात असले पाहिजे आणि ते ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असले पाहिजे. खरीप पिके घेणाऱ्या अतिक्रमण करणाऱ्यांच्या ताब्यात १९७७–७८ व १९७८–७९ व खरीप मोसमात जमीन असेल तर ती त्याच्या ताब्यात ३१ मार्च १९७८ रोजी आहे असे मानण्याची तरतूद आदेशात आहे. आणीबाणीत दोन वर्षे अनेक अतिक्रमण करणाऱ्या अनेक आदिवासींना त्यांच्या जमिनीवरून जबरदस्तीने हुसकावून लावण्यात आले. अशा शेतकऱ्यांना या आदेशाचा फायदा मिळणार नाही. त्यादृष्टीने ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे या शब्दप्रयोगाऐवजी ३१ मार्च १९७८ रोजी **किंवा त्याआधी** अस्तित्वात असलेली अतिक्रमणे असा शब्दप्रयोग करावयास पाहिजे.

आणीबाणीत झालेल्या अन्यायांची सरकारने दखल घेतली नाही. या विरुद्ध खूप ओरडा झाला. त्यामुळे शासनाने आपला निर्णय बदलून एप्रिल १९७२ ते मार्च १९७८ या कालात अस्तित्वात असलेली अतिक्रमणे रीतसर केली जातील अशी नवी भूमिका जाहीर केली. ही भूमिका देखील सदोष आहे. अनेक आदिवासी कार्यकर्त्यांनी अतिक्रमणांचा पुरावा मान्य करताना १९६० ते १९७८ या काळातला कोणत्याहि वर्षाचा वा वर्षांचा पुरावा स्वीकारावा अशी मागणी केली आहे. त्यावर १९६० ते १९७८ या काळात एकच जमीन दोन-तीन किंवा अधिक अतिक्रामकांनी कसली असण्याची शक्यता आहे आणि त्या सर्वांना जमीन देणे शक्य नाही अशी भूमिका जंगल अधिकाऱ्यांनी घेतली आहे आदिवासी कार्यकर्त्यांची भूमिका समजावून न घेता सरकार जंगल अधिकाऱ्यांचेच म्हणणे ग्राह्य धरीत आहे. आदिवासी कार्यकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे १९६० ते १९७८ पर्यंतच्या कोणत्याही वर्षाच्या अतिक्रमणाचा पुरावा ग्राह्य धरावा. एकच जमीन वेगवेगळ्या अतिक्रामकांनी कसली असण्याची शक्यता अतिशय कमी आहे. अशा प्रकरणात एकाच अतिक्रामकाला जमीन देता येईल हे बरोबर आहे. अशा प्रकरणात कोणत्या अतिक्रामकाला जमीन द्यावी या संबंधीचे नियम सरकारने ठरवून द्यावे.

या बाबतीत मध्यप्रदेश शासनाचा आदेश अधिक चांगला आहे. या आदेशात ज्यांनी विशिष्ट तारखेपूर्वी (३१–१२–१९७६) किमान दोन वर्षे अतिक्रमण केले असेल त्यांना अतिक्रमित जमीन द्यावी अशी तरतूद आहे. अशा प्रकारची तरतूद महाराष्ट्र सरकारने आपला आदेश सुधारताना केली पाहिजे. कारण १९७२ पर्यंतचे आदेश योग्यरीत्या अंमलात आलेले नाहीत. १९७२ ते १९७८ या काळाचा विचार केल्यास अनेक आदिवासी अतिक्रामकांना या आदेशाचा फायदा मिळत नाही. अनेक आदिवासी १९६०ते१९६६ या काळात अतिक्रमित जमीन कशीत होते. १९६६ ते ६८ या काळात त्यांना त्यांच्या जमिनीवरून हुसकावून लावण्यात आले. त्यापैकी कित्येकांनी १९६८ नंतर जमीन पुन्हा कसणे सुरू केले; परंतु त्याबाबतचा पुरावा त्याच्याकडे नाही. काहींनी १९६८ नंतर ती जमीन कसली नाही. या सर्व आदिवासींना आदेशाचा फायदा मिळावयाचा असेल तर १९७२ ते १९७८ या काळाचा आग्रह न धरता १९७८ पूर्वी किमान दोन वर्षे अस्तित्वात असणारे अतिक्रमण रीतसर केले जाईल अशी भूमिका शासनाने घ्यावी.


जंगल जमिनीवरील अतिक्रमणे रीतसर करण्यामुळे जंगलजमिनीचे प्रमाण फार कमी होईल आणि त्याचा पावसावर व हवामानावर विपरीत परिणाम होईल

अशी भिती काही मंत्री लोकांना घालीत आहेत. मंत्र्यांची पावसापाण्याची काळजी अतिशय स्तुत्य आहे. जनतेच्या कल्याणाचा एवढा दीर्घकालीन विचार करणारे मंत्री विरळाच. याबाबतीत म. प्र. शासनाने केलेली एक तरतूद या मंत्र्यांना माहीत असती तर फार बरे झाले असते. अतिक्रमित जमिनीच्या किमान एक पंचमांश भागावर झाडे असली पाहिजेत. नसल्यास एक वर्षाच्या आत ती लावली गेली पाहिजेत अशी तरतूद त्या आदेशात आहे.

जंगलाचा नाश आदिवासी करीत नसून जंगलखातेच मोठ्या प्रमाणावर करते हा सर्व भारतातला अनुभव आहे. उत्तर प्रदेशात 'चिपको' आंदोलन जंगलखात्याच्या जंगलसंहाराविरुद्धच उभे राहिले. जंगलांचा नाश अनेक सरकारी प्रकल्पांमुळे देखील झाला, आणि होत आहे. एकटच्या ठाणे जिल्ह्यात दापचरी, सूर्या, वांदरी, सूत्रकार, कैनाड, कुर्झे, कवडास, धामणी, रायतळी, साखरा वगैरे प्रकल्पांसाठी बरीच जंगल जमीन कामी लागली. त्याशिवाय लागवडी खाली असलेली हजारो एकर शेतजमीन ताब्यात घेऊन आदिवासींच्या उदर निर्वाहाचे सर्वांत मोठे साधन त्यांच्या हातून काढून घेण्यात आले. शहरांतील लोकांसाठी असणाऱ्या या प्रकल्पांच्यावेळी जंगल कमी होत आहे असा ओरडा कुणी करत नाही. आदिवासींनी लागवडीखाली आणलेली जमीन त्यांना देतानाच असा ओरडा होतो यातील मर्म समजावून घेतले पाहिजे.

**त्याशिवाय जंगलखात्याच्या ताब्यातील नकाशांत दाखविलेल्या सर्वच जमिनींवर जंगल नाही ही वस्तुस्थिती स्पष्ट केली पाहिजे. नकाशावर जंगल म्हणून दाखविलेली बरीच जमीन लागवडीखाली आहे किंवा पडिक आहे. या जमिनींवरील अतिक्रमणे रितसर केल्यामुळे प्रत्यक्षात जंगल कमी होण्याचा फारसा संभव नाही.**

सरकारी अधिकारी आदेश काढताना तो फारसा अंमलात येऊ अशा तरतुदी मुळातच करतात. आदेश काढल्यानंतर त्यात बदल करणे हा सरकारच्या प्रतिष्टेचा प्रश्न होतो. हे सरकारी अधिकाऱ्यांना चांगलेच माहीत आहे. याचे एक उदाहरण योग्य ठरेल. आणीबाणीच्या आणि नंतरच्या काळात लागवडीसाठी जमीन द्यावी म्हणून ठाणे जिल्ह्यातील सुमारे १२०० आदिवासींनी अर्ज केले. या सर्व आदिवासींना



**'भूसुधार वाटप खात्या'कडून आणीबाणीत पाठविण्यात आलेले हे गूढ पत्र ! या खात्याचा पुढे पत्ता लागला नाही. परंतु जमिनीच्या आशेने त्या काळात अनेक आदिवासी नसबंदीच्या शस्त्रक्रियेला बळी पडले.**

देण्यासाठी जिल्ह्यांत काहीहि जमीन उपलब्ध नाही असे एकजात छापील उत्तर मिळाले. मात्र ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी याच काळात अल्याळी या गावात २५ एकर जमीन तीन निवृत्त सैनिक अधिकाऱ्यांना दिली. याविरुद्ध सत्याग्रह होऊनही आणि महाराष्ट्राच्या समाजकल्याण मंत्र्यांना आणि भारताच्या राज्यमंत्र्यांना निवेदने देऊनहि काहीहि उपयोग झाला नाही. आदिवासींच्या कल्याणाच्या बढाया मारणारे शासन आदिवासी विभागातील जमीन आदिवासीखेरीज इतर कोणालहि देऊ नये अशी तरतूद करीत नाही आणि आदिवासी कशीत असलेली जमीन त्यांना रीतसर पट्ट्याने देताना जंगलाचा नाश होत असल्याबद्दल अश्रू

ढाळते याचा अर्थ आदिवासींना आणि त्यांच्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कळल्याशिवाय रहात नाही.

या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी एक कालबद्ध कार्यक्रम आखून देण्यात आला होता. आदेश जाहीर झाल्यापासून (२७ डिसेंबर १९७८) एक महिन्याच्या आंत म्हणजे २० जानेवारी १९७९ पर्यंत अतिक्रमणाची यादी तयार करावी आणि २० फेब्रुवारीपर्यंत त्यातील कोणती अतिक्रमणें कायदेशीर करण्यायोग्य आहेत हे ठरवावे असा कार्यकम होता. ही कालमर्यादा घालतांना फारसा विचार झाला आहे असे वाटत नाही. अतिक्रमणांची एक यादी विशेषतः दंड झालेल्यांची यादी गाव अधिकाऱ्याजयळ असते. तसेच ज्या जंगलखात्याच्या ताब्यातील जमिनीवर अतिक्रमण झाल्याबद्दल काही कारवाई करण्यात आली आहे त्यांची यादी अधिकाऱ्यांजवळ असते. परंतु गावातील जंगल जमिनीतील सर्व अतिक्रमणांची यादी तयार करण्यासाठी घालून दिलेला काळ अगदी अपुरा होता. आदेश जाहीर होऊन तो गावअधिकाऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत यातील १५–२० दिवस जातील. अशा परिस्थितीत ७–८ दिवसात काय होणार याची शंकाच होती.कालबद्ध कार्यक्रम ठरविणे ही एक चांगली गोष्ट आहे. पण कालमर्यादा अतिशय अपुरी ठेवणे अंमलबजावणीला अपकारक ठरणारे आहे. आमच्या माहितीप्रमाणे प्रत्यक्ष अतिक्रमणांच्या एक चतुर्थांश अतिक्रमणेदेखील सरकारी याद्यात आलेली नाहीत.

या बाबतीतहि महाराष्ट्र शासनाला मध्यप्रदेश शासनाच्या आदेशापासून बरेच शिकण्यासारखे आहे. मध्यप्रदेश शासनाच्या आदेशात अंमलबजावणीसाठी विशेष अधिकारी नेमण्याची तरतूद आहे. आणि या अधिकाऱ्यांनी निश्चित कोणती कामे करावयाची हे ठरवून देण्यात आले आहे. अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याची तरतूद आहे आणि विशिष्ट कालातच हे सर्व झाले पाहिजे असे बंधन घातलेले नाही.

**अतिक्रमणाचा पुरावा** : अतिक्रमणाचे पीक–पाणी पत्रक व जंगल जमिनीवरील आक्रमण गुन्ह्याचा अहवाल (एफ. ओ. आर.) याशिवाय इतरहि सबळ पुरावा मान्य करावा असे आदेशाच्या अंमलबजावणीच्या सूचनेत म्हटले आहे. पण इतर सबळ पुरावा म्हणजे काय याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. लागवडीखाली असलेल्या जमिनीचे स्वरूप (खाचरे वगैरे) व शेजारच्या शेतकऱ्यांच्या साक्षी सबळ पुरावा होऊ शकेल. त्या दृष्टीने सबळ पुरावा म्हणजे काय हे अधिक स्पष्ट केले पाहिजे. कारण अनेक आक्रमण करणाऱ्यांनी दंड टाळण्यासाठी सरकारी कामगारांना लाचलुचपत दिली आहे. त्यामुळे दंडाचा किंवा इतर सरकारी पुरावा त्यांच्याकडे नाही. त्या दृष्टीने सबळ पुरावा म्हणजे काय हे अधिक स्पष्ट होणे आवश्यक आहे.

या बाबतीतहि मध्यप्रदेश शासनाचा आदेश अधिक चांगला आहे. महाराष्ट्राच्या आदेशात अतिक्रामकाने अर्ज भरण्याची सोय नाही. मध्यप्रदेशाच्या आदेशात अतिक्रामकाने द्यावयाच्या अर्जाचा नमुना देण्यात आला आहे. त्याखेरीज आदेशाच्या अंमलबजावणीसाठी नेमलेल्या विशेष अधिकाऱ्यांनी अतिक्रामकांची एक वेगळी यादी द्यावयाची आहे. या कामासाठी नेमलेल्या विशेष अधिकाऱ्याने व्यवस्थापन अधिकाऱ्याबरोबर दौरा करावा. या दौऱ्याची सूचना १५ दिवस आधी दवंडी पिटवून देण्यात यावी. गावसभा बोलावून सरकारी अधिकाऱ्यांनी तयार केलेली अतिक्रामकांची यादी वाचून दाखवावी. आपले नाव या यादीत नाही अशी तक्रार कोणी केल्यास दोन्ही अधिकाऱ्यांनी एकत्रित चौकशी करावी. दिलेल्या नमुन्यात सर्व अतिक्रामकांचे अर्ज भरून घ्यावेत आणि यादीतून सुटलेल्या माणसांचा दावा योग्य असेल तर त्यांचे नाव यादीत घालण्यात यावे. मात्र अतिक्रामक मध्य प्रदेशचा रहिवासी असला पाहिजे. अतिक्रमित जमीन ३१ डिसेंबर १९७६ रोजी त्याच्या कबजात असली पाहिजे किंवा या तारखेपूर्वी त्याने त्या जमिनीवर दोन पिके घेतली असली पाहिजेत अशा अटी आहेत.

अतिक्रमण रीतसर करण्याची प्रक्रिया देखील मध्यप्रदेशाच्या आदेशात सविस्तर देण्यात आली आहे. अतिक्रामकांच्या याद्या झाल्यानंतर अंमलबजावणी अधिकारी संबंधित गावातील लोकांची सभा बोलावील. या सभेत अतिक्रामकांची यादी वाचून दाखवण्यात येई. व त्यावर कोणाचा आक्षेप असल्यास विचारले जाई. असे आक्षेप तीन कारणांनी घेता येतील–१) अतिक्रामक मध्यप्रदेशचा रहिवासी नाही किंवा भूमिहीन नाही. २) त्याच्याजवळ ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षा अधिक जमीन आहे. ३) अतिक्रमित म्हणून नोंदलेली जमीन दुसऱ्या सार्वजनिक उपयोगात आणली जात आहे किंवा ती रीतसर करणे सार्वजनिक हिताचे

नाही. अशा आक्षेपांचे निराकारण अंमलबजावणी अधिकारी करतील. त्यानंतर अतिक्रमीत जमिनीचे सर्वेक्षण करण्यात येतील. त्यांना सर्व्हे नंबर देण्यात येतील, त्याप्रमाणे कागदपत्रे तयार केली जातील व जमिनीचा कबजा अतिक्रामकाला दिला जाईल.

**कमी अतिक्रमणाच्या नोंदी :** दंड कमी असावा म्हणून अतिक्रमणाची जमीन कमीत कमी नोंदली गेली आहे. त्यासाठी सरकारी सेवकांनी शेतकऱ्यांकडून बक्षीसेहि घेतली आहेत. काही ठिकाणी तर राबाखाली आलेली जमीन अतिक्रमित जमीन म्हणून दाखविली आहे अतिक्रामित जमीन सरकारने ठरविलेल्या किमान आकार मानापेक्षा कमी असेल अतिक्रामकाला आणखी जमीन देऊन किमान आकारमानाऐवढी जमीन व्हावी अशी तरतूद आदेशांत आहे. अतिक्रामकाजवळ स्वतःची काहीहि जमीन नसेल आणि अतिक्रमित जमिनीजवळ सरकारी जमीन उपलब्ध असेल तर त्याला ती देऊन किमान आकारमान होईल असे बघावे अशी एक तरतूद आहे. अतिक्रामकाची स्वतःची काही जमीन असेल परंतु ती अतिक्रमित जमिनीपासून अंतरावर असेल आणि अतिक्रमित जमिनीच्या आसपास देण्यासारखी सरकारी जमीन असेल तर त्याला ती देऊन अतिक्रमित तुकड्याचे आकारमान प्रमाणित तुकड्या एवढे करावे अशीहि एक तरतूद आहे. परंतु त्यासाठी एक अट जाचक आहे ती म्हणजे अतिक्रमीत जमिनीचे आकारमान प्रमाणित आकारमानाच्या ४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये. म्हणजे स्वतःची थोडी फार जमीन असणाऱ्या अतिक्रामकांना अतिक्रमित जमीन ३२ गुंठे किंवा अधिक असेल तरच मिळू शकेल व त्याशिवाय २ एकर आकारमान होईल अशी दुसरी जमीन मिळू शकेल. अतिक्रमित जमीन ३२ गुंठ्यांपेक्षा कमी असल्यास त्याचे अतिक्रमण रीतसर होणार नाही. अनेक कारणांमुळे अतिक्रमणाची जमीन अतिशय कमी दाखवून दंड करण्यात आले आहेत. त्यामुळे या तरतुदीचा फटका अनेकांना बसणार आहे. पालघर तालुक्यात वनाधिकाऱ्यांनी अतिक्रमणांची जी यादी तहसीलदाराकडे पाठविली आहे तिच्यात २०७ अतिक्रमणे आहेत. त्यापैकी ८४ टक्के जणांची जमीन ३२ गुंठ्यांच्या आत आहे. त्यापैकी ८६ जणांची अतिक्रमित जमीन ५ गुंठ्यांच्या आत आहे तर ४२ जणांची जमीन ६ ते १० गुंठे आहे, या आदेशाचा फायदा आदिवासींना व्हावयाचा असेल तर ही तरतूद बदलणे अपरिहार्य आहे.

**जमीन नोंदणी :** चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावांचा सर्व्हे बऱ्याच वर्षात झालेला नाही. त्यामुळे अतिक्रमण झालेल्या जमिनीविषयी बरोबर नोंदी नाहीत. अतिक्रमणाची नोंद झालेली जमीन जंगलखात्याच्या ताब्यात आहे की महसूल खात्याच्या ताब्यात आहे याची माहिती आदिवासींना नाही. तसेच सरकारी अधिकाऱ्यांनाहि नाही. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात तरी अतिक्रमणांची यादी करताना अतिशय काळजी घेतली जाणे जरूर आहे. इतरहि जिल्ह्यात ही अडचण काही प्रमाणात येण्याचा संभव आहे.

**कायदेशीर न होणारी अतिक्रमणे हटविण्याची तरतूद :** या आदेशाप्रमाणे जी अतिक्रमणे कायदेशीर करता येणार नाहीत ती हटवून जमिनी अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावा असा आदेश आहे. या कामात ढिलाई झाल्यास त्याची विशेष नोंद घेतली जाईल असेहि त्या आदेशात म्हटले आहे. त्याप्रमाणे अनेक जमिनीवरून गेली काही वर्षे त्या कसणाऱ्या शेतकऱ्यांना हटविण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. वास्तविक पहाता अजून अतिक्रमणे कायदेशीर करण्याची कारवायी अनेक ठिकाणी पुरी झालेली नाही. त्याशिवाय या आदेशात वर दाखविलेल्या अनेक त्रुटी आहेत. त्यादृष्टीने १९७९ च्या खरीप हंगामात अतिक्रमण करणाऱ्यांना हुसकावून लावण्याची कारवाई करणे योग्य ठरणार नाही. तरी आदेशातील त्रुटी दुरुस्त होईपर्यंत आणि जुनी अतिक्रमणे कायदेशीर होईपर्यंत कसणाऱ्यांना हुसकावून लावण्याची कारवाई स्थगित ठेवण्यात यावी. आपली अतिक्रमणे कायदेशीर ठरवावीत असे शेकडो अर्ज महसूल अधिकारी व जंगल अधिकारी यांच्याकडे दाखल झाले आहेत. या अर्जांचा विचार करण्यासाठी खास अधिकारी नेमले पाहिजेत आणि त्यांचा निकाल झाल्यावरच अतिक्रमण करणाऱ्यांना हटविण्याची कारवाई केली गेली पाहिजे.

**जमीन ताब्यात न दिल्याची प्रकरणे :** आणीबाणीच्या काळात काही आदिवासींना सरकारने जमिनीचे पट्टे दिल्याची घोषणा केली. काहींना तर समारंभपूर्वक खातेपुस्तिका देण्यात आल्या. परंतु प्रत्यक्षांत जमिनीचा ताबा मात्र देण्यात आला नाही. अशा प्रकारची सुमारे तीन हजार प्रकरणे महाराष्ट्रात आहेत. अतिक्रमणे रीतसर करण्याची कारवाई चालू असतानाच अशाही प्रकरणाची चौकशी करून या सर्व खातेदारांना जमिनीचा ताबा देण्यात यावा म्हणजे ही प्रकरणेदेखील निकालात निघतील.

**आदेश बदलून घेण्यासाठी झालेल्या चळवळी :** हा आदेश दुरुस्त करावा म्हणून ठाणे जिल्ह्यातील पाच संघटनांच्या कृतीसमितीमार्फत २८ जूनपासून सत्याग्रह करण्यात आला. हजारांवर सत्याग्रह्यांनी ह्यात भाग घेतला व ४ जुलैपर्यंत १०४६ सत्याग्रह्यांना अटक कर-

ण्यात आली तसेच जतीन देसाई व शुभा गोकर्ण यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करणाऱ्या ५५ स्त्री-पुरुषांना १५ दिवसांची शिक्षा करण्यात आली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने ९ जुलै ७९ रोजी विधानसभेसमोर धरणे धरले. महाराष्ट्र छात्र युवा संघर्ष वाहिनीमार्फत त्याच दिवशी हुतात्मा चौकात साखळी उपोषणाचा कार्यक्रम मुंबईत चालू होता. ठाणे जिल्ह्यातील संयुक्त कृती समितीद्वारे आदिवासी कार्यकर्ते तसेच आमदार अर्जून शिंगाडे यांच्या शिष्टमंडळाने चार जुलै रोजी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. मुख्यमंत्र्यांनी या मागण्यांकडे लक्ष देण्याचे मान्य करून ११ जुलै रोजी आदिवासी आमदारांशी चर्चा करून १२ जुलै रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे १३ जुलै रोजी महसूलमंत्री श्री. उत्तमराव पाटील यांनी याबाबतचा शासनाचा निर्णय विधानसभेत जाहीर केला. तो खालीलप्रमाणे :

**"एक एप्रिल १९७२ पासून ३१ मार्च ७८ पर्यंत ज्या वनजमिनीवर अतिक्रमण झाले अशी वनजमीन वाटपास उपलब्ध करून द्यावी. मात्र अशा अतिक्रमित जमिनीवरील वनखात्याने वा इतर खात्यांनी उपयोगात आणले असेल तर त्या जमिनी, तसेच जी अतिक्रमणे नियमित करण्याजोगी नसतील त्या जमिनी वाटपास उपलब्ध होणार नाहीत. ज्या जमिनी वनाच्या मध्यभागी आहेत व ज्यांचा उतार १० टक्क्यापेक्षा जास्त आहे त्यांना पर्यायी जमिनी देण्यात येतील."**

एक एप्रिल ७२ व ३१ मार्च ७८ मधील जी प्रकरणे नियमित होण्यासारखी नाहीत ती सर्व अतिक्रमणे नवी समजून हटविण्यात येतील.

श्री. उत्तमराव पाटील यांच्या घोषणेनंतर आदिवासींमधील असंतोष आणखीनच वाढला. १९ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांनी आपल्याबरोबर या विषयासंबंधी काहीही चर्चा न करता आपला निर्णय घोषित केला याबद्दल खेद प्रगट करणारे पत्र त्यांना पाठविले.

शुक्रवार २० जुलै रोजी महाराष्ट्रातील १२०० हून अधिक आदिवासींनी विधानसभेवर मोर्चा नेला. या मोर्च्याचे स्वागत करताना आदिवासी आमदार या मागण्यांसाठी सत्याग्रहास तयार आहेत अशी घोषणा दोन आदिवासी आमदारांनी केली. या मागण्यांवर विधानसभेत त्याच दिवशी बरीच चर्चा झाली. परंतु सरकारने आपली भूमिका बदलण्यास ठाम नकार दिला. महाराष्ट्रातील जंगलाखालील जमिनीचे प्रमाण कमी आहे असे कारण त्यासाठी दिले गेले. सरकारने आपल्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर प्रखर आंदोलन केले जाईल असा इशारा सर्व आदिवासी कार्यकर्त्यांनी दिला.

महाराष्ट्रातील आदिवासी विभागात २० ऑगस्टनंतर ठिकठिकाणी जंगल खात्याच्या कचेऱ्यांवर मोर्चे व सत्याग्रह झाले. ठाणे जिल्ह्यात अशा सत्याग्रहात तीन हजारांहून अधिक आदिवासींनी भाग घेतला. हे आंदोलन इतर जिल्ह्यातही पसरत आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र शासनाने आपल्या आदेशातील त्रुटी दूर केल्यास फार चांगले होईल. आज देशात अतिशय अस्थिर वातावरण आहे. आंदोलनाशिवाय आपले प्रश्न सुटत नाहीत अशी बहुसंख्य आदिवासींची आणि त्यांच्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची भावना आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य आदिवासी समाज दारिद्र्यरेषेखालील जीवन कंठीत आहे. या समाजाला सुरवातीला तरी शेती व्यवसायातच स्थिर करावे लागेल. जंगलांचा प्रत्यक्षात फारसा नाश न होता ते कशीत असलेल्या जमिनी त्यांना रीतसर मालकीच्या करून देण्यामुळे त्यांचा एक मोठा प्रश्न सुटणार आहे. या दृष्टीने या सर्व प्रश्नाचा विचार होणे आवश्यक आहे.

■ ■


'हाकारा'स आमच्या शुभेच्छा

**श्रीधर आणि कंपनी, सांगली.**

# अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीचा नवा आदेश

अतिक्रमणे रीतसर करण्याविषयी महाराष्ट्र सरकारने २७ डिसेंबर १९७८ रोजी काढलेल्या आदेशाविषयी सविस्तर चर्चा अगोदर केली आहे. त्या आदेशात सुधारणा करणारा एक नवा आदेश महाराष्ट्र सरकारने १२ सप्टेंबर ७९ रोजी जाहीर केला. (गव्हर्नमेंट रेझोल्यूशन, महसूल आणि जंगल खाते, क्र. एफ एल डी १०७९/१३६६–एफ ३ दि. १२ सप्टेंबर १९७९.)

या नव्या आदेशान्वये १–४–१९७२ ते ३१–३–१९७८ या काळात झालेली अतिक्रमणे रीतसर करण्यास पात्र ठरविण्यात आली आहेत. मात्र त्यातून पुढे नमूद केलेल्या जमिनी वगळण्यात येतील. १. २७ डिसेंबरच्या आदेशाप्रमाणे रीतसर केल्या गेलेल्या किंवा होत असलेल्या अतिक्रमणाखालील जमिनी २. अतिक्रमण हटविल्यानंतर जंगलासाठी रोपे लावलेल्या जमिनी तसेच इतर कामासाठी वापरण्यात आलेल्या जमिनी. ३. कोणत्याहि सरकारी खात्याच्या कामासाठी तसेच जिल्हा परिषदासाठी किंवा सार्वजनिक संस्थेसाठी जंगल तोडलेल्या जमिनी आणि जंगलतोड करण्याचे मान्य झालेल्या जमिनी. ४. जंगलाच्या मध्यभागी असलेल्या जमिनी किंवा १० टक्क्यांपेक्षा अधिक उतार असलेल्या जमिनी. (मात्र या जमिनींच्या बाबतीत त्या सरकारी खात्यासाठी किंवा वनसंवर्धनासाठी वापरल्या गेलेल्या नसतील तर तेवढ्या आकाराच्या दुसऱ्या जमिनी अतिक्रामकांना दिल्या जातील.)

कोणाहि अतिक्रमकाला प्रमाण मर्यादेएवढी म्हणजे २ एकराएवढीच जमीन अतिक्रमण रीतसर करताना दिली जाईल. १९७२ ते ७८ या कालात एकाच जमिनीवर हक्क सांगणारे एकापेक्षा जास्त हक्कदार निघाले तर कोणाचे अतिक्रमण रीतसर करावे याविषयीहि नियम ठरविण्यात आले आहेत. जमिनीवर हक्क सांगणाऱ्या अतिक्रामकांपैकी सर्वांजवळ आपली काही जमीन असेल तर ज्याच्याजवळील जमीन सर्वात कमी असेल त्याचा हक्क मान्य केला जाईल. हक्क सांगणाऱ्यांपैकी जो भूमिहीन असेल त्याला प्राधान्य दिले जाईल. हक्क सांगणाऱ्यांजवळ सारखीच जमीन असेल किंवा सर्वच भूमिहीन असतील तर कोणाला जमीन द्यावयाची हे चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल. कोणत्याहि परिस्थितीत अतिक्रामकाला त्याच्याजवळील एकूण जमीन ५ एकर जिराईत जमिनीपेक्षा जास्त होईल एवढी जमीन दिली जाणार नाही. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी एक कालबद्ध कार्यक्रम देण्यात आला असून त्याप्रमाणे मे १९८० पर्यंत सर्व प्रकरणांचा निकाल लावला जाणार आहे.

**नवीन आदेशाचे मूल्यमापन** : या नवीन आदेशात काही सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे जुन्या आदेशातील काही त्रुटी थोड्याफार प्रमाणात दूर होणार आहेत. परंतु हाहि आदेश मध्यप्रदेश सरकारच्या अतिक्रमणे रीतसर करण्याविषयीच्या आदेशाच्या तुलनेने अतिशय सदोष आहे. मध्यप्रदेश सरकारच्या आदेशात विशिष्ट तारखेपूर्वी (३१–१२–७६) किमान दोन वर्षे अस्तित्वात असलेले अतिक्रमण रीतसर करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र सरकारने सुद्धा १९७२ ते ७८ या काळातील अतिक्रमणे याऐवजी १९७८ पूर्वी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे रीतसर केली जातील अशी तरतूद करावयास पाहिजे. एकाच जमिनीवर हक्क सांगणारे एकापेक्षा जास्त हक्कदार निघाल्यास त्यापैकी एकालाच जमीन दिली जाणार आहे. त्यामुळे १९७८ पूर्वीची अतिक्रमणे अशी तरतूद केल्यामुळे जास्त जमीन वाटावी लागेल अशी स्थिती नाही.

या आदेशात अतिक्रमणे हटविण्यासंबंधी एक भयानक तरतूद आहे. ती अशी : 'अतिक्रमणाखालील जंगलजमीन वाटण्यासाठी निश्चित करीपर्यंत २७ डिसेंबरच्या आदेशान्वये रीतसर होण्यास पात्र असलेली अतिक्रमणे सोडून इतर सर्व अतिक्रमणे नवीन अतिक्रमणे समजून ती त्वरित हटविण्यात यावीत असा आदेश देताना सरकारला आनंद होत आहे.' वास्तविक पाहता नवीन आदेशाची अंमलबजावणी होऊन त्याप्रमाणे अतिक्रमणे रीतसर होईपर्यंत कोणतेहि अतिक्रमण हटविणे योग्य नाही. अस्तित्वात असलेली अतिक्रमणे हटवावी, अतिक्रामकांना हुसकावून लावावे आणि हे झाल्यानंतर आदेशातील तरतुदीप्रमाणे अतिक्रामकांना जमीन द्यावी असा आदेश देताना सरकारला आनंद होत असला तरी हुसकावल्या जाणाऱ्या कोणाहि अतिक्रामकाला दुःखच होईल.

या आदेशाची अंमलबजावणी देखील पूर्णपणे सरकारी अधिकाऱ्यांवरच सोपविण्यात आली आहे. मध्यप्रदेश सरकारच्या आदेशाप्रमाणे गावसभा घेऊन लोकांना अंमलबजावणीत सहभागी करण्याचे धोरण महाराष्ट्राच्या पुरोगामी शासनाने का स्वीकारू नये हे समजत नाही ?

या नवीन आदेशाप्रमाणे निघालेले हुकूम अद्यापही तालुका पातळीवरील अधिकाऱ्यांना मिळालेले नाहीत. अशा परिस्थितीत अतिक्रमणांची यादी करण्यासाठी घालून दिलेली १५ ऑक्टो. १९८१ ही कालमर्यादा हास्यास्पद आहे. एकंदरीत हा नवा आदेश जुन्या आदेशाच्या मानाने बरा असला तरी देखील सध्या अस्तित्वात असलेल्या अतिक्रमणांपैकी ५० टक्क्यांपेक्षा कमीच अतिक्रमणे त्यानुसार रीतसर होतील असे वाटते.

■ ■

# आदिवासी प्रश्नावर विधानसभेत चर्चा



**—प्रतिनिधी**

वन जमिनीवर आदिवासींमार्फत झालेली अतिक्रमणे व त्यासंबंधीचे शासनाचे धोरण यासंबंधी सर्वश्री. प्रल्हाद कुरणे, प्रभाकर संझगिरी, जे. पी. गावीत, बारक्या कुऱ्हाडा, एस. पी. पाटील, विठ्ठलराव म्हस्के, शंकर चव्हाण, सत्येन्द्र मोरे, केशवराव पवार, दत्ता पाटील, पंढरीनाथ चौधरी, अर्जुन शिंगाडे, वसंत उपाध्ये, रवीन्द्र सबनीस व ओंकार वाघ यांनी विधान सभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. राज्यातील वन-जमिनींवर आदिवासींमार्फत १९७२ ते १९७८ पर्यंत झालेली अतिक्रमणे नियमित करण्याचे शासनातर्फे आश्वासन देऊनहि ती नियमित न करता आदिवासींना तेथून हुसकावून लावण्याचे तसेच त्यांच्या पिकांची नासाडी करण्याचे चाललेले प्रयत्न, त्यामुळे आदिवासी समाजात निर्माण झालेला असंतोष आणि त्यांनी विधानसभेसमोर धरलेले धरणे व त्या जमिनी आपल्या नावावर कायम करून मिळण्याबाबतची त्यांची मागणी आणि त्याबाबतचा शासनाची भूमिका यासंबंधी शासनाने निवेदन करावे अशी मागणी श्री. प्रल्हाद कुरणे यांनी केली होती. यावर महसूल मंत्री श्री. उत्तमराव पाटील निवेदन करताना म्हणाले की, २७ डिसेंबर १९७८ रोजीच्या शासनाच्या ठरावान्वये, दि. ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असलेली व शेतीसाठी केलेली वन जमिनीवरील अतिक्रमणे दोन हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत नियमित करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. ३१ मार्च १९७८ रोजी अतिक्रमण प्रत्यक्षात अस्तित्वात असणार नाही, हे ग्राह्य धरून शासनाने आदेश दिले आहेत की ज्यांनी १९७७ ते ७८ च्या आणि १९७८-७९ च्या खरीप हंगामात अतिक्रमणे केली त्यांची अतिक्रमणे ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात आहेत असे धरून ती नियमित करावीत. अशी नियमित करावयाची अतिक्रमणे जर जंगलाच्या मध्यभागी अथवा अतिक्रमित जमिनीचा उतार १० टक्के पेक्षा जास्त असेल तर अशा अतिक्रमणांना जंगलाच्या सरहद्दीवर तेवढीच पर्यायी जमीन देण्याचेहि आदेश काढण्यात आले. अतिक्रमित जमीन मिळण्यासाठी अतिक्रमकांची खालीलप्रमाणे पात्रता ठरवण्यात आली,

१) अतिक्रामक मागासलेल्या वर्गाचा असावा अथवा त्याचे वार्षिक उत्पन्न ३६०० रु. पेक्षा जास्त असू नये. २) अतिक्रामकांचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण अतिक्रमित जमिनीपासून ८ किलोमीटरच्या परिसरांत असावे. ३) अतिक्रामक भूमिहीन असावा अथवा त्याचेकडील खाजगी जमीन २ हेक्टरपेक्षा कमी असावी. ४) अतिक्रामक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**वनजमिनी व आदिवासींमार्फत झालेली अतिक्रमणे या विषयी महाराष्ट्राच्या विधानसभेत १३ व २० जुलै रोजी चर्चा झाली. त्या चर्चेचा हा खास वृत्तांत.**

शासनाच्या या ठरावान्वये ३१ मार्च १९७८ च्या नंतरची झालेली अतिक्रमणे हटविण्यात यावीत असेहि आदेश देण्यात आले. वरील निर्णयानुसार अंदाजे २७,४४० अतिक्रमकांचे सुमारे ३६,६७० हेक्टर वन-जमिनीवरील अतिक्रमण ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात होते. त्यापैकी किती अतिक्रामक जमीन मिळण्यास पात्र ठरतात, त्यांची चौकशी करून त्या जमिनीची सनद देण्याची कार्यवाही करण्यात आली.

वरीलप्रमाणे कार्यवाही होत असताना विविध पक्षातील नेत्यांनी शासनापुढे फक्त ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमित न करता, १९७२ पासून ३१ मार्चपासून १९७८ पर्यंत झालेली सर्व अतिक्रमणे नियमित करावी अशी मागणी केलेली आहे. या मागणीवर व त्यासंबंधी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी दि. ९ जुलै १९७९ रोजी वरील समस्या शासनाच्या विचाराधीन असल्याचे सांगितले. त्यानुसार शासनाने घेतलेला निर्णय मी या निवेदनाद्वारे सभागृहापुढे जाहीर करीत असल्याचे सांगून ते म्हणाले, डिसेंबर १९७८च्या शासनाच्या ठरावाप्रमाणें ज्यांनीं १९७७–७८ व १९७८–७९ मध्ये अतिक्रमण केले त्यांनाच या निर्णयाचा फायदा मिळतो. परंतु ज्यांनी १९७३ सालापासून विविध वर्षी अतिक्रमणे केली व ज्यांची अतिक्रमणे पूर्वीच्या आदेशानुसार हटविण्यात आली त्यांना या निर्णयाचा फायदा मिळालेला नाही. असे अतिक्रामक बहुतांशी आदिवासी, भूमिहीन आहेत व त्यांनाहि या निर्णयाचा फायदा मिळावा हा दृष्टीकोन लक्षात ठेवून शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

१) १ एप्रिल १९७२ पासून ३१ मार्च १९७८ पर्यंत ज्या वन जमिनीवर अतिक्रमण झाले अशी अतिक्रमित वनजमीन वाटपास उपलब्ध करून द्यावी. २) मात्र अशा अतिक्रमित वन जमिनीवरील अतिक्रमणे हटविल्यानंतर त्या वनजमिनीवर वनीकरणाची कामे हाती घेतलेली असतील अथवा पूर्ण केली असतील अथवा अशा वनजमिनी शासनाने शासकीय कामासाठी वापरल्या असतील तर त्या वनजमिनी वाटपासाठी उपलब्ध करू नयेत. ३) ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असणाऱ्या अतिक्रामकास जर ती जमीन मिळण्यास पात्र असेल तर ती अतिक्रमित जमीन वाटपास उपलब्ध करता येणार नाही. ४) ज्या अतिक्रमित जमिनीं वनाच्या मध्यभागी आहेत किंवा ज्या अतिक्रमीत जमिनीचा उतार १० टक्क्यापेक्षा जास्त आहे अशा जमिनी वाटपास उपलब्ध न करता त्याऐवजी वनाच्या सरहद्दीवर किंवा इतरत्र पर्यायी जमीन उपलब्ध करावी. ५) या निर्णयानुसार कोणती अतिक्रमीत जमीन वाटपास उपलब्ध करावयाची हे जोपर्यंत ठरत नाही तोपर्यंत ३१ मार्च १९७८ रोजी अस्तित्वात असलेली व २७।१२।१९७८ च्या ठरावाप्रमाणे नियमित होण्यास पात्र ठरणारी अतिक्रमित जमीन व कलम १ मध्ये दर्शविलेली अतिक्रमित जमीन सोडून बाकी इतर सर्व अतिक्रमणे नवीन अतिक्रमणे आहेत असे धरून ती अतिक्रमणे हटविण्यात यावीत.

या निवेदनानंतर आक्षेप घेताना श्री· चंद्रकांत म्हस्के म्हणाले की, निवेदनानुसार जमीन अतिक्रामक हा मागासवर्गीय असावा अथवा त्याचे उत्पन्न ३६०० रु· पेक्षा जास्त असू नये. याचा अर्थ तो मागासलेला नसला पण त्याचे वार्षिक उत्पन्न ३६०० चे आत असले तरी त्याला ही जमीन मिळणार असा होतो· यात ‘ अथवा ’ असा शब्द असल्यामुळे मागासलेल्या जातीचा नसला तर त्याचे उत्पन्न ३६०० रुपयापेक्षा जास्त नसावे. असे असेल तर मागासवर्गीय नसला तरी त्याला जमीन मिळणार आहे. यावर उत्तर देताना, श्री. उत्तमराव पाटील म्हणाले की, भूमिहीन असला व तो मागासवर्गीय नसला तरी त्याला जमीन मिळणार आहे. त्यावर तसा खुलासा झाला पाहिजे अशी मागणी श्री. कुरणे यांनी केली. २७ डिसेंबर १९७८ रोजीच्या जी. आर. नुसार अतिक्रमण झालेली जमीन जर जंगलामध्ये असली तर ती वाटपास देता येणार नाही. त्यास पर्यायी दुसरी जमीन देण्यात येईल असे आश्वासन त्या जी. आर्. मध्ये दिलेले आहे असे सांगून श्री. कुरणे म्हणाले, शासनाच्या आदेशातील पहिल्या कलमाचे मी स्वागत करतो. आमची मागणी आपण स्वीकारली त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. परंतु दुसऱ्या कलमात असे म्हटले आहे की, ही जमीन सरकारी कामाकरिता व वनाकरिता उपयोगात आणली गेली असेल तर ती जमीन उपलब्ध होणार नाही यावर उत्तमराव पाटील म्हणाले,“वनजमीन वनीकरणाच्या उपयोगासाठी आणली जाते. त्या जमिनीचा वापर करणे वा न करणे हे सरकार ठरविते. ह्याच जमिनीवर जर अतिक्रमणे झालेली असतील तर त्यांना पर्यायी जमीन देण्याचा विचार करण्यात येईल.” शासन या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करील काय असा प्रश्न श्री. दत्ता पाटील यांना विचारला त्यावर श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, “ जिल्हा परिषदांच्या निवडणुकामुळे कामास हवी तेवढी गती मिळालेली नाही. वन क्षेत्रातील काम ५० टक्के झालेले आहे. कामास गती मिळेल अंमलबजावणीही होईल.”

या आदेशामुळे ज्यांनी अतिक्रमणे केली होती व प्रत्यक्षात जमीन ज्यांच्या ताब्यात होती त्याना आता जमीन देण्यात येणार आहे.

या पूर्वीच्या काळामध्येदेखील दोन वेळा अशाप्रकारचे आदेश निघालेले होते. त्या वेळी ज्या जमिनीवर अतिक्रमणे झाली त्या त्यांच्या ताब्यात दिलेल्या होत्या.परंतु प्रत्यक्षात त्याची नावे खातेपुस्तिकात दाखवली जात नाही.त्यामुळे ह्या जमिनीवर कर्ज घ्यावयाचे असेल तर ते मिळत नाही, अशी प्रत्यक्षात परिस्थिती आहे. म्हणून यापूर्वी जी अतिक्रमणे झाली व जमिनी ताब्यात दिल्या त्या बाबतदेखील काही जी. आर. निघावा म्हणजे त्यांची नावे खाते पुस्तिकात येतील अशी व्यवस्था करण्याची आवश्यता आहे असे मत श्रीमती प्रतिभा पाटील

यांनी व्यक्त केल्यावर त्याचा विचार करण्याचे आश्वासन देण्यात आले.

नव्या घोषणेचे स्वागत करून श्री प्रल्हाद पाटील म्हणाले, गेली ३० वर्षे आदिवासी लोकांचा हा मोठा प्रश्न होता. शासनाने घोषणा मार्च १९७८ मध्ये केली. १९७२ पूर्वी झालेल्या अतिक्रमणांचा विचार होणे आवश्यक आहे. त्या वेळी रेंजर व हवालदार आदिवासींना हुसकावून लावीत होते. म्हणून या आदिवासींच्या जमिनीची नोंद रेकॉर्डला घेतली पाहिजे. पूर्वी जमीन कशीत असताना ज्यांना शिक्षा, दंड झालेले आहेत त्या पावत्या जर हजर केल्या तर त्याचे नाव त्या ठिकाणी असले पाहिजे. १९७८ मार्चपर्यंत ज्यांची नावे त्या ठिकाणी नाहीत त्याबाबत सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांची नावे तेथे ठेवण्याबाबत ठरवायचे आहे. काही वेळा जमीन कशीत असतानासुद्धा त्यांचे नाव येत नाही. म्हणून त्या भागातील कार्यकर्त्यांना याबाबत माहिती असल्याने त्यांनाहि यासंबंधी विश्वासात घेतले पाहिजे कारण सरकारी यंत्रणेमध्येसुद्धा काही दोष आहेत. तेव्हा या दृष्टिकोणातून या आदिवासींना जमीन मिळवून देण्यास शासन कडक उपाययोजना करणार काय या प्रश्नाला उत्तर देताना श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, "या उलट मी आपणास असे आवाहन करणार आहे की, यासंबंधीच्या अंमलबजावणीबाबत ज्या ज्या सूचना करावयाच्या असतील त्या शासनाकडे अवश्य पाठवाव्यात. अतिक्रमणाबाबत प्रत्यक्षरित्या जे काही पुरावे येतील त्याचे स्वरूप काय राहणार हेसुद्धा तपासावे लागेल. काही वेळेला अशीहि परिस्थिती असण्याची शक्यता आहे की, कागदोपत्री पुरावा नाही, दंडाच्या पावत्या नाहीत आणि प्रत्यक्षात मात्र आदिवासी जमीन कसतो आहे. अशा प्रकरणांचा निकाल काय लावायचा? तसेच जमीन वाटपाचे जे काम आहे त्यासाठी पूर्वी शासनाने ज्या दोन समित्या नेमल्या आहेत त्याच्यामार्फत करावे की, जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत करावे हे सारे प्रश्न आपल्याला तपासून पाहावयाचे आहेत. यामध्ये शासनाचा उद्देश एवढाच आहे की आदिवासींना आपण जो हक्क देत आहोत त्यामध्ये काही अडचणी येता कामा नयेत. त्यामुळे अंमलबजावणी अधिक गतीने होण्याच्या दृष्टीने मोलाचे साहाय्य मिळेल.

७७-७८ आणि ७८-७९ या सालामध्ये जी अतिक्रमणे केलेली आहेत, परंतु या खात्याकडे त्यासंबंधींची नोंद नाही तेव्हा तशा नोंदी ठेवण्यासंबंधात वन विभागाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील काय असे विचारून श्री. जे. पी. गावीत म्हणाले, " या विभागाकडून काम होत नसल्यास महसूल खात्याकडून ते काम करून घेण्यात येणार आहे काय? माझ्या भागामध्ये किंवा अन्य जिल्ह्यामध्येसुद्धा १०-१० वर्षांपासून आदिवासींच्या ताब्यात जमिनी आहेत त्या संदर्भात शासनाने काहीच दखल घेतलेली नाही. त्या आदिवासींना अजून कोणत्याच प्रकारचा दंडही केलेला नाही."

वनामध्ये ज्या आदिवासींची घरे आहेत त्या ठिकाणी त्यांच्या वाड्या आणि कुंपणासाठी जी जागा त्यांनी घेतलेली आहे. तीसुद्धा अतिक्रमणाने घेतलेली जागा असते. तेव्हा या सर्व जमिनी त्या आदिवासींच्या समजाव्या असे सांगून श्री. म. सु. शिवणकर म्हणाले, " त्या जमिनीवर केलेले आक्रमण कितीही काळापासून केलेले असले तरी हरकत नसावी. श्री. शिवणकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, " अतिक्रमण केलेली कोणती जमीन आदिवासींना मिळेल यासंबंधी आपण काही पात्रता ठरवलेली आहे. अतिकामकाकडे दोन हेक्टरपेक्षा जास्त जमीन अतिक्रमण केलेली नसेल तर त्याला दोन हेक्टर पुढील एक इंच सुद्धा जमीन देता येणार नाही. म्हणून पूर्वी जी अतिक्रमणे झालेली आहेत त्यांचीसुद्धा यावेळी दखल घेतली गेली पाहिजे. १९६० सालापासूनचा अतिक्रमणे नियमित करण्यासंबंधीचा शासनाने निर्णय घेतला गेला होता त्याचे पट्टे देखील अजून झाले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आता हे काम ताबडतोब करण्यात यावे आणि त्या आदिवासींना पट्टेसुद्धा देता यावे यासाठी शासन योग्य ती उपाययोजना करून निर्णय घेत आहेत."

अनेक अतिक्रमण केलेल्या जमिनी अशा आहेत की, त्या ठिकाणी प्रत्यक्षात वनीकरण केलेले नसताना दप्तरात त्या जमिनीवर वनीकरण केल्याचे दाखविण्यात आलेली आहे. वास्तविक त्या जमिनी आदिवासी अनेक वर्षे कसत आहेत परंतु वन खाते तेथे 'प्लॅन्टेशन' केल्याचे दाखविते तेव्हा प्रत्यक्षात ज्या ठिकाणी लागवड नाही अशा जमिनी आदिवासी कसत असतील तर त्या जमिनी त्यांच्या मालकीच्या करण्यात येणार आहेत काय? आणि त्याचबरोबर आता जे पट्टे देण्याचे काम करण्यात येणार आहे ते किती महिन्यांत पूर्ण होईल? असा प्रश्न डॉ. टी. एस. पाटील यांनी विचारला तेव्हा श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, " प्रत्यक्षरित्या वनजमिनीखाली ती जमीन आहे की नाही यासंबंधी केवळ शासकीय अधिकारी जो निर्णय घेतील त्यावर अवलंबून राहण्याचे कारण नाही. उलट तेथील कार्यकर्त्यांनी प्रत्यक्षरित्या तेथील परिस्थिती पाहून त्या जमिनीचा वापर कशासाठी होतो. यासंबंधीची माहिती शासनाला कळविली पाहिजे. पट्टे

देण्याचे काम फार जुने आहे. ज्यावेळेस प्रत्यक्षात आपण पट्टे देतो, त्यावेळेस मोजमाप करावे लागते. यामध्ये नियमानुसार सर्व्हे करून प्रत्यक्षात मोजमाप करून पट्टे देण्याची पद्धत आहे. परंतु आता तसे करीत राहिलो तर त्यामध्ये अधिक काळ जाईल. परंतु आता आपल्याला अधिक काळ थांबणे शक्य नसल्याने लवकरात लवकर हे काम करण्याचे ठरले आहे.'' वनजमिनीवरील अतिक्रमणांसंबंधात जी भूमिका घेतली आहे तशीच भूमिका गायरानच्या बाबतीत राहील काय असा प्रश्न वि. चं. म्हस्के यांनी विचारला असता श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, ''वनजमिनीच्या वरील अतिक्रमणाच्या संबंधात जी भूमिका घेतलेली आहे तशीच भूमिका गायरानाच्या बाबतीत राहील.''

१९७२ ते १९७७ या कालावधीमध्ये अंदाजे किती आदिवासींनी किती अतिक्रमणे केलेले आहे याची माहिती श्री. प बा. सामंत यांनी विचारली त्यांना उत्तर देताना श्री. उत्तमराव पाटील यांनी सांगितले की, शासनाने सध्या जो निर्णय घेतला आहे या संदर्भात किती जमीन उपलब्ध करून द्यावी लागेल हे अजून निश्चित सांगता येणार नाही. कारण अतिक्रमणांची संख्या मिळविणे मुश्किल आहे.

गावाशेजारील पडिक जमिनीवर अतिक्रमणे झाले असतील तर त्याबाबतीत शासनाचे धोरण काय राहील असे श्री. रा. त्र्यं. मुळे यांनी विचारले असता श्री. उत्तमराव पाटील म्हणाले, तशी अतिक्रमणे यापुढे होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल व नव्याने अतिक्रमणे झाल्याचे कोणी लक्षांत आणून दिले तर गावपातळीवरील पटवाऱ्याची चौकशी करण्यात येईल.''

**जमीन वाटपाचे काम हे वन किंवा महसूल खात्याच्या अधिकाऱ्याकडे न देता त्यासाठी तालुका समन्वय समितीला विश्वासांत घेण्याचा शासन विचार करणार आहे काय? असा प्रश्न श्री. पंढरीनाथ चौधरी यांनी उपस्थित केला. तेव्हा उत्तमराव पाटील म्हणाले की, ही सूचना जरूर विचारांत घेतली जाईल.**

ज्या अतिक्रमित जमिनी वनाच्या मध्यभागी आहेत. किंवा ज्या अतिक्रमित जमिनीचा उतार १० टक्यापेक्षा जास्त आहे अशा जमिनी वाटपासाठी उपलब्ध न करतां त्याऐवजी वनाच्या सरहद्दीवर किंवा इतरत्र पर्यायी जमीन उपलब्ध करावी असे निवेदनांत म्हटले आहे. तरी त्याठिकाणी गांवठाण उपलब्ध करून देण्यात येईल काय? असे विचारून श्री. प्रल्हादराव पाटील म्हणाले, 'जी घरे उठवली जातील ती शासन स्वतःच्या खर्चाने बांधून देणार आहे का?' या संबंधी वन खात्यास गंभीर विचार करावा लागेल. वनाच्या मध्यभागी असलेली वस्ती हलवायची किंवा नाही या संबंधीचा हा प्रश्न असल्यामुळे वनखाते या संबंधी योग्य तो निर्णय घेईल असे श्री. उत्तमराव पाटील यांनी प्रल्हादराव पाटील यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले.

राज्यातील वनजमिनीवर आदिवासींमार्फत झालेली अतिक्रमणे नियमित करण्याच्या आदिवासींच्या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ आदिवासींनी सभागृहासमोर आणलेला मोर्चा व केलेले धरणे याबाबत सर्वश्री र. पां. दळवी, अर्जुन शिंगाडे यांनी स्थगन प्रस्ताव मांडला या विषयीच्या चर्चेत बोलतांना र. पा. दळवी म्हणाले, महसूल मंत्र्यानी अतिक्रमित वनजमिनीबद्दल, निवेदन केले होते. परंतु त्यानंतर ठाणे जिल्हात झालेल्या अतिक्रमणाचे नियमन झालेले नाही. तरी वेळोवेळी १९६० ते ७२ व १९७२ ते ७९ या दरम्यानच्या काळामध्ये काढलेल्या जी. आरमधल्या त्रुटींमुळे अतिक्रमण करणाऱ्या व्यक्ति मोठ्या संख्येने वंचित राहून गेल्या आहेत. त्यांच्या अतिक्रमणाला हे आदेश लागू पडत नाहीत अशांची संख्या हजारोंनी आहे. अतिक्रमणाचे आदेश काही वेळेस वन जमिनीला लागू पडलेले नाही तर कांही वेळेस लागू पडलेले आहेत. अशा प्रकारे त्रुटी राहिलेल्या आहेत. त्यातच आता आलेले पीक मोडून काढणार असल्याच्या शंकेने असंतोष पसरून ठाणे जिल्ह्यामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे शासनाने यांत त्वरित लक्ष घातले पाहिजे. प्रश्न सार्वजनिक महत्त्वाचा आहे. इतर जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे प्रश्न असतील. परंतु ठाणे जिल्ह्याचा प्रश्न तांतडीचा आहे. म्हणून हा स्थगन प्रस्ताव होऊ शकतो.'

स्थगन प्रस्तावावर आपल्याला चर्चा करता येणार नाही. या विषयीसंबंधीच्या लक्षवेधी सूचना या सभागृहामध्ये चर्चेकरितां घेण्यात आली होती. त्यावेळीं यासंबंधी निवेदन करण्यात आलेले आहे. आता सुधारीत उत्तरासंबंधी प्रश्न विचारण्याची मुभा दिलेली आहे असे सांगून सभापतींनी स्थगत प्रस्तावला अनुमती नाकारली. त्यावर श्री. अर्जुन शिंगाडे म्हणाले, ''आदिवासींना न्याय मिळाला पाहिजे. त्याबाबतीत आमच्या तीव्र भावना आहेत आणि हजारो आदिवासी आज मुंबईमध्ये आपल्या मागण्याची दाद लावून घेण्याकरितां आलेले आहेत. तेव्हां याबाबतीत शासनाने लौकरांत लौकर कायदा करावा.''

**सभागृहांत या विषयावरील चर्चेच्या वेळी आपणाला बोलावयास वेळ दिला जाईल असे अध्यक्षांनी सांगितले असतां श्री. कृष्णराव मुंढे म्हणाले की, या विषयीसंबंधी चर्चा करण्याचा प्रयत्न मी अनेकवार केलेला आहे. एवढेच नव्हे तर आदिवासी आमदारांशी चर्चा करण्याकरिता मंत्रीमहोदयांनी तारीख आणि**

**वेळही दिलेली होती. परंतु आश्वासन देऊनही त्यांनी ते पाळलेले नाही.**

१३ तारखेला जी सुधारणा करण्यात आली आहे ती अपूरी असल्याने १९६५ नंतरची जी अतिक्रमणे झाली आहेत त्यामध्ये लागवड करण्यात येत आहे. त्यामध्ये यापूर्वी आपण जंगलाची लागवड केलेली नाही. याबाबतीत सरकार कांही फेरविचार करणार आहे काय असे श्री. कुरणे यांनी विचारतां श्री. छेदीलाल गुप्ता म्हणाले, 'दुसरा प्रश्न है जो जमीन खाली पडी हुई है, इस जमिन पर पेड नही लगाये है। सारे पेड लगाने का जो कार्यक्रम है यह इसके प्रोग्राम के मुतालिक होना है। जो खाली जमिन पडी है यह सारी जमीन बाँटनेके लिये नहीं पडी है। इस बारे मे जो प्रोग्राम हे उसके लिहाज से ३२ वर्षमे कितने हेक्टरो पर पेड लगाये जायेगे यह ठहराया है। उसके अनुसार ही पेड लगाये जाते है।"

अतिक्रमणे झाली आहेत अशी टक्केवारी एक टक्का नसून जवळ जवळ ९० टक्के आहे. या जमिनीमध्ये आज लागवड करण्यांत येत आहे. ज्या ठिकाणी जंगले उभारली नाहीत त्या जमिनीवर अतिक्रमणे झाली असतील तर त्या जमिनी अतिक्रामकांना द्याव्यात अशी आमची स्पष्ट मागणी आहे असे श्री. कुरणे यांनी सांगितले. यावर श्री. गुप्ता म्हणाले, "वर्ष १९७२ से जितने अतिक्रमण है यह जमिन बसी जायेगी १९७२ से इसलिये की उसके पहलेकी रेग्युलराईस कर दिये है।

बोलण्याचे एक आणि करण्याचे दुसरे असे चालले आहे. या कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे असे आमचे मत आहे; परंतु तशी दुरुस्ती होत नाही अशी तक्रार अर्जुन शिंगाडे यांनी केली. विधान सभेच्या परंपरा व हक्क पाळण्यासाठी काहीहि केले जात नाही. सभागृहाने केलेले कायदे आपण पाळतो की सचिवामार्फत ठरविलेले कायदे आपण पाळतो याचा स्पष्ट खुलासा व्हावा. सभागृहाने ठरविलेले कायदे हे विचारात घेतले जात नाहीत असे माझे स्पष्ट मत आहे. वनजमिनीबाबत आम्ही मुख्यमंत्र्याना ४ जुलै १९७९ रोजी निवेदन दिले. आमच्या भागातील कमीत कमी ३०।३५ जण त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळेस मुख्यमंत्र्यानी आम्हांला मुलाखत दिली होती. सगळ्या आदिवासी आमदारांची १२ तारखेला बैठक घेऊ त्यामध्ये तुमच्या मागण्या ऐकून नंतर १२ तारखेला या संबंधीचा निर्णय जाहीर करू असे सांगण्यात आले होते. पण मुख्यमंत्र्यानी आम्हांला दिलेले वचन पाळले नाही. या राज्याचा कारभार सर्व सदस्यांचा भावना विचारात न घेता चालला आहे. त्या खात्याचे जे कोणी सचिव असतील त्यांच्यामार्फत निर्णय घेतले जातात. या ठिकाणी निवडून आलेले सदस्य दीन-दुबळ्या लोकांच्या भावना, विचार मांडतात आणि सरकारला कांही सूचना करतात त्या विचारांत घेऊन कारवाई केली जात नाही. आमच्या भागांत चार संघटनांनी सत्याग्रह केला. १५०० जणांनी त्यांत भाग घेतला; परंतु त्यांचे प्रश्न समजावून घ्यावे असे शासनाला वाटले नाही. कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत आदिवासींना न्याय मिळाला नाही म्हणून हे लोक हुतात्मा चौकांत न्याय मागण्यासाठी बसले आहेत ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे. पालघर तालुक्यांत वनजमिनीची २०३ प्रकरणे आहे. १८४ प्रकरणामध्ये १ एकर जमिनीखालचे आहेत. बाकीचे लोक हे अर्ध्या एकर जमिनीखालचे आहेत. निरनिराळ्या अटी लावून न्याय दिला जात नाही. शासनाने केलेल्या चुकीमुळे ६० सालापासुन आमच्या आदिवासी लोकांना प्लॉट मिळू शकत नाहीत. मात्र असे सांगितले जाते की आदिवासींनी जंगल हटवले, शासनाने मोठमोठे बंधारे बांधले आणि मुंबई शहराला पाणीपुरवठा केला; पण आदिवासींना मात्र देशोधडीला लावले. महाबळेश्वर येथे हॉटेल काढण्यासाठी जंगले तोडलेली आहे. आदीवासींना मारायचे असले तर प्लॉट देऊ नका जगवायचे असेल तर प्लॉट द्या असे श्री. शिंगाडे यांनी सांगितले.

१९६० सालापासून शासनाने वेगवेगळे जी. आर. काढले. फार थोडयाना जमिनी मिळाल्या. १९६०नंतर मोकळ्या जमिनीसंबंधी जी. आर. काढला. त्यामुळे ज्या ठिकाणी अतिक्रमणे आहेत ती आपल्या लोकांना मिळणार असे वाटले. त्यानंतर कांहींच्या मागणीनुसार दुसरा जी. आर. काढून जंगल जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यांत आली. ३१ मार्च ७८ ला आदेश काढून १९६२ ते ७८ ची अतिक्रमणे रीतसर करणार असे सांगण्यांत आले. ज्या ठिकाणी अतिक्रमणे अस्तित्वात आहेत. अशाच जमिनी रीतसर करण्यात परंतु जी अतिक्रमणे केली व जे लोक भूमिहीन पण ज्यांनी नंतर अतिक्रमणे केली त्यांना आसरा मिळाला. १९६० ते ७८ पर्यंतची जी अतिक्रमणे हटवण्यात येऊन शासनाने झाडे लावली. त्या जमिनीदेखील त्या अतिक्रामकांना देण्यांत आल्या पाहिजे केवळ एक जिल्ह्याचाच विचार न करता राज्यासाठी एक कायदा करणे आवश्यक आहे. दरवर्षी नवीन जी. आर. निघतो त्यामुळे अतिक्रमण करण्याची प्रवृत्ती बळावते असे श्री. र. पा. दळवी यांनी सांगिले. आदिवासी सब-प्लॅनचा फायदा न होता पिळवणूकच होते. अतिक्रामकांना जमीन देण्याच्या संबंधांत अनेक अडचणी निर्माण करून ठेवल्या आहेत. आदिवासीयांवर

अन्याय करण्याची प्रथा चालू आहे. ज्या जमिनीचे आदिवासी पूर्वी मालक होते त्या त्यांच्याकडून बड्या लोकांनी काढल्यामुळे ते भूमीहीन झाले. उपजिवीकेसाठी रानोरान फिरू लागला आहे. पालघर तालुक्यात ९०० प्रकरणे कायदेशीर करून महसूल खात्याने काढली. परंतु ३२ गुंठेवर ज्याची जमीन असेल अशा फक्त ३२ माणसानाच जमीन मिळाली. आपण बाहेर समाजवादाच्या गप्पा मारतो. परंतु ज्या माणसांचा आयुष्यभर दारिद्र्याने पाठलाग केलेला आहे, ज्यांना एका वेळचे अन्न मिळायची श्वाश्वती नाही. त्या माणसांसाठी मात्र आपण काहीच करीत नाही. अनेक गावातील आदिवासींच्या जमिनी घेतल्या; परंतु त्याचा मोबदला न देता त्यांचे संसार उध्वस्त केले, आजपर्यंत आपण मोर्चे काढले सुदैवाने मंत्री झालात निदान आता तरी आदिवासींयांना जाऊन भेटा त्यांचे प्रश्न समजावून घ्या व त्यांचे निवारण करा. आमचे मत असे झालेले आहे की आपल्याला या आदिवासींना जंगल जमिनी द्यावयाच्या नाहीत, त्याचे पुनर्वसन करावयाचे नाही तर या उलट आपणास आदिवासींना महाराष्ट्रातून नष्ट करावयाचे आहे. आणि तशी तुमची योजना झालेली आहे असा आरोप श्री. कृष्णराव मुंढे यांनी केला.

आपण १३ तारखेला दिलेले वचन बदलले. वन-जमिनीच्या निर्णयात महाराष्ट्रात जेथे जेथे गायरानावर अतिक्रमण झाले आहे ते नियमित करू म्हणून सांगितले पण ते झालेले नाही. अशी तक्रार श्री. म्हस्के यांनी केली. पूर्वी गावकऱ्यांना शेतकरी, शेतमजूर, निस्तार म्हणून सरपणासाठी, इमारतीसाठी, झोपड्यांसाठी जंगलातील गवत व लाकूड मिळत असे; पण आज त्याची काय हालत आहे, असा प्रश्न डॉ. पु. म. डेकाटे यांनी उपस्थित केला. कातकऱ्यांना जंगलातून लाकडे आणण्याची मुभा असावी. लहान लाकूड लिलावात मोठ्या व्यापाऱ्याला न देता शेतकऱ्यासाठी राखीव ठेवावे अशी मागणी श्री. द. भ. माडेकर यांनी केली. श्री. जीवा पांडू गावीत म्हणाले, '१९६० ते ७८ पर्यन्तच्या अतिक्रामकांना जमिनी देण्यात याव्यात. सरकारी रेकॉर्ड अपुरे आहे. आमच्या गावी फक्त ५ अतिक्रमणे दाखविली आहेत पण आम्ही पहाणी केली तेव्हा १२०९ अतिक्रमणे दिसून आली. पंचनामासुद्धा बरोबर केला जात नाही. अशी प्रकरणे ३० हजार असल्याचे आम्हाला रेकॉर्डवरून दिसून आले. यावर उत्तर देताना श्री. छेदीलाल गुप्ता म्हणाले, 'तज्ज्ञांच्या मते ३३ टक्के जमीन वनाखाली हवी. दुर्दैवाने महाराष्ट्र २१ टक्के जमीन वनाखाली आहे. वाटपाने ५.६ टक्के जमीन दिली जाईल. १६ टक्के जमीन शिल्लक राहील. जंगले साफ होतात म्हणून पाऊस कमी होत चालला आहे. १९७२ पासून सतत अतिक्रमण करतात त्यास शासन जमीन देण्यास तयार आहे. कबजेदार असतील त्यांना २ हेक्टर जमीन दिली जाईल. ७७, ७८, ७९ साली कब्जा असलेल्यांना जमीन देण्यात येणार आहे. लोकांनी पहिली १९७३ ची मागणी केली. आता १९६० पासूनची अतिक्रमित जमीन मागतात. १९६० ची मागणी मान्य केली तर ५५ पासूनची पण मागणी येईल. जमीन खाजगी असेल किंवा रेव्हेन्यूची असो, भूमिहीनांनी जी अतिक्रमण केली असतील ती जमिन त्यांना दिली पाहिजे पण परिणाम म्हणून जंगल कमी झाल्याने दुष्काळी परिस्थिती आलेली आहे.

१९७२ नंतरच्या अतिक्रमित जमीन वाटपाचा निर्णय झालेला आहे. वाटप झालेल्या जमिनीचे आकडे ३ लाख ९१ हजार ४७६ हेक्टर आहे. ठाणे तालुक्याची नमुना पाहणी झाली आहे. ३१-३-७८ रोजी जे जमीन मिळण्यास पात्र होते त्यानुसार ४१.६ हेक्टर जमिन उपलब्ध होती; परंतु ज्या तऱ्हेने मागणी केली जाते. त्या तऱ्हेने जवळजवळ २० हजार हेक्टर जमीन फक्त ३ तालुक्यात जाते. अशी मागणी चंद्रपूर, नाशिक आदि जिल्ह्यांतून आली तर ३ लाख हेक्टर जमीन लागेल, रेव्हेन्यूला पुनर्वसनासाठीहि बांध-बंधाऱ्यासाठी जमीन पाहिजे आहे असे सांगून श्री. छेदिलाल गुप्ता म्हणाले, ' आपल्याला जंगल हवे की नको, एकॉलॉजिकल बॅलन्स हवा की नको ? '

■ ■


# संवाद

' हाकारा ' आपण वाचलेत ! आदिवासींच्या प्रश्नासंबंधी चर्चा घडवून आणणाऱ्या या नियतकालिकाबद्दल आपणास काय वाटते ? मजकुरांत आणखी कोणती विविधता हवी, आणखी कोणत्या प्रश्नांचा तपशीलवार विचार व्हावा याबद्दल आपल्यालाही काही तरी म्हणायचं आहे, कृपया हाकाराला ते त्वरित लिहून पाठवा. आपल्या प्रतिक्रियांचा समावेश हाकाराच्या पुढील अंकात ' संवाद ' या सदरात करण्यात येईल.

**- संपादक**

# जंगलजमिनीचा प्रश्न

## वसुधा धगमवार



आदिवासींनी अतिक्रमण करून वहितीस आणलेल्या जंगलजमिनी शासनाने अधिकृतरित्या त्यांना द्याव्यात, १९६१ पासूनचे अतिक्रमण कायदेशीर करावे म्हणून महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कामे करणाऱ्या, विविध मतप्रणालीच्या बऱ्याच संघटनांनी एकत्र येऊन गेल्या एक-दोन महिन्यांत जबरन जोत आंदोलन केले. एरवी सहजासहजी एकमत न होणारे लोक ह्या कार्यक्रमापुरते एक झाले ही गोष्ट नमूद करण्यासारखी व अभिनंदनीय आहे. आदिवासींची अत्यंत हलाखीची परिस्थिती ह्या कार्यकर्त्यांना किती बेचैन करते ह्याचे ही घटना जशी प्रमाण आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या ह्या परिस्थितीवर सखोल विचार करण्यास आवाहनही आहे.

अतिक्रमणाखालच्या जमिनी नियमित रूपाने ७/१२ चे तसेच ड पत्रकाचे उतारे देऊन आदिवासी शेतकऱ्यांना दिल्याने आदिवासींच्या गरिबीचा, उपासमारीचा प्रश्न सुटणार आहे का? निदान समस्या सोपी होणार आहे का? की गुंता वाढत जाणार आहे? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधायच्या आधी अतिक्रमणाच्या जमिनी मंजूर करण्याची मागणी कुठल्या जोरावर, कुठल्या मुद्द्यांच्या आधारे केली जाते, हे पाहायला हवे. ही मागणी खालील मुद्द्यांवर आधारित आहे असे आपल्याला दिसून येते.

१. मोठ्या प्रमाणात जी जंगल तोड होते आहे तिला जबाबदार सरकार व त्याचे कंत्राटदार आहेत. कंत्राटदारांना सरकार मुळीच आवर घालत नाही. त्या मानाने आदिवासींनी घेरलेली जमीन फार थोडी आहे.

२. जंगल जमीन म्हणून जाहीर केलेल्या जमिनीवर सरकार लागवड करतेच असे नाही. ठिकठिकाणी मैलोगणती जंगल जमीन ओसाड पडलेली आहे. त्या मानाने ही वहितीखालची जमीन फार नाही.

३. अतिक्रमणाच्या जमिनीवरून शेतकऱ्याला जर हुसकावून लावू दिले तर त्याने कुठे जावे व काय खावे? तो एरवीच अर्धपोटी असतो. नाइलाजाने म्हणून तो जंगल जमीन कसतो. ही देखील सरकारने काढून घेतली तर त्याचे कसे व्हायचे?

अतिक्रमण कायदेशीर करण्याच्या मागणीत हे तीन मुद्दे प्रामुख्याने वापरलेले आढळतात. ह्यापैकी तिसरा मुद्दा कळवळून, पोटतिडकीने मांडलेला असतो. आदिवासींची दशा इतकी वाईट असताना आणि इतर मार्गाने जंगलतोड निर्वेध चालू असताना आदिवासीने अतिक्रमण केलेल्या जमिनी कुठल्या नैतिक हक्काने सरकार मागू शकते? हा जाब अत्यंत परखड शब्दात जबरन जोतसारखी आंदोलने मागत असतात. ह्या सर्वांच्या पाठीमागे त्या आदिवासीचे जे मूक चित्र उभे असते त्याने आपण निःशब्द होऊन जातो. पण हे खरे आहे का?

ह्या तीन मुद्द्यांपैकी पहिले दोन मुद्दे असलेली वस्तुस्थिती सांगतात. आकडेवारीवरून दोन्ही मुद्दे सहज सिद्ध होणारे आहेत. त्यांच्याबाबत वाद असण्याचे फारसे कारण दिसत नाही. तिसरा मुद्दा पहिल्या दोघांच्यावर आधारित आहे. तो थोडाफार भावनिक व थोडाफार वस्तुनिष्ठ आहे. पहिले दोन मुद्दे बरोबर असले तर जंगलतोडीची फार थोडी जबाबदारी आदिवासीवर येते. ही झाली वस्तुस्थिती. ह्या शेतकऱ्याने जमीन गेल्यास काय करावे हा झाला भावनेवर आधारित प्रश्न. भावनाविवश होऊन असा सवाल टाकणारा तळमळीचा कार्यकर्ता पर्यावरणाची (ecological) चर्चा ऐकण्यास मुळीच तयार नसतो. जंगल तोडल्याने धूप होत असेल, होतेच. पण ती काय आमच्यामुळे? कंत्राटदारांना व सरकारला आधी आडवा. काय आम्ही एकटेच जमीन बरबाद करतो काय? असे तो मोठ्या आवेशाने म्हणतो. पुन्हा विरुद्ध पक्ष गप्प होतो. आपले पोट तुडुंब भरले असताना पर्यावरणाच्या नावाखाली दुसऱ्याला उपाशी मर सांगणे सोपे असले तरी ह्या

कार्यकर्त्यांशी बोलताना धाष्टर्याचेच असते ! ह्या सर्व वादातून शेवटी पर्यावरण एका बाजूला व शेतकरी दुसऱ्या बाजूला, असे तट पाडण्याचा रंग दिसू लागतो आणि वाद आवरता घेणे भाग पडते. पण वादाचा हा अंत सत्याला धरून आहे की आपण आपली दिशाभूल करतो आहोत हे तपासून पाहणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची गरज व पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक असलेली धोरणे, ही खरोखरच परस्पर विरोधी आहेत का ?

अतिक्रमणाचा प्रश्न, काळाच्या दोन पातळ्यांवर हाताळायला पाहिजे. एक तातडीचे उत्तर व एक दीर्घकालीन योजना. आमच्या भाकरीची काय व्यवस्था हा प्रश्न तातडीने सोडवायला हवा. जंगलतोडीचे दुष्परिणाम–जमिनीची धूप, पाऊस कमी होणे, पूर येणे, कडे कोसळणे–या गोष्टी इथे बोलण्यात काही अर्थ नाही. पण त्याचप्रमाणे त्या अजिबात न बोलणेही उपयोगी नाही ! दीर्घमुदतीच्या योजना आखताना हा सर्व विचार करायलाच हवा. ह्या दोन पातळ्या एकमेकांच्या विरोधात आहेत का ? व तसे असल्यास काय करायचे हा प्रश्नही येतोच.

सर्व विचार केल्यावर मात्र असे वाटते की अल्प कालीन व दीर्घकालीन पातळी आपल्या सुदैवाने एकमेकांच्या विरोधात नाहीत. दोन्ही एकाच प्रश्नाचे पैलू आहेत. ते एकमेकांना पूरक आहेत. अर्थात हे सुदैव की दुर्दैव हा प्रश्न वेगळा ! जंगल नष्ट केल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या इतक्या तातडीने उभ्या राहत आहेत की त्या सोडवायला पुरेसा अवधीहि आपल्याला मिळेलसे दिसत नाही. भाकरीचा प्रश्न आपण सोडवताना आपण दूरदृष्टी ठेवली नाही तर पुढच्याच वर्षी (दहा वीस वर्षांनी नव्हे)–ह्याच भाकरीचा प्रश्न पुन्हा उभा राहील. जमीन ढासळल्यामुळे शेती गेलेला शेतकरी पुन्हा त्याच भयानक उपासमारीत सापडेल. कंत्राटदार व सरकारी अधिकाऱ्यांच्या मुळे ही परिस्थिती उद्भवत असली तरी तिची जबर व संपूर्ण किंमत आदिवासी चुकवतो.

या प्रश्नाला एक दुसराहि पैलू आहे. अतिक्रमण कायदेशीर करण्याची मागणी ही केवळ शेतकऱ्यांची उत्स्फूर्त मागणी नाही. त्यांच्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी ही मागणी शब्दात मांडलेली आहे. ह्या परिस्थितीचेही काही अर्थ आहेत. आपापल्या क्षेत्रात काम करताना कार्यकर्ते केवळ तात्कालिक गरजांच्या मागण्यांच्या पुढे पाहत असतात. निदान त्यांनी तसे करावे अशी अपेक्षा असते. सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांनी विचार करावा, अशी अपेक्षा त्यांच्याकडून बाळगणे अयोग्य नसते. त्याचप्रमाणे त्यांनी आपले विचार, भविष्याबद्दलचा आराखडा लोकांना समजावून द्यावा, किंबहुना लोकांच्याबरोबर तयार करावा हेही महत्त्वाचे मानले जाते. रोजच्या पोटपाण्याचा प्रश्न सोडवणे महत्त्वाचे असले तरी अपुरे आहे. केवळ त्यातून टिकाऊ असे काही उभे राहत नाही. स्वत: विचार करण्याची पात्रता तयार होत नाही. व म्हणूनच कार्यकर्त्यांना उद्देशून खेड्यातला सावकार म्हणतो, ' करा काय टूरटूर करायची ती लेकांनो. किती दिवस रहाल इथे ? २–५ वर्षे ? एक दिवस तर जालच. मी, माझे बापजादे, माझी नातवंडे इथेच राहणार. मग घेऊ पाहून. ' आणि खरोखरच नागरी कार्यकर्ते वेगवेगळ्या कारणांनी निघून जातात व आदिवासींची अवस्था अधिकच केविलवाणी होते. काही जागी कार्यकर्ते स्थानिक, आदिवासी आहेत. तिथे परिस्थिती याहून बरी असली तरी कार्यकर्ते व समाज याच्यातली दरी मिटल्याशिवाय हा धोका रहायचा नाही. मूठभर कार्यकर्ते जेलमध्ये टाकून सरकारला चळवळ संपवता येते ! आणि पुन्हा आदिवासी शोषकांच्या तावडीत सापडतो. संथाळ चळवळीचे संथाळ नेते आणीबाणीत धरले गेल्यावर हा अनुभव संथाळांना आला होता. कार्यकर्ते बाहेरून आलेले असोत किंवा स्थानिक, आदिवासींची होणारी दुर्दशा ही विचाराचे, संघटनेचे, स्वतंत्र वृत्तीचे लोण त्यांच्यापर्यंत न पोचवल्याची व त्यामुळे कार्यकर्ते हरल्याची ती एक फार मोठी खूण आहे.

आपल्या विशिष्ट प्रश्नाची मागणी या विचारांशी पडताळून पाहू या. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने, त्यांना स्वतःते सुद्वर हित अहित ओळखण्यात मदत करण्याच्या दृष्टीने, बाहेरीलच काय पण कुठल्याहि कार्यकर्त्यांची निकड करण्याच्या दृष्टीने पाहिले तर या मागणीचे स्वरूप कसे दिसते ? या सर्व अपेक्षा ती पुऱ्या करते का ? १९६१ साल पासूनचे अतिक्रमण कायदेशीर करवून घेतल्याने नक्की काय मिळते ?

ज्या प्रमाणे जबरन जोतमुळे भाकरीचा प्रश्न कायमचा सुटण्याची शक्यता पर्यावरणाच्या घडामोडी नाकारीत आहेत, त्याचप्रमाणे वरील प्रश्नही जबरन जोत चळवळ हाताळण्याचा संभव दिसत नाही ! भविष्याचा कुठलाच विचार या मागणीपाठीमागे नाही. रोजगार हमी योजनेवर कामे मागणे ही जशी तात्पुरती कुठेही सामाजिक बदल न करणारी, केवळ माणुसकीची मागणी, तसेच हे आंदोलन ! रोजगार हमी योजनेत सरकार दरवर्षी कच्चे रस्ते बांधते, पावसाळ्यात ते वाहून जातात. दुसऱ्या वर्षी पुन्हा त्याच रस्त्यावर तेच मजूर गिट्टी फोडतात, मातकाम करतात. श्रमाची तेवढी नासधूस, एवढी विटंबना नाइलाज म्हणून तात्पुरत्या निकडीच्या धोरणावर स्वीकारणे वेगळे, आणि त्यातून मार्ग न शोधणे वेगळे. जबरन जोतची मागणी अशीच अदूरदृष्टीची आहे, अशीच शेतकऱ्यांची

विटंबना करणारी आहे. दरवर्षी पुन्हा तीच झोळी घेऊन त्याला उभे रहायला भाग पाडणारी आहे. घोषणा व दमदार भाषणांनी ती झोळी लपली तरी ती नाहीशी होत नाही.

आपली मागणी मांडताना आजच्या भाकरीचा प्रश्न, सर्वांगीण विकासाचा प्रश्न, पर्यावरण दृष्टचा भविष्याची तरतूद व आदिवासींनी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता असे चारी पैलू विचारात घेतले पाहिजेत असे वाटते. पण जर सध्याची तातडीची गरज (भाकरी) व इतर दीर्घकालीन गरजा यात जर विरोध असेल तर आपली मागणी ह्या चारी पैलूंना एकत्र आणू शकणार नाही. तरी आता विरोध इथे आहे का हेही बघायला हवे.

जबरन जोत आंदोलनाचे समर्थन करताना मांडलेले तिन्ही मुद्दे कायम ठेवून नव्या मागण्या मांडता येतात. नव्हे तरच नीट मांडता येनात. हे नमूद केले पाहिजे. केवळ अतिक्रमणाच्या जमिनीबद्दल मागण्या ठेवणे म्हणजे खरं तर सरकारला वरदानच आहे. कंत्राटदारांच्या बरोबर हातमिळवणी करण्यास पुन्हा मोकळेच ! त्यापेक्षा जंगल राखण्यासाठी, त्यातून भाकरी मिळविण्यासाठी लढा केला तर जंगल भक्षक सरकार कंत्राटदारांना शह देता येईल.

'वाटेल तशी कंत्राटे बंद करा. जंगलची प्रामाणिकपणे शास्त्रशुद्ध लागवड करा. लागवड, आवश्यक तोड जंगल उत्पादन गोळा करणे ही कामे आम्हाला द्या म्हणजे आमचा तुमच्यावर ताबा राहील, तसेच आम्हाला प्राणांहून प्रिय असलेल्या जंगलातून जीवन मिळेल. जंगलचे खरे बच्चे, खरे राखणदार आम्ही आहोत जोवर सरकार या मागण्या मंजूर करीत नाही तोवर आम्ही जंगल जमिनी सोडणे बंद करणार नाही. तसेच मागण्या मंजूर होईपर्यंत आमच्या टापूत येणाऱ्या कंत्राटदारांशी सरकारी कर्मचाऱ्यांशी लढा देऊ, त्याना जंगलाचा सत्यानाश करू देणार नाही ' या स्वरूपाची मागणी हवी.

हिमाचल प्रदेशातली ' चिपको ' चळवळ: धनबाद व संथाळ परगण्यातल्या बिहारच्या संथाळाच्या चळवळीचा एक भाग ह्याच प्रकारचा आहे. कारण जंगल कुणीका तोडेना, त्याचे दुष्परिणाम होतात, व ते दुष्परिणाम प्रथम आपल्याच मुलाबाळांना भोगावे लागतात हे त्या भागातल्या लोकांना चांगले समजले आहे. जवळचा तसेच दूरचा विचार करून ही आंदोलने मागण्या करीत आहेत. महाराष्ट्रातल्या जबरन जोत चळवळीने त्यांच्याकडून हे सर्व शिकायला काय हरकत आहे ? ■ ■

( पान ४४ वरून )

गोळा करणे, पेपरमिलची नोकरी, मार्किंग करणे, प्लँटेशनचे काम, रस्त्यावर माती टाकणे, ही होत.

शेतात धान्य पिकवून आवडीच्या वस्तू खाऊ. चांगल्या कपड्यासाठी शेतात कापूस लावीन, मी शिकून गावात शाळा काढीन असे जुरू वड्डे या मुलाने लिहिले. चांगल्या पद्धतीने शेती करून जे पीक येईल त्यातून निम्मे पीक विकून तसेच फळझाडे लावून फळे विकून पैसे मिळवीन असे बंगरू गावडे या मुलाने लिहिले. तसेच गावाच्या विकासासाठी आपल्या उत्पन्नातून काही पैसे लोकांनी द्यावेत असेही त्याने लिहिले. गावाच्या सुधारणेसाठी गावचे लोक सरकारकडे दरखस (अर्ज) करतील असे लालसू पुंगाटी याने लिहिले. अन्न-पदार्थ मिळविण्यासाठी कोणतेहि काम करीन, शेतीचे उत्पन्न वाढण्यासाठी शेतीची चांगली निगा राखीन, गावाच्या सोयी मिळविण्यासाठी व्यापार करू; असे कमला मडावी या मुलीने लिहिले. सर्व लोकांनी एकत्र येऊन पैसे जमा करून शाळा बांधावी असे पिडसे दुर्वा याने लिहिले.


काय कराल ? याचा अर्थ नीट ध्यानात न आल्याने दोघांनी मजेशीर उत्तरे लिहिली. एकाने दुकानात जाऊन विकत घेऊ.' तर दुसऱ्याने लिहिले, ' काहीतरी केले पाहिजे.'

आदिवासी आळशी असतात असा आरोप केला म्हणून की काय, रैनू आतलामी या मुलाने लिहिले, आळस न करता काम करीन. पैसे मिळवीन.

पैसे मिळविण्याचे जे मार्ग यांच्या पाहण्यात आहेत तेच या मुलांनी सांगितले आहेत.



# जंगलाचे संवर्धन, सरकार व लोक



जंगलजमिनीचा प्रश्न उपस्थित झाल्यावर सरकारने जंगलाचे संवर्धन, निसर्गातील समतोल असे इतर प्रश्न उपस्थित करावयास सुरुवात केली. जंगल-जमिनीवर सतत आक्रमण होत राहील तर जंगल कमी होत जाईल. जंगल कमी झाले तर पाऊस कमी पडेल, जमिनीची धुपणी होईल अशी भीती सरकार व्यक्त करीत आहे. जंगलाबाबत योग्य काळजी घेणे हे सर्वथा योग्य आहे. पण शासन जंगलाचे संवर्धन करते हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही.

अतिक्रमित जमिनी आदिवासींनी जंगले तोडून, त्या ताब्यात घेतल्या आहेत हे म्हणणे खोटे आहे. सरकारने जंगले तोडली, त्यातील शेती योग्य जमिनीवर आक्रमण केले ही वस्तुस्थिती आहे.

आदिवासींनी आक्रमण केलेल्या जंगल जमिनी शिवाय हजारो एकर डोंगर, जंगल योग्य जमीन (शेतीस अयोग्य) आज उपलब्ध आहे. या जमिनींवर जंगल वाढीचे सरकार व त्याचे जंगल खाते प्रयत्नकरीत नाही. हा सर्वांचा अनुभव आहे. परंपरेने जेथे जंगल होते, त्या भागातील टेकडया, डोंगर, डबडखाबड जमिनी दिवसेंदिवस उजाड होत आहेत.

जंगलाचे नुकसान तेथे राहणारा आदिवासी करीत नाही तर व्यापारी, ठेकेदार, उद्योगधंद्यासाठी बेसुमार व अविवेकी तोड करणारे जंगलखाते या जंगलतोडीस संपूर्ण जबाबदार आहे. या कायदेशीर तोडीबरोबर व्यक्तिगत स्वार्थासाठी ठेकेदार व अधिकारी काळया व्यवहारात जंगल तोडतात ते वेगळेच. सरकारचे जंगलखातेच जंगल खात आहे.

आदिवासी जंगलात राहणारा व जंगलावर अवलंबून असणारा माणूस आहे. जंगल व त्याचे जीवन यात एक नैसर्गिक समतोल आहे. जंगल उद्ध्वस्त झाले तर त्याचेही जीवन उद्ध्वस्त होते हे आदिवासीला माहीत आहे. उलट त्याचे व जंगलाचे हे नैसर्गिक, मानवी नाते जंगलखात्याचे अधिकारी व शासन नाहीसे करीत आहेत. आपल्या अविवेकीपणाने त्याला जंगलापासून तोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. आदिवासी जंगलाला शत्रू मानीत नाही, जंगलखात्याला जरूर मानतो.

अनेक ठिकाणी जंगलाच्या जमिनी शहरातील मोठमोठया ट्रस्टना शासनाकडून दिल्या गेल्या. जंगलखाते झाडे तोडून जमिनी गवत लागवडीखाली आणते. अशी अनेक उदाहरणे आहेत. शासन या जंगल विध्वंसास जबाबदार आहे. एका बाजूने जंगलाचे महत्त्व सांगून दुसऱ्या बाजूने जंगल विध्वंस होईल अशी धोरणे अवलंबायची ही शुद्ध फसवणूक आहे.

जंगलाचे रक्षण व संवर्धन, जंगलावर अवलंबून असणाऱ्या लोकांकडूनच होऊ शकेल हे धोरण बहुधा सर्वमान्य होईल. जंगले लोकच वाढवू शकतील. त्यांचा फायदाही लोकांनी सामूहिकरित्या घ्यावा हे धोरणच जंगलवाढीस उपकारक ठरणार आहे. लोक व जंगल यात शत्रुत्व निर्माण करून होणार नाही. आदिवासी जंगलाविषयी परंपरेने खूप काही जाणतो. त्यांच्या परंपरागत ज्ञानाचा व जंगलविषयक स्नेहाचा उपयोग करून घेतला पाहिजे. त्याला जंगलाच्या व्यवस्थापनात प्रमुखत्व देऊन, जंगलविषयक तंत्र व विज्ञान त्यास पुरवणे, व्यापक धोरणे ठरवणे, उत्पन्नाचा रास्त हिस्सा समाजासाठी घेण्याची कामेच शासनाने करावी. जंगलखात्याची एवढीच कामे असावीत; तरच जंगल वाढेल. शासनाचे धोरण लोकविरोधी व जंगलवाढीसही विरोधी आहे.

जंगलाची उपयुक्तता लक्षात घेऊन काही वर्षे झाडे अजिबात न तोडण्याचे धोरण शासनाने निर्धाराने पाळावे. तसेच ६०–६० वर्षे वाढीस लागणाऱ्या सागवानावर भर देणारे धोरणही अधिक व्यवहारी बनवणे आवश्यक आहे. ही धोरणे ठरवण्याच्या आड आदिवासी येत नाही. त्यांचीच ही मागणी आहे.

आदिवासींच्या जमिनी लुबाडून त्यांना त्यांच्या जगण्याच्या साधनापासून उठवणाऱ्यांना रोखायचे नाही. त्याने जगण्यासाठी जंगलाचा आश्रय घेतला तर तो घेऊ द्यायचा नाही. याचा अर्थ त्याला जगण्याचा हक्क नाकारायचा एवढाच होतो.

**–आदिवासी जाणीव जागृती केंद्र**

# आदिवासी आणि दलितमुक्तीची चळवळ : एक टिपण



## रावसाहेब कसबे

आदिवासी आणि दलित चळवळीच्या प्रश्नांचा विचार करताना त्यांच्या पुढील आजच्या आव्हानातील साम्य आणि फरक यांचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते. ही साम्ये आणि भेदस्थळे शोधित असताना या दोन्हीही जनसमुदायातील सर्वात मोठे साम्य म्हणजे या दोन्हीही समाजापुढील आजचे प्रश्न हे मानव-निर्मित प्रश्न आहेत. ही सर्वात महत्त्वाची बाब वाटते. आजपर्यंत दलित आणि आदिवासींच्या व्यथा, वेदना त्यांचे जीवन, त्यांच्या पदरी आलेली सामाजिक आणि आर्थिक विषमता ही निसर्गनिर्मित आहे, दैवी आहे हे त्यांच्या मनावर बिंबवण्यात इथल्या प्रस्थापित वर्ग–जातींनी पोसलेले विचारवंत–कीर्तनकार प्रवचनकार यशस्वी झाले होते; परंतु समाजजीवन कधीच नेहमी-साठी गतिहीन करता येत नसते. गतिमानता आणि अभिसरणपरता हे तर या विसाव्या शतकाचे व्यच्छेदक लक्षण आहे. प्रस्थापित जातिवर्ग फारच झाले तर समाज परिवर्तनात गतिरोध निर्माण करण्यात काही काळ यशस्वी होतात; परंतु कालोघात त्यांचा पराभव अनिवार्य असतो. अलीकडच्या काळात सामान्य माणसाशी बांधिलकी स्वीकारणारा दलित आणि दलितेतर समाजातून एक तरुणाचा तांडा नव्या जाणिवा–नव्या प्रेरणा घेऊन अतिशय समर्थपणे उभा राहिला ही नव्या युगाच्या परिवर्तनाची चाहूल आहे. त्यामुळे दलित आणि आदिवासी यांचे प्रश्न हे निसर्ग-निर्मित नसून ते मनुष्यनिर्मित आहेत आणि मनुष्य-निर्मित प्रश्न, माणसेच स्वतःच्या संघटनेने आणि संघर्षाने सोडवू शकतात. याची जाणीव दलित समाजात आणि आदिवासीत निर्माण होत आहे. ही जाणीव ज्या प्रमाणात आणि ज्या वेगाने सर्वव्यापी होत जाईल त्या प्रमाणात आणि त्या वेगानेच उद्याचे परिवर्तन जवळ येत राहील. सामाजिक–आर्थिक क्रांतीचा वेग हा समाजप्रबोधनाच्या वेगावर अवलंबून असतो. याची जाणीव झाली तर आज खंडित झालेल्या समाजप्रबोधनाच्या चळवळीला या क्रांतीच्या प्रक्रियेत किती अनन्यसाधारण महत्त्व आहे याची कल्पना येईल.

दलित समाजातल्या काही जातींत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षात्मक चळवळींनी आणि त्यांनी दिलेल्या वैचारिक प्रेरणांनी ही प्रक्रिया अधिक वेगवान झालेली दिसते. दलित समाजापुढे आर्थिक प्रश्नाबरो-बरच सामाजिक प्रश्नही अतिशय तीव्र स्वरूपात उभे आहेत. गुलामगिरीच्या विरोधात बंड करण्यासाठी समुदायात जो आत्मविश्वास असावा लागतो तो आत्मविश्वास आर्थिक दास्य सैल होण्याशी निगडीत आहे. आज पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यात जी चळवळ आपल्याला वेगवान दिसते व त्यांच्यात जो दुर्दम्य आत्मविश्वास दिसतो याचे एक कारण दलित समाजात स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक दृष्टया निर्माण झालेला मध्यमवर्ग आहे. याकडे दुर्लक्ष होऊ नये.

आदिवासींचा विचार करताना त्यांच्या समोरील महत्त्वाचा प्रश्न हा त्यांचे जमीनदारांच्याकडून अव्याहत होत असलेले शोषण हा आहे. एकूण भारतीय समाजातून हा समूह शतकानुशतके काही प्रमाणात अलिप्त राहिलेला दिसतो. त्यांची या मुख्य समान प्रवाहांशी तुटलेली नाळ पुन्हा जोडल्याशिवाय दलित–आदिवासी यांच्या चळवळीत सुसंवाद निर्माण करणे शक्य होणार नाही.

या दोन्हीही जनसमुदायांचे प्रश्न हे खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन करण्याचे प्रश्न आहेत. या देशातील कोणत्याही एका जातीचे अथवा जमातीचे प्रश्न संपूर्ण समाजव्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन केल्याशिवाय सुटू शकणार नाहीत याची जाणीव झाल्याशिवाय या जातीजमातींच्या पृथक–पृथक चळवळींना एकत्रित आणण्याचे निकडीचे प्रयत्न अशक्य आहेत. ही जाणीव अधिक तीव्र आणि सर्वव्यापी करणे आता आपल्याला शक्य आहे. ■ ■

# अमळथे : संघटनांचा नवा आदर्श

## गोविंदराव शिंदे



अमळथे हे धुळे जिल्ह्याच्या सिंदखेडा तालुक्यातील छोटेसे गाव. गावच्या गरीब, भूमिहीन, दलित, आदिवासी, काष्ठी या तीस कुटुंबानी मिळून तेथील ४० एकर गुरचरण जमिनीत शेती केली होती. तापीकाठचे हे गाव. त्यामुळे जमीन अत्यंत सुपीक. पीक अत्यंत चांगले. ज्वारीचे पीक कापायला आले असताना गावच्या धनदांडग्या लोकांनी त्या गावच्या गरीब लोकांना बोलावून आम्हाला गुरचरण जमीन पाहिजे, तुम्हाला आम्ही शेती कापू देणार नाही. तुमच्या शेती-मध्ये आम्ही जनावरे चारणार अशा प्रकारे धमकावून सांगितले. ते पीक जर जायला नको असेल तर पाच हजार रुपये बारा तासाच्या आत आणून द्या असे धमकावले. गरीब लोकांनी आधीच उसनवारी करून शेती केली होती. त्यांना कर्ज झाले होते. आता परत त्यांना एवढी रक्कम कोण देणार ? परंतु त्यांनी सोन्यासारखे पीक हातातून जाऊ नये म्हणून तीन हजार रुपये पिकातून द्यायची तयारी दाखवली. गावच्या धनिक लोकांनी पाच हजार रुपये मिळावेत असाच आग्रह धरला, आणि शेवटी ते पैसे मिळाले नाहीत म्हणून जनावरे शेतीत घातली.

आपल्या शेतीमध्ये जनावरे जाणार, नुकसान होणार. ते थांबविण्यासाठी गरीब लोक पोलिस, तहसीलदार, कलेक्टर, डी. एस्. पी. यांच्याकडे गेले व त्यांनी तक्रार नोंदविली. त्याचा काहीच उपयोग झाला नाही. आपला वाली कुणीच नाही असे त्यांना वाटले. तहसीलदार तिसऱ्या दिवशी गावात आले व त्यांनी आता शेतीमध्ये जनावरे चारणार नाही असे धनिकांच्याकडून लिहून घेतले त्याचबरोबर गरिबांच्याकडून पुढील वर्षी आम्ही शेतीमध्ये अतिक्रमण करणार नाही असे लिहून घेतले. तहसीलदार गेल्यानंतरदेखील शेतीचे नुकसान करण्याचे काम चालूच राहिले. अखेर त्यांनी ग्रामस्वराज्य समि-तीच्या कार्यकर्त्यांकडे येऊन आपली करुण कहाणी सांगितली. ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांनी लगेच गावांत जाऊन परिस्थिती पाहिली. गरिबांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले होते. ज्यांनी नुकसान केले त्या धनिकांच्या भेटी घेण्यात आल्या. आपण केलेले नुकसान योग्यच होते. अशीच भूमिका होती. जाब विचारण्यासाठी गरिबांची शक्ती संघटित करणे एवढा एकच मार्ग उरला होता. प्रथम एका पत्रकार परिषदेत गरिबांचे जे नुकसान झाले त्याचे निवेदन करण्यात आले. त्याला चांगली प्रसिद्धी मिळाली. गावा-गावात या प्रश्नासंबंधी सभा घेऊन जनमत संघटित करण्यात आले, एक मोर्चा काढण्यात आला. सर्व सर-कारी व गावच्या प्रमुखांसमोर नुकसान झालेल्यांना भरपाई दिली पाहिजे हे मान्य करण्यात आले.

### महसूलमंत्र्यांपुढे गाऱ्हाण्याची चौकशी


महाराष्ट्राचे महसूलमंत्री श्री. उत्तमराव पाटील यांची या गावात जमीन आहे—त्यांनाहि निवेदन पाठ-विण्यात येऊन त्यांनी या प्रश्नात लक्ष घालावे असे सुचविण्यात आले. २६ डिसेंबरपासून एक आठवडाभर शेतीचे नुकसान चालले होते. त्यानंतर १५ दिवसांनी मोर्चा आयोजित करण्यात आला. १० फेब्रुवारीला महसूलमंत्री अमळथ्याला आले. त्यांच्या उपस्थितीत गरिबांचे झालेले शेतीचे नुकसान भरून मिळावे, नवीन सरकारी नियमाप्रमाणे त्यांना जमीनही मिळावी व या

कराराची अंमलबजावणी एक महिन्याच्या आत करावी, शेतीचे नुकसान सरकारी अधिकाऱ्यांनी मोजावे असे त्या बैठकीत ठरले. त्याप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांनी एका आठवड्यातच शेतीच्या नुकसानीचा आकडा काढला. ४२५ क्विंटल ज्वारी व सुमारे १५ हजार रुपयांचा कडबा इतके नुकसान झाले आहे असे त्यांनी सांगितले. नुकसानीचा अंदाज सुमारे पंचावन्न हजार रुपयांचा झाला. ही नुकसानभरपाई मिळावी व जमीनही मिळावी अशी मागणी गरिबांनी सुरू केली. १० मार्चला एक महिना संपला म्हणून महसूलमंत्र्यांना स्मरण देण्यात आले. त्याचा काही उपयोग झाला नाही म्हणून २१ तारखेला सिंदखेड तहशील कचेरीवर मोर्चा आयोजित करण्यात आला. अमळथे व इतर गावचे लोक मोर्चामध्ये सामील झाले होते. अमळथे गावातून गावातून मोर्चा बाहेर आल्यानंतर गावात जे गरीब लोक राहिले होते त्यांना धनिकांनी मारहाण केली. त्यामुळे मोर्चातील मंडळी परत आली त्यांनाही काठ्यांचा चांगला प्रसाद मिळाला. अशाही परिस्थितीत मोर्चा सिंदखेडला पोचला व त्यांनी आपले मागणे ठामपणे तहशीलदार व इतर अधिकाऱ्यांपुढे मांडले. तहसीलदारांनी लवकरच निर्णय घेऊ असे मोर्चापुढे येऊन आश्वासन दिले. मोर्चा निघाल्याचे कळल्यावर महसूलमंत्र्यांनी दोन्ही बाजूच्या लोकांना व तहसीलदार–कलेक्टर यांना मुंबईत बोलावले. मुंबईत दोन दिवस चार वेळा चर्चा झाली. ४२५ क्विंटल हे जास्त आहे. इतके आम्ही देणार नाही, आम्ही फार तर २५ क्विंटल देऊ अशी भूमिका धनिकांनी घेतली. महसूलमंत्र्यांनी समजावल्यावरून ८८ क्विंटल धान्य देऊ असे ठरले; परंतु गरिबांनी हे मानले नाही आणि वाटाघाटी फिसकटल्या. अमळथ्याच्या या अन्यायाची प्रसिद्धी सर्वत्र झाल्यामुळे छात्र युवा संघर्षवाहिनीची मंडळी अमळथ्याला जाऊन पोहचली व त्यांनी याबाबत महसूलमंत्र्यांना जाब विचारला. तुमच्या उपस्थितीत झालेला करार का मोडला जात आहे हे त्यांनी विचारले. त्यासंबंधी वर्तमानपत्रात लेख आहे. पुन्हा सरकारी अधिकारी बोलणी करायला आले. कलेक्टर अमळथ्याला जाऊन आले व शेवटी शासनाने ३० भूमिहीनांना प्रत्येकी तीन एकर जमीन देण्याचे मान्य केले. मुख्यमंत्रीनिधीतून त्यांना साधने देण्याचे महसूलमंत्र्यांनी जाहीर केले.

प्रकरण संपत आलं असं वाटलं. परंतु गावचे पुढारी लोक सहजासहजी गरिबांना न्याय देतील तर ते पुढारी कसले? वरचा निर्णय काही असो आम्ही तो चालू देणार नाही असेच जणू त्यांनी ठरवलेले होते. सुमारे चार महिने या गरीब लोकांना खूप त्रास झाला. धनिक लोकांनी त्यांना काम देण्याचे बंद केले. इतरही अडवणूक करण्याचा प्रयत्न केला; परंतु गरीब संघटित झालेले असल्यामुळे त्याचा काही उपयोग झाला नाही. गरिबांच्यात फाटाफूट करण्याचा प्रयत्न झाला. तेही जमले नाही. शेवटी सरकारी अधिकाऱ्यांवर, मंत्र्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न करण्यात आला कारण हे जनता पक्षाचे लोक! त्यांना वाटले सरकारच आपले!! मंत्री आपलेच, आमचे कोण काय करणार! सरकारने जमीन द्यायचे ठरवले. आता नुकसानभरपाईचा प्रश्नच नाही असे सांगून सरकारी अधिकाऱ्यांनी गरीब लोकांना नुकसानभरपाई देण्यासाठी जमवून ठेवलेले ६६ पोती धान्य पुढारी मंडळींनी एक दिवस रात्री ट्रकमध्ये भरून २५ मैलांवरील दोंडाईचा या गावी नेऊन ठेवल्यामुळे गरीब लोकांना धक्का बसला. काय करावे त्यांना समजेना. त्यांनी अधिकाऱ्यांना सांगून पाहिले; परंतु उपयोग झाला नाही. जमिनीचे वाटप करा असा आग्रह त्यांनी धरला. जी ८ एकर जमीन द्यायची ती आम्ही देतो, ती घ्या, असे सरकारी अधिकारी गुर्मित सांगू लागले. साठ एकरांपैकी वीस एकर खडकाळ जमीन द्यायची योजना होती. गरिबांनी ती जमीन घेण्याचे नाकारले. ग्रामस्वराज्य समितीने कलेक्टरना विनंती केली की सरकारी नियमाप्रमाणे लोक कसत असलेलीच जमीन प्रत्यक्ष ताब्यात द्या. कलेक्टरांनी ते मान्य केले. दोन दिवसांनी असिस्टंट कलेक्टर तहसीलदारना घेऊन गांवात गेले व सरकारी थाटात त्यांनी मिळेल ती जमीन घ्या असे लोकांना सांगितले यावर लोकांनी सरकारी नियम सांगितला. पाच महिने झालेली उपासमार सांगितली. आमची नुकसानभरपाई तुम्ही कबूल केलीत ती मिळाली नाही. उलट तुम्ही जमवलेले धान्य नेण्यात आले. आता आम्ही गरिबांनी विश्वास कोणावर ठेवावा. आपण आलाच आहात तर याबाबतचा निकाल देऊनच जा. तोपर्यंत आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही असे सांगून गरीब बायांनी त्या अधिकाऱ्यांना घेराव घातला व गाणी म्हणत त्यांच्याभोवती बसून राहिल्या. अधिकाऱ्यांची भाषा बदलली. तुम्ही कसत असलेली जमीन तुम्हाला देतो. ६६ पोती धान्यही आणून देतो असे चार तासांच्या घेरावानंतर अधिकाऱ्यांनी मान्य केले. दोन दिवसांनी हे धान्य आणून देण्यात आले.

सरकारी अधिकाऱ्यांनी जे शेवटी केले ते त्यांनी प्रथमच तत्परतेने केले असते तर त्या गरिबांना एवढा त्रास झाला नसता. गरीब लोक संघटित झाले तर आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचा प्रतिकार करू शकतात, न्याय मिळवू शकतात हे आमच्या गावच्या बहाद्दर लोकांनी दाखवून दिले आहे. असे अन्याय खेड्यापाड्यात गरिबांवर सतत होत असतात त्यांनी अमळथे गावच्या गरिबांचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवून आपण संघटित होऊन आपले प्रश्न सोडवले पाहिजेत. ■ ■

# परिवर्तन : आदिवासी मुलांचा दृष्टिकोण



## अशोक ताकमोगे

बाबा आमटे यांच्या सोमनाथ प्रकल्पावरील श्रम-संस्कार शिबीर आंतरभारतीतर्फे या वर्षी १९ मे ते २८ मे या काळात झाले. शिबिरात महाराष्ट्रांतील अनेक गावातून मुले आली होती. त्यात बाबा आमटे यांच्या भामरागड येथील लोकबिरादरी प्रकल्पातील शाळेमधील आदिवासी मुलेमुलीही होती. या शिबिरात सकाळी माती टाकण्याचे श्रमदान होई. दुपारी चर्चा, बाबांचे विचारकथन, अनुभवकथन होई. एक दिवस 'परिवर्तन' हा चर्चेचा विषय होता. आदिवासी मुलाला या चर्चेत भाग घ्यायला लावला गेला. घर, शेती, अन्न, कपडे, गाव या पाच गोष्टींमध्ये कोणते परिवर्तन हवे असे त्यांना विचारले. आज ते जे जीवन जगतात त्यात त्यांना कोणता बदल हवा आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने वरील पाच गोष्टींवर त्यांची मते घेतली.

आजचे आदिवासीचे घर म्हणजे झोपडी. काही ठिकाणी कौले घातलेली असतात. तर काहींना खिडक्याच नसतात. न्हाणीघर नसते अशा घरात राहणाऱ्या मुलांना सिमेंट–विटांचे घर हवे आहे. घरांना खिडक्या असाव्यात. खिडक्यांना उजेड येण्यासाठी काचेची दारे असावीत. असे त्यांना वाटते. छतावर कौले असावीत, सामान ठेवण्यासाठी अलमाऱ्या, पेटचा असाव्या. घरात रात्रीसुद्धा दिवसासारखे दिसावे म्हणून वीज हवी (पियाल लेकादिसीता...त्यांचे शब्द) संडास, नळ, पाण्याची टाकी असावी. आंघोळीची सोय व्हावी, भिंतींना रंग लावावा. घरात पंखा, खुर्च्या, पाकीट (पैसे ठेवायला), चटई, रेडिओ, रेकॉर्ड प्लेअर, सायकल असावी. जेवणासाठी स्टीलच्या ताट, वाटचा, ग्लास असावेत अशा या मुलांच्या अपेक्षा आहेत.

घराविषयी त्यांच्या मागण्या या कल्पनतून आलेल्या नसून त्यांनी लोकबिरादरी, भामरागड, सोमनाथ येथे जे पाहिले त्यावरून आलेल्या आहेत. शिवाय पाठ्य-पुस्तकांमुळे त्यांना काही गोष्टी समजल्या असणे शक्य आहे. ज्यातून त्यांना 'असावे घरकुल अपुले छान' वाटले.

आदिवासींचे अन्न म्हणजे भाताची पेज, भात आणि त्यासोबत असेल तर मासळी, मांस आणि जंगलात मिळणारी पालेभाजी व बांबूचे कोवळे कोम-सणाला ते तांदळाच्या पिठात गूळ घालून, तळून पोळचा करतात. वरचे दूध त्याच्या जीवनात नाही. अशा प्रकारचे अन्न वाढलेल्या मुलांना गव्हाची पोळी, ज्वारीची भाकरी हवी आहे. डाळीचे वरण असावे. कोबी, भेंडी, चवळी, गवारी, वांगी, टोमॅटो, बटाटा, मुळा, मेथी या फळभाज्या–पालेभाज्या जेवणांत हव्यात असे त्यांना आता वाटते. केळी, पपई, रताळी, ऊस, नारळ ही फळे हवीत. दूध, दही, ताक मिळावे अशी त्यांची इच्छा आहे.

लोकबिरादरी आश्रमशाळेतील मुलांना पोळचा–भाकरी दिली जाते. तेथील शेतात पिकणाऱ्या फळभाज्या–चवळी, वांगी, भेंडी, गवार, दिल्या जातात. शिवाय पाठ्यपुस्तकात अनेक पदार्थांची माहिती असते.

शेती हा आदिवासींचा प्रमुख व्यवसाय असला तरी शेतीची त्यांची पद्धत अतिशय जुनी आहे. भातशेती प्रमुख असून मका, मिरच्या, तंबाखू वगैरे पिके कमी प्रमाणात घेतली जातात. नांगर अतिशय लहान असून दहा ते पंधरा सेंटिमीटर खोलीएवढीच नांगरट होऊ शकते. ते तण काढीत नाहीत. भात फेकून पेरणी करतात. अशा वातावरणात वाढलेल्या मुलांना शेतीविषयीचे परिवर्तन हवे आहे.

शेतांना सभोवती पाळ–बांध हवेत. पाण्याच्या नियमित पुरवठ्यासाठी विहिरी, बोडी–छोटे तलाव असावेत. पाणी देण्यासाठी एंजिन हवे. शेतीच्या कामासाठी चांगले बैल हवेत. बैलांना पाणी पिण्यासाठी टाकी, त्यांना बांधण्यासाठी चांगला गोठा, बैलबंडी–

बैलगाडी हवी. शेत नांगरण्यासाठी लोखंडी नांगर पाहिजेत. शेतीच्या कामासाठी कुऱ्हाडे, फावडे, टिकाव, वखर साखळ्या हव्यात. पाणी देण्यासाठी बांधलेले कालवे हवेत. शेतात पेरण्यासाठी चांगले बी हवे. त्याबरोबरच निरनिराळी खते हवीत, असे त्यांना वाटते. लोकबिरादरी प्रकल्पावरील सुधारित पद्धतीने केली जाणारी शेती पाहून मुलांच्या शेतीविषयीच्या गरजा कळल्या आहेत. सुधारित पद्धतीने शेती केल्यास आपले उत्पन्न नक्की वाढेल असे मुलांना जाणवते.

कमरेला फक्त लंगोट हा आदिवासी पुरुषांचा अधिकृत पोषाख. अलीकडे मुले हाफपॅन्ट, मॅनिला वापरू लागली आहेत. पांढरी अर्धी पातळे स्त्रिया गुडघ्यापर्यंत नेसतात. नवी पिढी झंपर वापरू लागली आहे. आदिवासी मुलांच्या कपड्याबाबतीतील गरजा बदलल्या आहेत. टेरिकॉटचे कपडे चांगले व दोन-तीन वर्षे टिकतात म्हणून हवेत. पँट हवी, लुंगी हवी असे एका मुलाने सांगितले. कारण विचारल्यावर 'लुंगी घातल्यानंतर मुली बघतात' असे तो म्हणाला. घड्याळ, टोपी त्यांना हवी आहे. आदिवासी पावसासाठी टोपल्यासारखी विणलेली वस्तू वापरतात. ती घडी करता येणारी हलकी छत्री त्यांना हवी आहे. चादर, गादी, रूमाल घरी असावा. मुलीसाठी साडी, परकर, पोलकं, रिबीन, क्लिपा, बांगड्या असाव्या, गंगावन असावे, अंबाडा मोठा करण्यासाठी. पांढरी गर्द– पांढऱ्या साड्या हव्यात. अशी मुलींची अपेक्षा आहे.

आदिवासी भागात येणाऱ्या शहरी माणसांकडे पाहून मुलांचा दृष्टिकोन तयार झाला आहे. मुलींना आकर्षित करण्याचे प्रभावी साधन म्हणून आता त्यांना कपड्याची गरज वाटते. यामुळे काही मुलांना आपल्या आईवडिलांची त्यांच्या कपड्यांमुळे लाज वाटते. शहरी जीवनाचा पोशाखीपणा दुर्दैवाने या मुलांमध्ये प्रामुख्याने रुजत आहे.

गावात सार्वजनिक ठिकाण म्हणजे घोटूल. धर्मशाळा असते. पण सार्वजनिक स्वच्छता आदिवासी गावात आढळत नाही. अशा गावात वावरणाऱ्या मुलांना गावात शाळा असावी, दवाखाना असावा, पोंगा– (लाऊडस्पीकर) असावा, गावातील लोकांना पाणी पिण्यासाठी विहीर असावी, पाण्याची टाकी बांधून नळ फिरवावेत, गावात 'लाईट' असावी असे वाटते. मुलांना, खेळण्यासाठी सामान असावे, आवश्यक वस्तूंचे दुकान असावे, कपडे शिवण्याची मशीन असावी. गावात बगीचा हवा. (जंगल नको कारण त्यात अस्वले असतात) असे जाणवले आहे. सपाट जमीन हवी. असे एका मुलाने म्हटल्यानंतर जई नावाच्या मुलीने म्हटले, 'झाडे असावी, कारण बिडीपत्ता, पाने तोडून विकता येतील.' गावाजवळील नदीवर ओढ्यांवर पूल हवेत. रस्ते डांबरी हवेत अशी अपेक्षा आहे. गावातील रस्ते वाकडेतिकडे असतात, सरळ नकोत का? असे विचारले तेव्हा ते म्हणाले, सरळ असावेत. रस्ते सरळ करण्यासाठी आड येणारी तुमची घरे काढावी लागतील असे सांगितले तेव्हा मुले म्हणाली, 'मग सरळ रस्ते नसले तरी चालतील; पण डांबरी असावेत. गावात हॉटेल असावे असे त्यांना वाटते.

गावाविषयी मुलांच्या गरजा पाहिल्यानंतर त्यांच्या विचारसरणीची कल्पना येते. लाऊडस्पीकर हवा कारण त्यावर गाणी ऐकता येतात. आदिवासी मुलगा जेव्हा जंगल, झाडे नको म्हणतो तेव्हा धक्का बसतो. गावासाठी स्वतःला काही झीज सोसावी लागत असेल तर ते त्याला नको आहे. म्हणून तो सरळ रस्त्यांना विरोध करतो.

आदिवासी जीवनात आज अस्तित्वात असणाऱ्या कोणत्या गोष्टी तुम्हाला नको वाटतात, सोडून द्याव्याशा वाटतात असे मुलांना विचारले. विचारण्यामागचा उद्देश असा होता की स्वतःच्या जीवनात काही वाईट गोष्टी आहेत त्या आपण सोडल्या पाहिजेत याची त्यांना जाणीव व्हावी. त्यावर मुले म्हणाली की, दारू पिणे, पैसे लावून पत्ते खेळणे, तंबाखू खाणे नको. एका मुलाला 'तू तर तंबाखू खातोस की' असे विचारता तो म्हणाला, 'तंबाखू खाणे चांगले नाही हे समजत असूनही मी खातो, पण ती खाऊ नये.' चोरी करणे नको. लाम दायना नको. (लग्नात मुलाने मुलीच्या वडिलांना पैसे द्यायचे असतात. पैसे नसतील तर मुलाने लग्नापूर्वी मुली घरी जास्तीत जास्त ७–८ वर्षे ठरले असेल तितकी वर्षे काम करायचे असते. यालाच ते तात्पुरता घरजावई जाणे किंवा 'लाम दायना' म्हणतात.) मुलीच्या बापाने जास्त पैसे घेऊ नयेत. जातपात नको. कुठलीहि बायको मिळावी. नसबंदी ऑपरेशन नको. होतील तितकी मुले पाहिजेत. कष्ट करील तितके उत्पन्न मिळावे. भानामती नको. प्लँटेशन सरकारचे आहे. जंगल आमचे म्हणून फॉरेस्ट गार्ड नकोत. एंड्रिनने मासे मरतात ते नको. त्याचप्रमाणे नरबली देतात तेहि नको.

जातपात नको असे मुले म्हणतात. बरीच प्रगत विचारसरणी वाटते; पण मुले भरपूर हवीत असेही मुले म्हणतात. जंगल आदिवासींना स्वतःचे वाटते तर लावलेली झाडे असतात म्हणून प्लँटेशन सरकारचे असे मुले म्हणतात. या सर्व चर्चेवरून आदिवासी मुलांचा भावी जीवनविषयक दृष्टिकोण समजतो असे वाटते.

जीवनात बदल हवा असेल तर तो मिळविण्यासाठी काय कराल असे विचारले असता बहुतेक मुलांनी काम करू, कष्ट करू असे लिहिले. या भागात उपलब्ध असलेली कामे म्हणजे बांबूकटाई, बीट कटाई, बिडीपत्ता

(पान ३८ पहा)

# शोषणाच्या समस्येचे दर्शन

## सुधीर बेडेकर

गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये दलितांबरोबरच आदिवासींच्या समस्यांना तोंड फुटले आहे. शहादे भागातली आदिवासी शेतमजुरांची जळवळ, ठाणे जिल्ह्यातील भूमिसेनेचे आंदोलन, संथाळ परगणा व झारखंड यासारख्या उत्तर विभागातील चळवळी इत्यादीमुळे आदिवासींचे जीवन व त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक याकडे लक्ष देण्याची आवश्यकता सर्वसाधारण समाजाला भासू लागलेली आहे. १९७३ च्या सुमारास महाराष्ट्रातील आदिवासींवर एक लेखमाला लिहिण्यासाठी तयारी करीत असताना मला असे आढळले की, मराठीत या विषयावर सविस्तर व माहितीपूर्ण पुस्तक एकच आहे, ते म्हणजे डॉ. सुधीर फडके यांचे 'महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न' हे जुने, १९६३ मध्ये प्रसिद्ध झालेले छोटेखानी पुस्तक. डॉ. गोविंद गारे यांच्या पुस्तकाने* ही एक मोठी उणीव भरून निघालेली आहे. डॉ. गोविंद गारे हे स्वत: आदिवासी जीवन अनुभवलेले आणि आदिवासींच्या विकासाशी बांधिलकी असणारे आहेत. तसेच या विषयाचा त्यांनी गेली काही वर्षे सखोल अभ्यास केलेला आहे. त्यामुळेच त्यांच्या पुस्तकाचे महत्त्व विशेष आहे. हे पुस्तक जसे आकडेवारी व इतर माहितीने परिपूर्ण आहे, तसेच प्रत्यक्षामध्ये आदिवासींना भेडसावणाऱ्या समस्यांची अनुभवाधिष्ठित जाण त्यामध्ये आहे आणि सत्य मांडण्यासाठी लागणारा पुरेसा परखडपणाही आहे.

आदिवासींची लोकसंख्या व तिची महाराष्ट्रातील विविध जिल्हावार व जमातवार विभागणी प्रथम देऊन नंतर आदिवासींचे शिक्षण, आरोग्य, आर्थिक समस्या, जंगल व जमिनीविषयक समस्या आणि त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न याविषयीचे विवेचन यामध्ये आहे. या सर्व बाबींमध्ये आदिवासी किती मागास राहिले आहेत व स्वातंत्र्यानंतर तीस वर्षांमध्येही किती दुर्लक्षित राहिलेले आहेत याचे विदारक चित्र समोर उभे राहते. पण त्याचबरोबर हे लक्षात येते की, आदिवासींचे मागासलेपण व समस्या या प्रामुख्याने बिगर आदिवासींकडून त्यांच्यावर लादल्या गेलेल्या आहेत. व्यापारी, सावकार, ठेकेदार, जमिनदार किंवा सरकारी अधिकारी यांचा स्वार्थ, अमानुषता व बेपर्वाई यांच्या तावडीत सापडल्यामुळेच आदिवासींचा विकास खुंटला आहे. त्यांच्या समाजजीवनाची वैशिष्टचपूर्णता लक्षात न घेता त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक इ. समस्या सोडवण्याची शासनाची धडपड अपयशी ठरते, एवढेच नाही तर आदिवासींची पिळवणूक व दडपणूक शाबूत ठेवण्यालाच मदत करते असेच म्हणावे लागते. प्रस्तुत पुस्तक वाचणाऱ्या कोणालाही याचे प्रत्यंतर पदोपदी येत राहते. मग तो प्रश्न शिक्षणाचा असो अथवा जंगल जमिनींचा, प्रस्थापित शोषकरचना व शासन यांच्याशी संघर्ष केल्याशिवाय आदिवासींच्या समस्या सुटणे शक्य कोटीतले नाही. या संदर्भात आदिवासी जनतेमध्ये काम करणारे सेवाभावी कार्यकर्ते व खुद्द आदिवासी नेतृत्व यांच्याविषयीदेखील काही महत्त्वाच्या गोष्टी डॉ. गारे सांगून जातात विशेषत: अनेक आदिवासी आमदार-खासदार पुढारीच आदिवासी जनतेच्या हिताविरुद्ध झाले आहेत, शोषक झाले आहेत हे लक्षात घेण्याजोगे विदारक सत्यदेखील ते निर्भिडपणे मांडतात व खुद्द आदिवासी जनतेनेच जागृत व संघटित होऊन धडपडल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत असे प्रतिपादन करतात.

आदिवासी जीवनाची संपूर्ण समज येण्याच्या दृष्टीने पुस्तकातील विवेचन काही दृष्टींनी अपुरे राहते असे मला वाटते. एक तर डॉ. गारे यांनी आदिवासी जीवनाचा थोडक्यात इतिहास दिला असता तर ते उपयुक्त झाले असते. तसेच आदिवासी व बाहेरचा व्यापक समाज यांच्या योग्य मेलनाची समस्या जर समजून घ्यायची तर बाहेरच्या समाजाची बैठक व रचना यांचा विचार करावाच लागतो. स्वार्थ, स्पर्धा व भांडवल यावर चाललेला हा बाहेरचा समाज आणि आदिवासी समाज यांच्यात 'योग्य' मेलन कधी होऊ शकेल ही दुरापास्त गोष्ट आहे. प्राचीन काळापासून भारतीय वरिष्ठवर्गीय प्रभुत्वाखालील समाजाने आदिवासींना जसे दडपले व शोषले तशीच दडपणूक व शोषण—अर्थात वेगळ्या प्रकारे, भांडवलाच्या आधारे हा सध्याचा समाज करू शकतो! त्यामुळेच 'आदिवासींच्या समस्या' या खरे म्हणजे मुख्यत: 'भारतीय समाजाच्या समस्या'च आहेत. प्रस्थापित भारतीय समाजरचनेत ती तशीच ठेवून, एकात्म समाजजीवन व आदिवासींचा विकास अशक्यप्राय आहे हे स्पष्टपणे मांडले जायला हवे.

मुद्रणदोषांची प्रचंड संख्या वाचकाला काट्याकुट्यांसारखी बोचत राहते.

---

***आदिवासींच्या समस्या** : विचार आणि विश्लेषण/ डॉ. गोविंद गारे / आदिवासी समाजविज्ञान प्रकाशन, नाशिक / पृष्ठसंख्या २७२ / किंमत २५ रुपये. (१९७६)

# मानव विज्ञान परिषद चर्चासत्राचा वृत्तांत

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे, या संस्थेच्या विद्यमाने २४ व २५ फेब्रुवारी १९७९ रोजी विद्यार्थी गृह, पुणे येथे आदिवासी कार्यकर्त्यांचा एक मेळावा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात १. जमिनीच्या हस्तांतराचा प्रश्न २. आदिवासी उपयोजना ३. एकाधिकार व्यापार ४. जंगल जमिनीचा प्रश्न व आदिवासी जंगल कामगार संस्था ५. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद या संस्थेबद्दल अपेक्षा या विषयांवर चर्चा झाली. चर्चेत, एकूण ४५ सदस्यांनी भाग घेतला. त्यापैकी २५ कार्यकर्ते महाराष्ट्रातील ठाणे, कुलाबा, नाशिक, धुळे, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, अहमदनगर व पुणे जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रांत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी होते. महाराष्ट्र सरकारच्या समाज कल्याण, आदिवासी संशोधन संस्था, जंगल विभाग इत्यादी विभागातील शासकीय अधिकारी चर्चासत्रास उपस्थित होते. प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांनी परिषदेचे अध्यक्ष या नात्याने चर्चासत्राचे संचलन केले. परिषदेचे सरचिटणीस व पुणे विद्यापीठाच्या मानवता विभागाचे प्रमुख प्रा. रामचंद्र मुटाटकर यांनी चर्चासत्राचे प्रास्ताविक केले.

श्री. शरद कुलकर्णी यांनी जमिनीच्या हस्तांतराच्या प्रश्नांची प्रास्ताविक माहिती दिली.

जमिनीच्या हस्तांतराचे तीन प्रकार आहेत. १. बेकायदेशीर हस्तांतर २. कायदेशीर हस्तांतर ३. मोघम हस्तांतर. शासनाने हस्तांतराविरुद्ध कायदे केले तरी त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही. कोर्टकचेऱ्या आदिवासींना पैशाच्या अभावी व त्यांच्या अबोल स्वभावामुळे किंवा वृत्तीमुळे जमत नाहीत. दैनंदिन व्यवहारात, सावकारांवर अवलंबून असल्याने त्यांच्याविरुद्ध जाता येत नाही. आदिवासींच्या बाजूने निकाल लागले तरी प्रत्यक्ष ताबा मिळणे २५ टक्के खटल्यांच्यावर जात नाही. बऱ्याचदा, जमीन कागदावर आदिवासींच्या नावावर असते तर प्रत्यक्ष ताबा सावकाराचा असतो. हे मोघम हस्तांतर कागदोपत्री येत नाही. अंमलबजावणी करणारी सरकारी यंत्रणा व अधिकारी यांचा बिगर आदिवासींबरोबर, सावकारांबरोबर रोजचा संबंध असल्याने, त्यांच्याविरुद्ध अंमलबजावणी करणे अवघड असते. असे असल्याने या प्रश्नांची उकल करण्यासाठी जनजागृती व संगठना हेच उपाय आहेत असे मत चर्चेत व्यक्त करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. गोविंद गारे यांनी आदिवासी उपयोजनेची माहिती दिली. चर्चेत भाग घेणाऱ्यांनी आदिवासींना शोषणमुक्त करणे, सावकारीला पर्यायी यंत्रणा उभारणे व आदिवासींचा विविध क्षेत्रांत विकास घडविणे या उपाययोजनेच्या उद्दिष्टांबद्दल समाधान व्यक्त केले. परंतु अंमलबजावणी करताना उपाययोजना आदिवासींच्या विकासाकरिता आहे किंवा आदिवासींच्या प्रदेशाच्या विकासाकरिता आहे याबद्दल शंका उपस्थित करण्यात आली. आदिवासी प्रदेशातून जाणाऱ्या मोठ्या रस्त्यांचे डांबरीकर, पाझर तलावांच्या पाण्याचा सावकारांच्या जमिनीचे सिंचन करण्यासाठी उपयोग अशा प्रकारांमुळे आदिवासी खेडी रस्त्याअभावी दुर्लक्षित राहणार ही चिंता व्यक्त करण्यात आली. स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी विकास कार्यक्रमात काम केले असल्याने त्यांना अनुभव असतानाही त्यांना उपाययोजनेतून संपूर्णपणे वगळण्यात आले आहे. ज्या शासकीय अधिकाऱ्यांना आदिवासी भागात शिक्षा भोगण्यासाठी पाठविलेले असते तेच आदिवासी विकासात स्वतःस तज्ज्ञ समजतात. आदिवासी उपयोजनेचा पैसा सरकारच्या विविध विभागात वाटण्यापलीकडे इतर अंमलबजावणी होत नाही अशी तक्रार अनेकजणांनी केली. एका प्रकल्प अधिकाऱ्याला सर्व विभागांतील कामांचे संचलन करणे जमत नाही. उपाययोजनेबद्दलची माहिती फक्त सरकारी कामकाजासाठी इंग्रजीत असते व ती लोकांपर्यंत पोहोचत नाही. उपाययोजनेच्या कार्यवाहीमुळे काही विकसित आदिवासी गावांनाच फायदा मिळतो व कातकऱ्यांसारखी उपेक्षित आदिवासी गट मागासलेलेच राहतात. त्यामुळे आदिवासीतही जातीसंस्थेसारखी श्रेणी रचना निर्माण होऊन आपापसात संघर्ष, तणाव वाढतील अशी भीती व्यक्त करण्यात आली.

आदिवासी भागात काम करणाऱ्या प्रशासकांना त्यांच्या कौटुंबिक अडचणी लक्षात घेता जादा वेतनश्रेणी द्यावी असेही सुचविण्यात आले.

समाजकल्याण खात्याचे उपसंचालक श्री. बोधनकर व डॉ. गोविंद गारे यांनी एकाधिकार व्यापाराबाबत शासकीय धोरण व अंमलबजावणीची यंत्रणा याची माहिती दिली. आदिवासी विकास महामंडळाचे ९० टक्क्यांवर कार्यकर्ते आदिवासी आहेत हे नमूद केले. चर्चेत भाग घेणाऱ्या आदिवासी कार्यकर्त्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीचे दोषही दाखविले, १० रुपयांपर्यंतचा माल स्थानिक व्यापाऱ्यास विकता येतो ही कायद्यातील पळवाट व त्याच्या परिणामांची चर्चा झाली. सर्वसाधारण आदिवासींकडे विकण्याजोगे जास्त धान्य नहव्तेच, तेव्हा व्यापारी लहान लहान वजनाचे धान्य आदिवासींकडून विकत घेऊन मोठी रास महामंडळाकडे विकतो अशी कार्यकर्त्यांनी तक्रार केली. सरकारी यंत्रणेने आदिवासीकडून अगदी अल्प वजनाचे धान्यही विकत घ्यावे ही सूचना मांडण्यात आली. सरकारी कार्यकर्त्यांस व्यापारी पोच नसते म्हणून त्यांच्या जास्त प्रशिक्षणांवर भर देण्यात आली. अशा प्रकारच्या योजना अयशस्वी झाल्यास सावकारांचा आत्मविश्वास द्विगुणीत होतो व आदिवासीत नैराश्य व वैफल्य येऊन तो सावकाराच्या मगरमिठीत जास्त अडकला जातो.

श्री. जगदीश गोडबोले व माजी आमदार कडू यांनी जंगलजमिनीचा प्रश्न व जंगल सहकारी संस्था याबद्दल माहिती दिली. जंगल जमिनीच्या अतिक्रमणाचा प्रश्न महसूल व जंगल खात्यातील परस्पर मतभेदांमुळे भिजत राहतो व आदिवासींचे त्यामुळे शोषण होते. जंगल नसलेल्या जमिनी व अनेक वर्षे कसत असलेल्या जमिनी आदिवासींना मिळत नाहीत अशी मुख्य तक्रार होती.

वन ही राष्ट्राची संपत्ती असते परंतु वनात शेकडो वर्षे राहणारा आदिवासी मात्र दारिद्रय रेषेच्या खालीच राहत असतो हे कडूंनी आग्रहाने प्रतिपादन केले. महाराष्ट्रात पहिले मुख्य मंत्री श्री. खेर यांच्या पुढाकाराने आज सुमारे ४५० जंगल कामगार सहकारी संस्था उभ्या आहेत. परंतु जंगल विकास महामंडळ झाल्यापासून यांची परिस्थिती हलाखीची झाली आहे. महामंडळाने लागवडीचे काम करावे व सोसायटीने तोडीचे व वाहतुकीचे काम करावे अशी सूचना करण्यात आली. तसेच जंगल लाकूड सोसायटीस सवलतीच्या दरात मिळावे असेही सांगण्यात आले.

शेवटच्या सत्रात कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या अपेक्षा व्यक्त केल्या. परिषदेने विकास योजनांची माहिती थोडक्यात मराठीत कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवावी. आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची जंत्री तयार करावी.

एका आदिवासी भागातील कार्यकर्त्यांना दुसरे आदिवासी भाग व तेथील कार्य बघण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

कार्यकर्त्यांमध्ये संपर्क, संचलन व मार्गदर्शन या दृष्टीने मराठीत एक त्रैमासिक काढावे. परिषदेने केंद्रीय संस्था म्हणून विकास करावा म्हणजे इतर संस्थांचे संचलन करणे सोपे होईल.

कार्यकर्त्यांना तात्त्विक व सैद्धांतिक मार्गदर्शन करावे. असे सांगण्यात आले.

प्रा. गं. बा. सरदार यांनी अध्यक्षीय भाषणात एकंदर समाजरचना ही शोषण व वर्गरचनेवर आधारलेली आहे हे सांगितले. त्यामुळे आपापल्या हितसंबंधांची जपणूक करण्यात आदिवासी भागातील सावकार व काही लांचखोर प्रशासकीय कार्यकर्ते एकमेकांशी हातमिळवणी करतात. अप्रगत राष्ट्रात प्रत्येक बाबीचे राजकीय भांडवल होत असते व त्यामुळे सत्ता स्पर्धेस जोर चढतो. सर्व शोषित समाजाने म्हणजे आदिवासी, दलित, भूमिहीन व शेतमजूर आणि औद्योगिक कामगार यांनी शोषणाविरुद्ध एकत्रित होऊन आवाज चढविल्यास तो फलदायी ठरेल असा विश्वास प्रा. सरदार यांनी व्यक्त केला. ही त्यांची वैयक्तिक मते आहेत असे त्यांनी आग्रहाने सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष या नात्याने सर्व आदिवासी कार्यकर्त्यांकरिता व त्यांच्या अनुभवांना बोलके करण्याकरिता मानव विज्ञान परिषद अराजकीय व पक्षातीत व्यासपीठ उभारत आहे असे प्रा. सरदारांनी सांगितले.

शेवटी परिषदेचे चिटणीस प्रा. मुटाटकर यांनी कॉलेज प्राध्यापकांच्या मदतीने सुरू केलेली ही संस्था सर्वसाधारण आदिवासी व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा कसा प्रयत्न करीत आहे हे विशद केले. सुशिक्षित व आदिवासी यांच्यातील दरी सांधण्याचा दुवा म्हणून परिषद कार्य करील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

—डॉ. रा. के. मुटाटकर

# संस्था परिचय

## आदिवासी संशोधन संस्था

समाज कल्याण मंत्रालयाच्या अधिकाराखाली तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत ३ मे १९६२ रोजी आदिवासी संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. १९७३ साली ही संस्था आदिवासी कल्याण विभागाच्या अधिकाराखाली काम करू लागली.

आदिवासी जीवनावर परिणाम करीत असलेल्या सर्वसाधारण व विशेष आर्थिक बाबींचा संशोधनात्मक अभ्यास करणे, आदिवासींचे जीवन सुधारण्याच्या दृष्टीने व त्यांच्या सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी त्यांच्या चालीरीती व विशिष्ट जमाती तसेच विभागाच्या विशेष समस्या लक्षात घेऊन पथदर्शक अभ्यास अहवाल तयार करणे, आदिवासींच्या सामाजिक–आर्थिक बाबींबाबतची सांख्यिकी माहिती गोळा करून जाधिकोष तयार करणे व या माहितीचा उपयोग आदिवासी उप–योजना, एकात्मिकरण क्षेत्र विकास प्रकल्प व त्यांच्या वेळोवेळी होणाऱ्या मूल्यमापनासाठी तयार करणे, आदिवासी उपयोजनांतर्गत राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे व त्या साहचाने या कार्यक्रमाचा परिणाम पाहणे व या योजनांचा लाभ आदिवासी कितपत घेतात त्याची तपासणी करणे, विकास योजना तयार करण्यासाठी व त्यांच्या अंमलबजावणीसाठी मानववंश शास्त्रीय दृष्टिकोणातून विशेष अभ्यास अहवाल तयार करणे, आदिवासींच्या जीवनाबद्दल सांख्यिकी व अन्य माहिती गोळा करणे आदि कार्यासाठी आदिवासी संशोधन संस्था स्थापन करण्यात आली असून आतापर्यन्त संस्थेने ५० संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. संस्थेतर्फे 'आदिवासी संशोधन पत्रिका' हे द्वैवार्षिक प्रसिद्ध करण्यात येते. मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ठ करण्यासाठी विविध जातीजमाती शासनाकडे करीत असलेल्या मागण्यांची शास्त्रीय पद्धतीने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तपासणी करण्याचे कार्य आदिवासी संशोधन संस्था करते. आतापर्यन्त असे दोनशे अहवाल पूर्ण करण्यात आले आहेत. संस्थेतर्फे आदिवासी विभागात करणारे शासकीय कर्मचारी, व अशासकीय व्यक्तींसाठी प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येतात.

आदिवासी संशोधन संस्थेकडे ४००० मौलिक ग्रंथ असलेले ग्रंथालय तसेच ६०० वस्तु असे संग्रहालय आहे.

■ ■

## महारोगी सेवा समिती, वरोरा

बाबा आमटे व 'महारोगी सेव समिती'चे कुष्ठरोग निवारण कार्य सुपरिचित आहे, तथापि समितींचे विविध प्रकल्प व आदिवासी विषयक काम याबद्दल बाहेर विशेष माहिती नाही. समितीचे पाच प्रकल्प आहेत. ते असे :

### १) आनंदवन

'महारोगी सेवा समिती'चे मुख्य कार्यालय–कुष्ठरोग्यांच्या उपचार–पुनर्वसन कार्याबरोबर अंध व व अपंगाच्या प्रशिक्षण पुनर्वसनाचे प्रकल्पही हवे आहेत. शेती, डेअरी, छापखाना, सुतारकाम, विणकाम आदी अनेक उद्योग इथे चालविले जातात. दरवर्षीचा मित्रमेळावा' आनंदवनातील मुक्तांगणाच्या परिसरात भरतो. उत्तरायण व गोकुळ हे दोन नवीन प्रकल्प इथे कार्यान्वित होत आहेत.

पत्ता : डॉ. विलास आमटे, आनंदवन. वरोरा, जि. चंद्रपूर. टे. नं. ३४.

### २) सोमनाथ

'श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठ' उभारण्याची प्रेरणा या प्रकल्पामागे होती. कुष्ठरोग्यांचे उपचार व पुनर्वसन असे प्रकल्पाचे मुख्यत: स्वरूप आहे. आंतर भारतीच्या श्रम–संस्कार छावण्या प्रामुख्याने इथे होतात. तसेच जन–विज्ञान केंद्राचे कार्यही इथे नुकतेच सुरू झाले आहे.

पत्ता : श्री. शंकरदादा जुमडे, सोमनाथ प्रकल्प, मार्गे मूल, जि. चंद्रपूर, टे. नं. १०

### ३) अशोकवन

कुष्ठरोगी पुनर्वसन व नागपूरचे संपर्क केंद्र.

पत्ता : नागपूर–वर्धा राजमार्गावर नागपूरपासून सुमारे ८–१० मैलावर, चुंगी नाक्याजवळ.

### ४) हेमलकसा – लोकबिरादरी प्रकल्प :

आदिवासी विषयक कार्याचे प्रमुख केंद्र. निवासी दवाखाना, आश्रमशाळा व शेती प्रात्यक्षिकाचा एकात्तिक प्रकल्प. दवाखान्याच्या स्थापनेपासून सहा वर्षात सुमारे साठ हजार लोकांवर उपचार. हिंदुर व लाहिरी येथे प्रकल्पाची दोन उपकेंद्रे आहेत.

पत्ता : डॉ. प्रकाश आमटे, लोकबिरादरी, पो. भमरागड, ता. सिरोंचा, जि. चंद्रपूर.

### ५) नागेपल्ली – लोकबिरादरी प्रकल्प :

कुष्ठरोगी पुनर्वसन व हेमलकसा प्रकल्पाचे संपर्क केंद्र

पत्ता : श्री. जगन मचकले, पो. नागेपल्ली, ता. सिरोंचा, जि. चंद्रपूर, टे. नं. ४७ ■ ■

# हाकारा........

(१) आदिवासी व हरिजनांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन (२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण (३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व हरिजन समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे (४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे (५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद स्थापन करण्यात आली आहे याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून ' हाकारा ' सुरू करण्यांत आला आहे. या कार्यात आपणहि सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन ! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व–

| | |
|---|---|
| आजीव सभासद | १०० रुपये |
| सभासद | १० रुपये वार्षिक |
| विद्यार्थी सभासद | १० रुपये वार्षिक |
| आणि | |
| हाकाराची वार्षिक वर्गणी | १२ रुपये |

आपली सदस्यत्व फी आणि वार्षिक वर्गणी कृपया

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषद<br>
मानवशास्त्र विभाग<br>
पुणे विद्यापीठ, पुणे (४११ ००७)

या पत्त्यावर शक्य तेवढ्या लवकर पाठवा. आपल्या क्रियाशील साह्याची अपेक्षा आहे.